शिवयोगिनी मुक्ताबाई...
सिध्दसंपर्क...
चांगदेव राऊळ...
गुंडम राऊळ व उध्दळीनाथ...
चक्रधर व हरिनाथ...




म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८७११

REFBK-0022621

# चक्रपाणि
# अेक विश्लेषण

• महन्त आराध्य मुरलीधर शास्त्री.
• प्राः कन्हैया कुंदप.

भेर

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 OCT 1979

(क्र.मा.प.)

भेट २२६२९
३।३।७९
संदर्भ
निबंध २७४४

# श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण

( रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी लिहिलेल्या 'चक्रपाणि'
या ग्रंथातून निर्माण झालेल्या महानुभाव पंथाच्या
विविध प्रश्नांच्या संदर्भात घेतलेला परखड परामर्श )

२२६२९
निबंध २७४४

लेखक :

महंत आराध्य मुरलीधर शास्त्री
श्रीकृष्ण मंदीर, म्युनिसिपल पार्क,
भुसावळ.

व

प्रा. कन्हैया कुंदप, एम्. ए.
मराठी विभाग प्रमुख,
सद्‌गुरु गाडगे महाराज, कॉलेज,
कराड, ( जि. सातारा. )

REFBK-0022621

आराध्य प्रकाशन, सहावे.

प्रकाशक :

महंत आराध्य मुरलीधर शास्त्री,
श्रीकृष्ण मंदीर, म्युनिसिपल पार्क,
भुसावळ, ( जि. जळगाव )

★

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

★

ब्लॉकमेकर :
राजा ब्लॉक प्रोसेस, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
श्री. डी. एम्. सुतार.

मुखपृष्ठ मुद्रण :
ज्ञानेश्वर मुद्रणालय, कोल्हापूर.

★

जुलै १९७८

★

मुद्रक :
श्रीधर रघुनाथ कुलकर्णी,
श्रीधर मुद्रणालय, ३३८, सोमवार पेठ,
कराड. ४१५ ११०

प्राप्तीस्थान :

१. महंत आराध्य मुरलीधर शास्त्री
श्रीकृष्ण मंदीर,
म्युनिसिपल पार्क,
भुसावळ, जि. जळगाव.

२. महंत सातारकर बाबा
महानुभाव
महानुभाव मठ, करंजे सातारा

३. प्रा. कन्हैया कुंदप,
१७६/५, परांजपे वाडा,
सोमवार पेठ, कराड
( जि. सातारा. )

मूल्य सहा रुपये

महानुभाव साहित्याबद्दल आस्था असणाऱ्या सर्व वाचकांस

सादर अर्पण.

## अनुक्रम


★ लेखकांचे मनोगत

१ ★ शिवयोगिनी मुक्ताबाई

२ ★ श्रीचक्रधरांचा सिद्धसंपर्क

३ ★ श्री चांगदेव राऊळ

४ ★ गुंडम राऊळ आणि उधळीनाथ

५ ★ श्रीचक्रधर आणि हरिनाथ

६ ★ महानुभाव पंथाचे काही उत्तरकालीन ग्रंथकार

७ ★ संदर्भ ग्रंथ

८ ★ श्रीनागदेवाश्रम बडनेरा रोड; अमरावती यांच्या सौजन्याने प्राप्त झालेल्या हस्तलिखिताचा ब्लॉक

९ ★ अभिप्राय

# लेखकांचे मनोगत.

'चक्रपाणि एक विश्लेषण' हे पुस्तक लिहिण्याचे प्रमुख कारण म्हणजे रामचंद्र चिंतामण ढेरे यांचा 'चक्रपाणि' हा पीएच. डी. चा प्रबंध हे होय. ढेरे यांच्या मते 'चक्रपाणि' अंतरंगदृष्टचा आद्य मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी हा विषय व्यक्त करणारे शीर्षक आहे आणि म्हणून त्या ग्रंथाच्या निमित्ताने यादव कालीन मराठी वाङ्मयाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचे पुनरावलोकन केल्याचा दावा त्यांनी केला आहे. हे सर्व करीत असताना सत्यशोधक डॉ. ढेरे यांनी सत्याचा अपलाप करून स्वाभिमत सिद्ध करण्यासाठी द्यावे तेवढे अवधान दिलेले दिसत नाही.

त्यांनी आपल्या शोधनिबंधात केलेला विचार व त्यासाठी मांडलेले पुरावे ज्या ग्रंथातील आहेत ते ग्रंथ व ग्रंथकार हे विश्वसनीय आहेत किंवा नाहीत ते पारखायला हवे होते. पण त्यांच्या संपूर्ण लिखाणातून हा समतोल ढळलेला आहे. त्यामुळे शिवयोगिनी मुक्ताबाई, श्रीचक्रधरांचा सिद्धसंपर्क, श्री चांगदेव राऊळांचा सूप खराटा, श्रीगोविंद प्रभूंचा शांकर संन्यास आणि चक्रधर आणि हरिनाथ यांचे कल्पिलेले ऐक्य या बाबी वादग्रस्त ठरतात. डॉ. ढेरे यांच्या कल्पकतेचा वारू कित्येक ठिकाणी भरभक्कम पुराव्याच्या बळकट भूमीचा आधार सोडून कल्पनाविश्वात फार उंच उडाला आहे. त्यामुळे डॉ ढेरे यांच्या प्रबंधातील प्रतिपादनात अनेक दुवे कच्चे राहिलेले आहेत.

विशेषत: हरिनाथ व चक्रधर यांचे एकत्व कल्पितांना हरिनाथांचे चरित्र हे श्रीचक्रधरांचे नसून ते त्यांचा पूर्वावतार असलेल्या श्रीचक्रपाणी राऊळांचे आहे असे त्यांना मानावे लागले आहे. त्यामुळे ज्या गावी चक्रधर (हरिपाळ) व रामदेव दादोस यांची भेट झाली ते अंबजय हे वऱ्हाडातील गांव बाणगंगेच्या तीरावरील फलटण नगराकडे त्यांना फरपटत न्यावे लागले आहे.

तसेच हरिनाथांच्या विश्वंभर नामक तिसऱ्या शिष्याचा श्रीचक्रधरांच्या शिष्यमंडळात कोणताही दुवा डॉ. ढेरे यांना दाखविता आला नाही अशा अनेक बाबी नवीन सशोधकांना आव्हाने म्हणून ढेरे यांनी उद्धृत केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या या स्वप्नरंजनामुळे श्रीपर्वत म्हणजे श्रीशैल पर्वत, डाकराम म्हणजे द्राक्षाराम, कांती म्हणजे कांची, तसेच चक्रधर म्हणजे हरिनाथ, रामदेव म्हणजे रघुनाथ आणि चांगावटेश्वर म्हणजे चांगदेव म्हणजेच चक्रधर यासारखे स्थल व व्यक्तिविपर्यास त्यांच्याकडून घडले. त्यामुळे महानुभाव पंथीय लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. कोणत्याही पंथीय लोकांच्या भावनांना जबरदस्त हादरा देताना आधारास घेतलेले दुवे हे कितपत समर्थ आहेत हे फार सांवधानतेने पहावे लागते. त्याचवेळी महानुभाव तत्त्वज्ञानाची विचारसरणी लक्षात न घेता मांडलेली प्रमेये व त्यानुसार केलेली अनुमाने ही कशी फोल ठरतात हे दाखवण्यासाठी या पुस्तकाची निर्मिती झालेली आहे.

डॉ. ढेरे यांना जो षट्स्थळ नामक ग्रंथ उपलब्ध झाला तो प्रथम खात्रीचा ( Authentic ) आहे हे त्यांनी सिद्ध करावयास हवे होते. पण ते सिद्ध न करता आल्यामुळेच त्यांनी तो अजून प्रकाशितसुद्धा केला नाही. यात सर्व काही आलेच ! शिवाय त्यांना मिळालेला हा ग्रंथ अपूर्ण स्वरुपातला आहे. त्यासाठी त्यांनी त्या ग्रंथाच्या अजून काही प्रती पहावयास हव्या होत्या.

'षटस्थल' या ग्रंथाची महत्ता प्रस्थापित करायला हवी होती. पण त्यांनी ते काहीही न करता महानुभाव संप्रदायातील उत्तरकालीन

ग्रंथकाराना आधारभूत मानून महानुभावांच्या भावनांची प्रतारणा केलेली आहे म्हणून ढेऱ्यांच्या लेखनातील ही असत्यता निदर्शनास आणण्यासाठी महानुभावांच्या मूळ ग्रंथातील आधार देऊन ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

महानुभाव संप्रदायाशी संबंधित असलेल्या विषयांचाच विचार करून ढेरे यांच्या लेखनांचा परखड परामर्श घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यांच्या सपूर्ण प्रबंधाला उत्तर देणे हा या पुस्तकाचा हेतू नव्हे, पण महानुभाव संप्रदायाच्या संदर्भात केवळ तर्कांच्या आधारावर अनुमानिलेले ढेरे यांचे निष्कर्ष कसे चुकीचे आहेत हे दाखविणे फार महत्त्वाचे वाटले म्हणून पुराव्यासह चक्रपाणीचे विश्लेषण करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

महानुभावी लोक अगोदर कोणाच्या विरोधी जात नाहीत. पण अशा निरलस आणि प्रामाणिकपणे परमेश्वराच्या सेवेत गर्क असलेल्या भगवत् भक्तांवर अन्याय झाल्यास ते कधीही सहन करीत नाहीत. म्हणून ढेरे यांच्या लेखनाचे सत्य स्वरूप नेमके काय आहे, हे विचारवंतासमोर ठेवण्यासाठी या पुस्तकाची निर्मिती झालेली आहे. प्रा. वि. रा. करंदीकर यांच्या नवभारतमधील लेखामुळे तर तीव्रतेने हे पुस्तक लिहावयास घेतले त्याबद्दल प्रेरक म्हणून तर त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी वाटते.

हे पुस्तक लिहित असतांना गोपीराज ग्रंथ संग्रहालय ऋद्धिपूर, 'श्री नागदेवाचार्य आश्रम बडनेरा अमरावती, महानुभाव आश्रम औरंगाबाद, महानुभाव मठ सातारा, यक्षदेवबाबा ऋद्धिपूर, इत्यादी ठिकाणाहून हस्तलिखितांची सहाय्यता लाभली. त्यामुळे आम्हाला पुराव्यासह लिहिणे सोपे झाले. त्याबरोबरच अनेकांनी अनेक ठिकाणाहून पत्रद्वारे माहिती पुरविली.

त्या सर्वांचा नामनिर्देश करणे शक्य होणार नाही. सातारच्या महानुभाव मठाने तर या लेखन कार्यासाठी जी प्रसन्नता प्राप्त करून दिली त्याबद्दल प. पू. सातारकर बाबांच्या ऋणात राहणेच चांगले ! तेथील सर्व

साधू-संतांच्या डोळयातील या लेखनाबद्दलचे कुतुहल आणि असंख्य चाहत्यांच्या लेखनाबद्दलच्या उत्तेजनाचे ऋण हे शब्दाने मानता येण्यासारखे नाहीत. हे सर्व लेखन या ममत्वाच्या बंधाने आणि हस्तलिखितांतील सत्य दिग्दर्शनाने झाले. घडलेल्या सत्याची जागरूकता सर्वतोपरी ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधनात कोणताही शब्द अखेरचा नसतो हे ध्यानात घेऊन डॉ. ढेरे यांच्या लेखनाचा परामर्श घेतलेला आहे.

अनेक हितचिंतकांच्या आणि सदिच्छांच्या जोरावर हे लेखन करतांना मन कृतज्ञतेने भरून येते. त्याचे वाङ्मयीन फलित हे विचारवंताना सादर करताना आनंद होत आहे. या आनंदाच्या वेळेला या पुस्तकाची मुद्रणप्रत करीत असताना प्रभाकर शास्त्री आणि त्यांचे सहकारी तसेच श्रीधर मुद्रणालयाचे मालक श्रीधर कुलकर्णी व त्यांचे कार्यक्षम कर्मचारी यांच्या कर्मयोगावर ही सुरेख शब्दमुद्रा साकारलेली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार ! तसेच मुद्रणप्रत करण्यासाठी कुमार जगदीश लोमटे याने खूपच सहाय्य केले त्याबद्दल धन्यवाद.

दिनांक }
६-७-१९७८ }

– महंत आराध्य मुरलीधर शास्त्री
– प्रा. कन्हैया कुंदप

★ ★ ★

# अभिप्राय

डॉ. भाऊसाहेब तथा वि. भि. कोलते
माजी कुलगुरू, नागपूर विद्यापीठ.

'श्रीचक्रपाणि: एक विश्लेषण' हा प्रबंध मी काळजीपूर्वक वाचला. डॉ. रा. चिं ढेरे यांनी लिहिलेल्या 'चक्रपाणि' या ग्रंथात महानुभाव पंथाशी भावनात्मक दृष्टीने संबद्ध असलेले अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांना सांप्रदायिक दृष्टिकोनातून समर्पक उत्तरे देण्याचा प्रयत्न आपल्या प्रबंधात आपण केला आहे. आणि तो बव्हंशी यशस्वी झालेला आहे, असे वाटते. आद्य मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी शैव होती या प्रमेयाच्या सिद्धीसाठी डॉ. ढेरे यांनी महानुभाव पंथीयांच्या अनेक सांप्रदायिक मतांची मोडतोड करून आपल्या प्रमेयाला सिद्धांत रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. तसे करताना आपल्या प्रमेय सिद्धीसाठी अनुकूल असेल तेवढेच घ्यावयाचे व प्रतिकूल असेल ते दुर्लक्षायचे धोरण स्वीकारले आहे. असे जे आपण म्हटलेले आहे त्यात बरेच तथ्य आहे. अशा गोष्टी स्पष्टपणे आपण दाखवून दिल्यामुळे डॉ. ढेरे यांच्या प्रमेयांचा अभ्यास करताना अभ्यासकांना उत्तम मार्गदर्शन होईल यात शंका नाही. विशेषत: महानुभाव संप्रदायाचा मुकुंदराजाच्या परंपरेशी संबंध जोडतांना डॉ. ढेरे यांना पुष्कळ कोलांट उड्या घ्याव्या लागल्या आहेत. त्यांच्या आधारे हरिपाळ ( चक्रधर ) म्हणजे हरिनाथ व रामदेव ( दादोस ) म्हणजे रघुनाथ हे ऐक्य प्रस्थापित करतांना डॉ. ढेरे यांची फार तारांबळ उडालेली आहे. ती आपण आपल्या ग्रंथात सप्रमाण दाखवून या बाबतीतील डॉ. ढेरे यांच्या प्रमेयाचा आधारच उखडून टाकला आहे.

डॉ. ढेरे यांनी हे प्रमेय स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला असला तरी त्या प्रमेयाची मूळ कल्पना कै. श्री. यक्षदेव महानुभाव, गोविंदराज महानुभाव व गोपीराज महानुभाव यांची आहे. त्यांच्या अव्यापारेषु व्यापाराबद्दल आपण त्यांच्यावर टीकाही केली आहे. यावरून आपला हा संपूर्ण प्रबंध समाहिततेने लिहिला असून तो बऱ्याच अंशी प्रत्ययोत्पादक,

विशेषत: सांप्रदायिक दृष्टिकोनातून प्रत्ययोत्पादक झाला आहे; असे मला वाटते.

तथापी, एकदोन गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो. डॉ. ढेरे यांनी लिहिलेल्या शिवयोगिनी मुक्ताबाई, चक्रधरांचा सिद्धसपर्क व गुंडम राऊळ व उधळीनाथ या तीन प्रकरणांचा संबंध पर्वत, डाकराम व कांती या स्थल-निश्चितीशी पोचतो. डॉ. ढेरे यांनी पर्वत म्हणजे आंध्रप्रदेशातील श्रीपर्वत, डाकराम म्हणजे त्याच परिसरातील द्राक्षाराम व कांती म्हणजे तामिळ-नाडूतील कांची, असे दाखविले आहे. त्यांचे म्हणणे खोडून काढतांना डाक-राम म्हणजे सुकळी डाकरामच हे दाखविण्यासाठी आपण महानुभावीय पोथीतील एक प्रमाण देऊन त्याचे छायाचित्रही दिलेले आहे त्याचा विचार करणे अवश्य आहे.

प्रा. डॉ. वि. रा. करंदीकर
७, फर्गसन महाविद्यालय, पुणे ४

'आद्य मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी' स्पष्ट करण्यासाठी डॉ. रा. चिं. ढेरे यांनी लिहिलेला 'चक्रपाणि' या नावाचा एक ग्रंथ गेल्यावर्षी प्रसिद्ध झाला. त्यातील श्रीचक्रधर विषयक भागाचा परामर्ष घेण्यासाठी महंत आराध्य मुरलीधरशास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप या दोघांनी 'श्रीचक्रपाणि एक विश्लेषण' हे पुस्तक लिहिले आहे. डॉ. ढेरे यांनी आपल्या ग्रंथात केलेल्या अनेक विधानाबाबत मतभेदास जागा आहे. मुकुंदराजाचे गुरु रघुनाथ हेच रामदेव दादोस तर परमगुरु हरिनाथ म्हणजे स्वत: चक्रधर, रामदेवास केलेला वेदान्ताचा उपदेश, गुंडम राऊळाना दीक्षा देणारे चांगदेव राऊळ तेच चक्रधर, चक्रधरावरील शैव परंपरेचा व नाथसंप्रदायाचा ठसा, त्यांचे श्रीपर्वतावरील वास्तव्य व त्यांना तेथे भेटलेली शिवयोगिनी मुक्ताई, डाक-राम म्हणजे द्राक्षाराम किंवा कांती म्हणजे कांची, असे जे अनेक सिद्धांत डॉ. ढेरे यानी मांडलेले आहेत ते का पत्करता येत नाहीत, हे दाखवि-ण्याचा एक सुव्यवस्थित प्रयत्न या पुस्तकात केला आहे. महानुभाव

पंथाशी या दोघांची जवळीक आहे त्यामुळे याविषयावरील त्यांचा अधिकार वेगळा आहे. अनेक पोथ्यातील व ग्रंथातील अवतरणे त्यांनी उद्धृत केली आहेत आणि आपले सारे विवेचन साधार असावे व त्याचवेळी कोणत्याही प्रकारच्या अभिनिवेशापासून मुक्त असावे अशी दक्षता त्यांनी घेतलेली आहे. हे विवेचन वाचल्यावर डॉ. ढेरे यांना आपल्या सिद्धान्तांचा पुनर्विचार करावा लागेल. मराठी वाङ्मयाच्या व धर्म विचाराच्या इतिहासाशी संबंधीत अशा एका महत्त्वाच्या विषयावरील हे पुस्तक इतक्या तत्परतेने लिहिल्याबद्दल हे दोघे लेखक अभिनंदनास पात्र आहेत.

(प्रा. वि. रा. करंदीकरांनी नवभारत मधील या संबंधीचे विवेचन त्यांच्या ग्रंथवेध या संग्रहात पृ. ५३ ते ८४ मध्ये समाविष्ट केलेले आहे ते जिज्ञासूंनी पहावे.)

डॉ. अ. ना. देशपांडे
वाङ्मयेतिहासकार, नागपूर

दक्षिण महाराष्ट्रापासून तो पंजाबपेशावरपर्यंत जनमानसावर भागवत धर्माचे, श्रीकृष्णभक्तीचे उदात्त आणि उद्धारक संस्कार करण्याचे पवित्र कार्य गेली कित्येक शतके, शांतपणे गाजावाजा न करता अहिंसक पद्धतीने करणारा महानुभाव पंथ हा एक प्रकारे दुर्दैवीच समजला पाहिजे. महाराष्ट्रातल्या विद्वानांकडून त्याला सतत बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

नुकतेच एक नवे असेच कारण घडले आहे आजच्या पुण्यातले आघाडीवरचे प्राचीन वाङ्मयाचे व प्राचीन संस्कृतीचे संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'चक्रपाणि' या ग्रंथाचे प्रकाशन हे ! ढेरे यांच्या या ग्रंथात विपरीत आणि विकृत विधाने धुडगूस घालताना पाहून थोडी करमणूक होते. पण तीच विधाने जेव्हा सत्याच्या मंदीराचा विध्वंस करताना दिसतात तेव्हा मात्र मन विषण्ण होते, उद्विग्नतेने व्यापून जाते.

प्रत्येक पंथाला, संप्रदायाला, धर्माला, एक परंपरा असते तशीच ती

महानुभाव पंथालाही आहे. ही परंपरा या पंथाच्या अनुयायांच्या आचरणातून प्रकट झालेली आहे. या परंपरेच्या प्रवाहात या पंथाच्या प्रवर्तकांच्या आणि श्रेष्ठींच्या चरित्राचे आणि तत्त्वज्ञानाचे निर्मळ प्रतिबिंब पडलेले आहे. ढेरे ते पहातच नाहीत. ते आपल्या कल्पक संशोधक बुद्धीच्या आश्रयाने कसली तरी विपरीत विधाने फडकवीत राहतात. महानुभाव पंथ हा सुरुवाती पासून श्रीकृष्णभक्त. या पथाचा एक महत्त्वाचा आधारग्रंथ भगवद्गीता ! सर्वज्ञ श्रीचक्रधर हे तर अवतार स्वीकारापूर्वीही कृष्णभक्तच होते. असे असून हा पंथ मूळचा शैव, यांचा संबंध लकुलीश–पाशुपताशी, असे डॉ. ढेरे यांचे म्हणणे हे केवळ बिनबुडाचे बोलणे ! सर्वज्ञ ज्या कांती नावाच्या गावात गेले होते ती कांती म्हणजे नागपूर जिल्ह्यातले काटोल. ही परंपरामान्य वस्तुस्थिती. डॉ. ढेऱ्यांच्या अति कल्पक दृष्टोला ही कांती तामिळनाड-मधील कांचीवरम दिसलेली आहे कारण कांची हे शैवसंप्रदायाचे महाकेन्द्र आहे आणि महानुभाव पंथ संस्थापक हे मूळचे शैव आहेत !

श्रीचांगदेव राऊळांच्या हाती असलेली सूप-खराटा ही पारमार्थिक विद्येचे संक्रमण करण्याची प्रतिकात्मक साधने आहेत. डॉ. ढेरे यानी विल्यम क्रुक पुढे लोटांगण घालून त्याचा शब्द प्रमाण मानून सूप-खराटा ही शीतला-प्रमाणे मातंगी देवीचीही आयुधे, असे अनुमान काढले आहे. आणि चांगदेव राऊळांचा अप्रत्यक्षपणे मातंगीच्या उपासनेशी संबंध जोडला आहे. महात्मा गांधी चरखा फिरवीत असत, सूत काढीत असत म्हणून ते कोष्टी होते, असे म्हणण्यासारखाच हा प्रकार नाही काय ?

'चक्रपाणि' तील सर्वात विपर्यस्त विचार कोणता असेल तर तो सर्वज्ञ श्रीचक्रधर आणि मुकुंदराजाचे आजेगुरु श्रीहरिनाथ यांच्यातील ऐक्य कल्पनेचे या कल्पनेला बाधक असलेल्या एका महत्त्वाच्या गोष्टीची खुद्द स्पष्ट जाणीव असूनही त्यांनी या कल्पनेचा पुरस्कार केला आहे. ढेरे यांनी 'चक्रपाणि'च्या पृ. २६६ वर कबूल केले आहे की, शके १११० हा मुकुंदराजांच्या ' विवेक सिंधूचा काळ हे ऐक्य सिद्ध करण्याला बाधक आहे. वस्तुतः शके १११० हा 'विवेकसिंधू' चा खरा काळ आहे. प्रा. म. शं. वाबगावकर यांनी आपल्या 'संशोधन व चिंतन' या पुस्तकातील ' खेरला

येथील शिलालेख' या लेखात नृसिह बल्लाळ व चैत्रपाळ या राजवंशपरंपरेची त्यांच्या काळाची माहिती, शिलालेखाच्या आधारे देऊन 'विवेक सिधू' चा शके १११० हाच सर्वमान्य काळ कसा योग्य व अचूक आहे हे सूचित केले आहे. ढेरें यांना वावगावकरांच्या या लेखाची माहिती आहे कारण त्यांनी आपल्या ' शोध शिल्प ' या पुस्तकाच्या २१३ पानावर वावगाव-करांच्या पुस्तकाचा नामनिर्देश केलेला आहे. विवेकसिधूचा शके १११० हा काळ निर्णायक मानण्याचा निस्संदिग्ध पुरावा उपलब्ध असताना श्रीचक्रधर-हरिनाथ यांच्या एकरुपतेचा आग्रह धरणे कितपत संयुक्तिक आहे ?

सर्वज्ञ श्रीचक्रधर म्हणजे पूर्वाश्रमीचा हरिपाळ. गुजराथमधील भडोच येथील विशालदेव प्रधानाचा हा मुलगा. सिंघणाने भडोचवर स्वारी केली तेव्हा त्या युद्धात हरपाळने भाग घेतला होता. हा सगळा इतिहास आहे. याची साधार माहिती देणारा एक सविस्तर लेख डॉ. म. रा. जोशी यांनी लिहिला असून तो मराठी संशोधन पत्रिकेच्या येत्या अंकात प्रसिद्ध व्हायचा आहे. तेव्हा सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी म्हणजे पूर्वाश्रमीचा गुजराथ मधील प्रधानपुत्र हरपाळ, ही जर ऐतिहासिक वस्तुस्थिती असेल तर श्रीचक्रधर हरिनाथ यांचे ऐक्य कल्पिणे हे संयुक्तिक आहे काय ?

श्रीचक्रधर - हरिनाथ यांच्या ऐक्याचे ढेऱ्यांनी उचलून धरलेले प्रमेय हे एक निर्जीव, निष्प्राण बाहुले आहे. या बाहुल्याला ' चक्रपाणि ' चे प्रस्तावनाकार, प्रा. नरहर कुरुंदकर यांनी प्रस्तावनेच्या पृ. ४१ वर जवळ घेतले आहे. त्याला कुरवाळले आहे.

'चक्रपाणि' मध्ये महानुभाव पंथासंबंधी विकृत व विपरीत माहिती देणारी जी अनेक निर्जीव बाहुली ढेरे यांनी उभी केलेली आहेत ती महानु-भाव पंथांबद्दल कशी दिशाभूल करणारी आहेत. भ्रामक आहेत, असत्य आहेत, याची अत्यंत मूलगामी चिकित्सा महंत आराध्य मुरलीधरशास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यांनी 'चक्रपाणि : एक विश्लेषण' या पुस्तकात विवेक-शील संयम सांभाळून, निस्संदिग्ध स्वरूपाचे भरपूर आधार देऊन, युक्तिवाद-

कौशल्य वापरुन केलेली आहे. महानुभाव पंथाबद्दलच्या खोटया समजुतीचे निराकरण करणारे व त्यासंबंधीच्या सत्य सिद्धान्तांचा प्रकाश पसरविणारे पुस्तक प्रसिद्ध करून महंत आराध्य मुरलीधर शास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यांनी केवळ महानुभाव पंथाचीच नव्हे तर महाराष्ट्राच्या प्राचीन सांस्कृतिक इतिहासाच्या संशोधन विषयक कार्याची फार अनमोल सेवा केलेली आहे. महंत आराध्य मुरलीधर शास्त्री हे तर महानुभाव पंथाचे एक विद्वान, व्यासंगी, धर्मपरायण व वंदनीय असे श्रेष्ठी आहेत. त्यामुळे 'श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण' या पुस्तकाला आपोआपच अधिकारवाणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्राचीन महाराष्ट्राच्या धार्मिक, सामाजिक व वाङ्मयीन जीवनाचे जे जे निर्मळ, निर्मत्सर मनाचे अभ्यासक असतील ते या पुस्तकाचे अभिनंदनपूर्वक स्वागत करतील यात शंका नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२६२१
निबंध
२५४६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१

# शिवयोगिनी मुक्ताबाई

मराठीच्या अग्रपूजेचा मान लाभलेल्या तसेच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी मौलिकता प्राप्त झालेल्या महानुभावांच्या दर्जेदार विविधरूपी वाङ्मय वैपुल्याकडे संशोधकांचे लक्ष्य वेधणे स्वाभाविक आहे. त्या सर्व संशोधनांचा आढावा घेणे हे वाङ्मयेतिहासकाराचे कार्य आहे. या संशोधन क्षेत्रात प्रचंड वैचारिक विवर्त निर्माण करणाऱ्या संशोधकांच्या संशोधनाचा विचार करताना अगदी अलीकडे झालेल्या शोधात सत्याच्या विपर्यासाचा आणि पूर्वग्रहदोषाचा प्रत्यय त्यातून आढळतो. त्यामुळे त्या-दृष्टीने घडलेल्या संशोधनाचा विचार येथे कर्तव्य ठरतो. प्रामुख्याने अगदी नजिकच्या काळातील डॉ ढेरे यांच्या ' चक्रपाणि ' संबंधाने याठिकाणी आपणाला विचार करावयाचा आहे.

डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांचा ' चक्रपाणि ' हा नवा ग्रंथ 'षट्स्थल' या विसोबा खेचरांच्या नव्याने उपलब्ध झालेल्या एका छोट्या प्रकरणाच्या निमित्ताने निर्माण झालेला आहे. विसोबा खेचरांच्या नांवावरील 'षट्स्थल' या नावाचे प्रकरण एका जुन्या हस्तलिखित बाडात डॉ. ढेरे याना उप-

लब्ध झाले. हे विसोबा संत नामदेवांचे गुरु! ज्ञानदेव, नामदेव ही वारकरी पंथातील संतश्रेष्ठींची जोडी, ज्ञानदेवांची गुरुपरंपरा नाथसंप्रदायात पोहोचणारी. विसोबा खेचरांचे परमगुरु हे महायोगी चांगदेव, त्यांच्यामुळेच ज्ञानेश्वरांच्या चांगदेव पासष्ठीची रचना झाली. ज्ञानेश्वरांचे परात्पर गुरु गोरक्षनाथ, तर ढेरे सांगतात की चांगदेवाना उपदेश करणारी योगिनी मुक्ताई ही गोरक्षनाथांची शिष्या. हे गोरक्षनाथ व ही मुक्ताबाई आंध्र प्रदेशातील श्रीपर्वतावर काही काळ वास्तव्य करीत होती. ढेरे असे म्हणतात की तेथे गोरक्षनाथांची भेट अल्लमप्रभूशी झाली. हे अल्लम प्रभू कर्नाटकातील वीरशैव पंथाचे अध्वर्यू. गोरक्षनाथ व अल्लमप्रभू यांच्या भेटीमुळे नाथ पंथावर वीर शैव तत्त्वज्ञानाचा परिणाम झाला. वीरशैव तत्त्वज्ञानातील षट्स्थल सिद्धान्त मुक्ताबाईने चांगदेवास सांगितला व त्यांच्याद्वारा विसोबांच्या मार्फत तो पुढे नामदेवापर्यंत पोहोचला, एवढेच नव्हे तर ज्ञानेश्वरीतही त्याचा पडसाद उमटला. मुक्ताबाईला श्रीपर्वतावर श्रीचक्रधर स्वामी भेटले व त्या भेटीमुळे आपला जन्म सफल झाला असे तिने मानले. श्रीपर्वतावरील सिद्धांच्या व नाथांच्या सहवासाचा परिणाम श्रीचक्रधरांवर झाला पण का कोण जाणे, त्यानी एक नवाच पंथ काढला. तो महानुभाव संप्रदाय म्हणून विख्यात झाला. या पंथाचें आचार्यत्व त्यांनी नागदेव या आपल्या पट्टशिष्याकडे दिले. ते देण्यापूर्वी त्यानी आपल्या रघुनाथ या शिष्याला वेदान्ताचा उपदेश केला होता. हे रघुनाथ म्हणजे मराठीतल्या आदिकवी मुकुंदराजाचे गुरु! या रघुनाथाचे गुरु जे हरिनाथ तेच चक्रधर आणि या हरिनाथाचे वर्णन करतेवेळी विवेकसिंधूमध्ये मुकुंदराज चक्रधराचे चरित्र न सांगता त्यांचे परमगुरु जे श्रीचांगदेव राऊळ त्यांचे चरित्र देतात, अशी आणखी माहिती ढेरे देतात.

त्याचवेळी गोरक्षनाथ – मुक्ताई – चांगदेव, चांगदेव राऊळ – गुंडम राऊळ – चक्रधर, हरिनाथ – रघुनाथ – मुकुंदराज या सारख्या निरनिराळ्या गुरु-परंपरांचा शोध घेताना आणि परस्पर संबंध जोडताना एक गुंताच निर्माण करून टाकतात. मात्र आम्हाला येथे इतरांच्या गुंत्याचा विचार करावयाचा नाही तो आमचा विषय नाही. आम्हाला केवळ महानु-

भावपंथ व त्याचे संस्थापक. श्रीचक्रधर स्वामी यांच्याबद्दल जे डॉ. ढेरे यांनी फोल विधान केले आहे बिनबुडाचे आरोप केले आहेत त्याच्यापुरताच विचार करावयाचा आहे. कारण त्यामुळे पंथीय श्रद्धाळू जनतेच्या भावना दुखवल्या गेल्या आहेत. तो विचार करताना पण केवळभावनावश होऊन काहीतरी लिहावयाचे नसून जे संयुक्तिक बुद्धिगम्य व ज्याला प्रमाणाचा आधार असेल तेच लिहावयाचे आहे.

उपरोक्त सर्व लिखाणाचा सारांश लक्ष्यात घेऊन आणि डॉ. ढेरे यांची मन.पूर्वक नम्रता ध्यानात घेऊन सुद्धा डॉ. वि. रा. करंदीकरांच्या शद्वात सांगावयाचे झाले तर असे म्हणता येते की,[१] "ढेरे प्रथम काही अनुमान करतात आणि नंतर ते अनुमान म्हणजेच जणू प्रस्थापित झालेला सिद्धान्त असे मानून त्याच्या आधारे पुढचे अनुमान करतात, या पुढच्या अनुमानालाही पुढे सिद्धान्तरूप प्राप्त होण्याची शक्यता असतेच. ऐतिहासिक प्रमाणांवर आधारलेलै विवेचन करावयाचे असते तेव्हा ही पद्धत योग्य ठरत नाही, तेथे अधिक नेमकेपणाची व काटेकोर पणाची आवश्यकता असते."

डॉ. ढेरे म्हणतात–

महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी हे गुरुप्राप्ती नंतर उन्मनस्क अवस्थेत एकाकी भ्रमण करीत असताना, त्यांना कोणी मुक्ताबाई नामक योगिनी, भेटल्याचे वर्णन लीळाचरित्रात[२] आढळते. या चक्रधर–मुक्ताबाई भेटी संबंधीची समग्र लीळा अशी–

मुक्ताबाई भेटि । पर्वती बारा वरिषे क्रीडा केली । एकु दिनी मुक्ताबाईसी दर्शन जाले । आपुलेया आश्रमा घेउनी आली । वनपुष्पाची पुजा केली । कंदमूळ फळाची आरोगणा दीधली । तयासी म्हणीतले । 'इतुकेही तप केले । तयाचे फळ आजि आले'। पाहाळी गेली लोंव । चुंभळी वळीली नखे । भुइं काढती जटै । मुक्ताबाई ऐसे नांव ।

या लीळेतील मुक्ताबाईचे चित्र एका तपोवृद्ध योगिनीचे आहे.

' पर्वता 'वर तिचा आश्रम होता, कंदमूळ फळावर ती निर्वाह करीत होती. तिच्या अंगावरील लव वाढली होती. नखांच्या चुंभळी वळल्या होत्या. आणि जटा जमीन झाडत होत्या. साधूंच्या सत्कारात स्वतःस कृतार्थ मानण्याइतकी विनय संपत्ती तिचे जवळ होती.

## भेटींच्या स्थानाचा प्रश्न–

चक्रधरांची आणि मुक्ताबाईची भेट नेमकी कुठे झाली, हे निश्चित झाले तर मुक्ताबाईच्या तपोभूमीचा शोध लागू शकेल. आणि तिच्या चरित्राचे संशोधन करण्याची दिशा निश्चिती होऊ शकेल. उपरिनिर्दिष्ट लीळेत या भेटीचे स्थान ' पर्वत ' या संदिग्ध संज्ञेने उल्लेखिलेले आहे.

पुढे ढेरे असे अनुमान काढतात[३]

" महानुभाव पंथ या भेटीचे स्थान सालबर्डीच्या डोंगरावर ( ता. मोर्शी जि. अमरावती ) भेट झाल्याचे मानतो. खरे तर या पारंपारिक मताला प्रत्यक्ष महानुभावीय प्राचीन साधनांचा कसलाही आधार नाही. चक्रधरांशी ज्या ज्या स्थानांचा संबंध आला, त्याचा धांडोळा घेऊन त्या स्थानांची तपशीलवार माहिती ग्रथित करणाऱ्या ' स्थान पोथी ' मध्ये पूर्वनिर्दिष्ट लीळेतील 'पर्वता' चा कसलाही तपशील दिलेला नाही. केवळ ' पर्वती बारा वरिषे क्रीडा केली ' हे लीळा चरित्रातील विधान पुनरुधृत करण्यापलीकडे स्थानपोथीकाराने या स्थानाविषयी काहीही सांगितले नाही. लीळाचरित्रात हे स्थान केवळ 'पर्वत' या शब्दाने उल्लेखिलेले आहे. परंतु जेव्हा लीळाचरित्रकाराला लीळेचे स्थान निश्चित माहीत नसते, तेव्हा तो 'गावी एकी' अशा प्रकारे स्थान निदश करतो. जर त्याला चक्रधरांच्या द्वादशवार्षिक क्रीडेचे स्थान असलेला पर्वत कोणता, हे माहीत नसते तर, त्याने 'पर्वती एकी' असा उल्लेख केला असता. ज्याअर्थी त्याने तसा उल्लेख केला नाही, त्याअर्थी त्याला 'पर्वत' हा शब्द विविक्षित स्थानाचे विशेष नाम म्हणूनच अभिप्रेत असावा, असे वाटू लागते.

'पर्वत' हे श्रीपर्वताचे संक्षिप्त आहे. आंध्र प्रदेशातील श्रीपर्वत हे

मध्ययुगीन साधनांचे जागते गाजते केन्द्र म्हणून जाणत्यांना सुपरिचित आहे. श्रीपर्वत म्हणजे श्रीशैल की नागार्जुन कोंडा या विषयी विद्वानात मतभेद असला, तरी श्रीशैल व नागार्जुन कोंडा आंध्रमध्ये एकाच परिसरात असल्यामुळे त्या मतभेदाचा फारसा विचार करण्याची प्रस्तुत संदर्भात गरज नाही. उपरिनिर्दिष्ट लीळेतील 'पर्वती' याचा अर्थ 'श्रीपर्वती' असा निश्चयात्मक अभिप्रेत आहे. असे विवेचन करून ढेरे पुढे म्हणतात की, "आंध्रमध्ये चक्रधरांचा दीर्घकाळ संचार झालेला असूनही चक्रधर संबंधित पवित्र स्थानांचा विचार करताना त्यांच्या अनुयायांनी आंध्र-कर्नाटककडे लक्ष दिले नाही. कारण त्यांना स्वामींची सक्त आज्ञा आहे की, 'कन्नड देसां तेलंग देसां न वचावेः ते विषयबहळ देशः तेथ अवधूत मान्य' महानुभवांच्या दृष्टीने चक्रधरांची आज्ञा ही साक्षात परमेश्वराची आज्ञा असल्यामुळे त्यांच्याकडून आंध्र-कर्नाटकातील स्थानांचा शोध अपेक्षितच नाही. परंतु महानुभावीय वाङ्मयाच्या धुरंधर अभ्यासकांनीही उपेक्षा करावी, याचे नवल वाटते."

वरील विस्तृत विवेचनात श्रीचक्रधर स्वामींची व मुक्ताबाईची भेट सालबर्डीच्या डोंगरात न होता आंध्रातील श्रीपर्वतावर झाली या विषयी डॉ. ढेरे यानी प्रमुख तीन मुद्दे उपस्थित केले आहेत.

१) सालबर्डीचा उल्लेख लीळाचरित्र किंवा स्थानपोथीत येत नसून तो फार अलीकडचा आहे.

२) पर्वत या शब्दाचा उल्लेख स्थानपोथीत विशेषनामासारखा असून तो आंध्रातील श्रीपर्वताला उद्देशून आहे.

३) महानुभाव पंथीयाना श्रीचक्रधर स्वामींची आंध्रात जाण्याची आज्ञा नसल्यामुळे त्यांना त्या स्थानाचा शोध घेता आला नाही. क्रमशः याचा विचार करूया.

(१) श्रीनागदेवाश्रम बडनेरा रोड, अमरावती यांच्या सौजन्याने प्राप्त झालेल्या हस्तलिखितात पर्वत म्हणजे सालबर्डी येथे मुक्ताबाईला भेट दिल्याचा उल्लेख त्या पोथीत आहे.[४] तीत कोणत्याही प्रकारचो खाडाखोड किंवा नवीन मजकूर घातला आहे असेही नाही.

तरीपण ती पोथी पाहिजे तशी जुनी दिसत नसल्यामुळे आणि शक निर्देश नसल्यामुळे ती पुराव्यातून वगळण्यात आली आहे. सालबर्डीचा उल्लेख असलेली जुनी पोथी मिळवून तिचा उल्लेख महानुभाव मासिकातून केला जाईल. सुकळी डाकरामाच्या लीळेचा उल्लेख जिच्यात आहे त्या पोथीवरही शकाचा उल्लेख नसला तरी ती पोथी पाहताक्षणीच तिचा जुनेपणा कोणालाही प्रत्ययाला येण्यासारखा आहे. शिवाय अक्षराचे वळण इत्यादी वरूनही तो प्रत्यय सहजतेने येतो.

सालबर्डीच्या आरतीत मुक्ताबाईची भेट सालबर्डीला झाली असा स्पष्ट उल्लेख आहे. हे डॉ. ढेरे यांनी त्यांच्या 'चक्रपाणि' मध्ये स्वीकारला आहे. ते त्यात म्हणतात, " त्या आरतीचा कर्ता वाकू बिडकर हा स्थानपोथीच्या तुलनेने कितीतरी अलीकडचा आहे. (चक्रपाणि पृ. १५२) जे मुरारी यक्षदेवाची आरती प्रमाण म्हणून स्वीकारतात (त्या आरतीचे कर्ते १९४६ साली वारले.) त्या ढेरे यांनाही आरती अलीकडची असे म्हणण्याचा अधिकार कसा पोहोचतो. मुरारीच्या आरतीचा जन्म तरी विवेकसिंधूकार मुकुंदराजांना व ज्ञानेश्वरांना महानुभाव परंपरेत ओढण्यासाठी झाला आहे तशी स्थितीपण सालबर्डीच्या आरतीत नाही.

महानुभाव पंथीय लोक कोठेही ओटे बांधून त्याला नमस्कार करीत नाहीत, तर जेथे निश्चितपणे माहिती असेल की श्रीकृष्णादी पाच अवतारांपैकी कोणत्यातरी परमेश्वर अवताराचा संबंध असेल त्याच स्थानावर ओटे बांधून त्याला नमस्कार करतात. हा नियम हा पंथ काटेकोरपणे पाळीत आलेला आहे. डॉ. ढेरे यांच्या म्हणण्याप्रमाणे मुक्ताबाईची समाधी आढळली व तेथे ओटा बांधला, त्याला नमस्कार करू लागले. असे घडणे महानुभाव तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध असल्यामुळे तसे महानुभाव कधीच करणार नाहीत. किंवा अज्ञानाने तसे केले तरी पंथात त्याला मान्यता मिळणे शक्य होणार नाही. पण असे मानले तर स्थानपोथीकाराने नुसते ' पर्वतीक्रीडा ' असे का म्हटले ? विशेष खुलासा का केला नाही याचे कारण की मूळ लीळाचरित्राप्रमाणेच मूळ स्थानपोथीसुद्धा खालसेयाच्या

धाडीच्या वेळीच गेली. याबाबत इतिहास प्रकरणात खालीलप्रमाणे नोंद आहे.[५]

"कवीश्वरांसी कोकणा जाता मार्गी चोर उठिले: तेव्हा कोकणिचा घाटु उतरता समस्त गुरुकुळ नागविले: पोथीयांचा जूडा परशुराम व्यासापासी होता: तेआतुनि परशुरामव्यासी १ पुस्तक काढिले. ते भोइवरी तनकटातू गाळीले: येरे गाळावी तंव एके ओरपे कारे पर्शरामव्यासाचा हातिचे जूडे आसडुन नेले: तेआंतु आदि सहितु पाच रूपे चरित्रेः प्रकरणाची पोथी : स्थानपोथी इतुके गेले:" तसेच स्थाननिर्देशासंबंधी योग्य उल्लेख स्मृतीस्थळात आढळतो.[६]

## पहिल्या स्थानपोथीची निर्मिती–

'स्थाननिर्देशे बाईदेव बासां अटण सांघणे ।। एक वेळ बाईदेव बास अटणा निगाले : तेव्हेळी भटोबासी म्हणितले, 'बाईदेया, तुवा स्थाननिर्देशे अटण करावे. सकळ स्थाने नमस्करावी म्हणौनि, विधी विहीला: मग बाईदेवबा स्थाने नमस्करीतचि अटणा निघाले ।।११५।।" उपरोक्त स्मृति निर्देशाप्रमाणे बाईदेवबास नागदेवाचार्यांच्या अनुमतीनुसार सर्व स्थानांचा शोध करून सर्व स्थाने नमस्कारिली आणि स्थानांचा निर्देश करून म्हणजे त्या त्या त्या ठिकाणी खुणा करून पूढे पोथीच्या रुपात लेखन झाले आणि ते बाईदेवबासानीच केले असावे. मूळची पोथी लीळाचरित्राबरोबर गेली असली तरी त्या त्या स्थानांचे निर्देश कायम होते त्याप्रमाणे पंथीय साधू महाराष्ट्रात सर्व स्थाने नमस्कारण्यास जात होते. नंतर ओटे बांधले त्याप्रमाणे दुसऱ्यास्थान पोथीच्या रुपात लिखाण झाले. ही प्रक्रिया घडत असताना काही ठिकाणी तपशीलाच्या नोंदणीत विशेष खुलासा झाला नाही. तरीपण अज्ञानामुळे आणि खुळचा श्रद्धेमुळे भलत्याच ठिकाणी ओटे बांधले गेलेले नाहीत.

श्रीचक्रधर स्वामींनी हरिपाळाचे पूर शके ११४२ मध्ये उठविले. विक्रमसंवत्सरी शुद्ध बीजेसी येणे पूर उठविले' हे वाइदेशकरा शिवाय

इतर पाठातही आढळते. डॉ कोलते यांच्या मताप्रमाणे नागांबिकेला प्रेमदान शके ११८९ साली दिले. म्हणजे हरिपाळाचे देह स्वीकार केल्या पासून नागम्बादेवीच्या भेटीपर्यंतचा काळ सत्तेचाळीस वर्षांचा येतो यापैकी सात-आठ वर्षे तरी स्वामी भडोचला राहिले असणार, १२ वर्षे उन्मनी अवस्थेत पर्वतावर क्रीडा, १२ वर्षे विंझी गोंडवाडा, १२ वर्षे सेंदुर्जणी प्रांतात ओरंगलला माधव भक्ताच्या घरी, १० महिने भोगरामाला, १० महिने, एलिचपूरला, १० महिने मेहकरला, २० दिवस दाबविहिरला, ९ दिवस नांदेडला, ११ किंवा २० दिवस राहेरला, ५ दिवस वडनेऱ्याला स्वामींचा निवास होता. अशी नोंद स्थानपोथीत आढळते. सत्तेचाळीस वर्षे जवळ जवळ एवढ्यातच पूर्ण होतात. याशिवाय भंडारेकार दामोदर भट्टाबरोबर १६ वर्षे राहिले. एलिचपूरला विवाह स्वीकार केला तेव्हा चारपाच वर्षे तरी तेथे राहिले असणार. ओरंगलला मालूच्या घरी वर्षापेक्षा अधिक काळच राहिले या शिवाय स्वामींची किरकोळ भ्रमंन्ति ! याप्रमाणे विचार केला तर सत्तेचाळीस वर्षांपेक्षा बराच मोठा काळ दिसतो. म्हणून 'अवस्थास्वीकार पर्वतीबारावर्षे क्रीडा केली' या स्थानपोथीच्या संयुक्त नोंदणीवरून कुण्या एकापर्वतावर स्वामी बारा वर्षे राहिले असे मानता येत नसून उन्मनी अवस्थेत बारा वर्षे राहिले असे मानणे भाग आहे. व तेवढ्या काळात ते अनेक पर्वतावर फिरले असणेच शक्य आहे. कारण उन्मनीअवस्थेची नोंद तेल्याच्या पत्नीच्या पाठीशी झोपणे, तुंगभद्रानदीत वहात जाणे, उकरड्यात झोपणे, इत्यादी अनेक ठिकाणी आढळते. लीळा चरित्रातही कोण्या एका पर्वतावर बारा वर्षे राहिल्याची नोंद नाही.

पर्वतीक्रीडेचा अर्थ अनेक पर्वतातून क्रीडा केली असे मानल्यावर सालबर्डीचा त्यात समावेश होऊ शकतो. म्हणून चक्रधर स्वामींनी मुक्ताबाईला तेथे भेट दिली याचा असंभव होत नाही.

अनेक पर्वतावर क्रीडा केली असे मानले म्हणजे श्रीपर्वतावर क्रीडा हे पण संभवते मात्र जो पर्यन्त मुक्ताबाईला स्वामींनी श्रीपर्वतावर भेट दिली हे सबळ पुराव्यानिशी सिद्ध होत नाही तोपर्यन्त परंपरेने सालबर्डीस मुक्ताबाईला भेट दिली हे सोडता येणार नाही.

षट्स्थलाची उपलब्धी होईपर्यन्त ज्ञानेश्वरभगिनी शिवाय दुसरी कोणी योगिनी मुक्ताबाई होती हे महानुभाव पंथाशिवाय इतराना माहीत नव्हते. तसेच आणखीही एखादी मुक्ताबाई उपलब्ध झाली तर श्रीपर्वतावरची मुक्ताबाई व सालबर्डीची मुक्ताबाई निरनिराळ्या पण असू शकतील. पण अर्थात श्रीचक्रधर स्वामींनी ज्या मुक्ताबाईला भेट दिली ती आणि श्रीपर्वतावरील मुक्ताबाई भिन्नभिन्न असण्याचाही संभव नाकारता येत नाही.

(२) ज्याप्रमाणे आंध्रात श्रीपर्वताचा पर्वत असा विशेष नामाप्रमाणे उल्लेख करतात त्याचप्रमाणे इतर प्रांतातही जवळच्या डोंगराला डोंगर, पर्वत अशा रीतीने उल्लेख करण्याची प्रथा आहे इतिहास प्रकरणात या संबंधीचा उल्लेख असा आहे.

' श्रीप्रभुमागे भट सा मासु श्रीऋद्धिपुरी होते: मग श्री आचार्ये ऋद्धिपुरी व्यवस्था करौनी मातापुरा निगाले: तेथ पर्वत दृष्टी नमूनि वास्तव्य केले: ह्याळिया पाळिया भिक्षा करिती: पांच दी लेनाहुनी विचारु केला: मग पर्वत सव्य घालौनि पर्वता प्रदक्षिणा घालौनि: मग गंगातीरा निगाले: "

स्थानपोथीचा लेखक महाराष्ट्रातील आणि श्रीपर्वताचा विशेषनामासारखा उल्लेख करतात. ते आंध्रातील लोक इतर प्रांतातील लोकही जर जवळपासच्या डोंगराचा पर्वत म्हणून जर विशेषनामासारखा उल्लेख करीत असतील तर महाराष्ट्रीयाने आंध्रातील श्रीपर्वताचा विशेषनामासारखा उल्लेख कां करावा ? विदर्भातील सालबर्डीच्या डोंगराचा पर्वत या रूपाने विशेषनामासारखा उल्लेख का करू नये ? म्हणून स्थानपोथीत श्रीपर्वतापेक्षा सालबर्डीच्या डोंगराचाच विशेषनामासारखा उल्लेख असणे अधिक शक्य आहे.

(३) श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या अनुयायांना कानडदेशा तेलंगदेशा नवचावे अशी आज्ञा केली हे खरे, पण त्यांनी नेहमीच्या निवासासाठी ती आज्ञा केली आहे. विशेष कार्याकरताही तिकडे

जाऊ नये असा स्वामींच्या आज्ञेचा अभिप्राय नाही. तिकडे गेल्याने या आज्ञेचा भंग होतो असे मानले तरी तो विकार, विकल्प व हिंसा या सारखा पतित करणारा दोष नाही. स्थानाची ठीक निश्चिती नसता तेथे ओटे बांधून त्याला नमस्कार करणे हे विकल्प दोषात समाविष्ट होते. स्वामींची आज्ञा नाही म्हणून काही काळाने मुक्ताबाईची समाधी पाहून त्याठिकाणी ओटा बांधला व त्याला नमस्कार करू लागले हा महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे जसा भयंकर दोष आहे. तसा स्वामींची आज्ञा भंग करून स्थानाचे संशोधन करण्यासाठी आंध्रात जाण्याचा दोष मानता येणार नाही. कारण तसे करणे हा एक धर्माचाच अंश आहे. म्हणूनच आंध्रात जाऊन महानुभावाने निजामाबादादी अनेक ठिकाणी शेकडो वर्षापूर्वीच मठ मंदिरे बांधली व धर्मचाराचे कार्य सुरू केले ते अव्याहतपणे आजही चालू आहे. स्वामींनी आंध्रात जाण्याचे पंथीयांना बंद केले म्हणून तिकडे जाऊन त्या त्या स्थानाचा शोध करू शकले नाहीत ही डॉ. ढेरे यांची स्वमत प्रस्थापनेसाठी क्लृप्ती मात्र आहे. वस्तुतः सालबर्डीच्या स्थानाची निश्चित माहीती होती, म्हणूनच आंध्रात जाऊन त्यांनी संशोधन केले नाही.

स्वामींची आज्ञा आहे ' महाराष्ट्री असावे ' मग इतर प्रदेशात जाऊन राहणे त्यांची आज्ञा भंग करणे नव्हे काय ? पण महानुभावानी उत्तरप्रदेश पंजाब व अफगाणिस्थानातील काबूलसारख्या ठिकाणीसुद्धा जाऊन मठ-मंदिराची स्थापना केलीच की नाही ?

मुनी देवाच्या स्थानाला डॉ. ढेरे परंपरेने ' मणिराजमठ ' या नावाने ओळखले जाते असे म्हणतात.[८] पण या म्हणण्याला त्यांनी प्रमाण दिलेले नाही. हे स्थान शेकडो वर्षापासून महानुभाव पंथाच्या ताब्यात आहे. तेथे फक्त स्वामींच्या संबंधाशिवाय दुसरे मठाची खूण काहीच नाही. आता तेथे मंदीर उभारले आहे. शेकडो वर्षापासून त्या स्थानाला मणिराज मठ हे परंपरेने कसे बरे ओळखले जाईल ? कदाचित ढेरे याना या स्थानाचा संबंध चांगदेव वटेश्वराशी लावणे हा मूळ हेतू असल्याने अशी बादरायणी विसंगती त्यांच्या उल्लेखातून घडलेली असणे अधिक शक्य ठरते. किंवा

श्रीचक्रधर स्वामींच्या स्थानापासून खालीं असलेल्या गुंफाना ' मणिराजमठ ' म्हणत असतील तर ती गोष्ट निराळी. ते स्थान निराळे आहे. त्याचा श्रीचक्रधरस्वामींच्या स्थानाशी संबंध नाही.

## डाकराम म्हणजे सुकळी डाकरामच !

व्याघ्रविद्रावण लीळेचे हे स्थान म्हणजे भंडारा जिल्ह्यातील तिरोडा स्टेशन जवळचे सुकळी डाकराम होय, असे परंपरा मानते. या पारंपारिक समजुतीलाही ' पर्वता ' प्रमाणेच स्थानपोथीकाराचा मुळीच आधार नाही असे डॉ ढेरे म्हणतात [९] त्याऐवजी डाकराम हे स्थान आंध्रमधील सप्तगोदावरीतील द्राक्षाराम हे प्रख्यात शैवक्षेत्र हेच डाकराम असे ते मानतात.[१०] पण याठिकाणी देखील सालबर्डीच्या मुक्ताबाईच्या भेटीच्या स्थानास्थानासारखीच गती आहे. येथेही महानुभाव पंथाने ओटे बांधले आहेत. त्यांना ते नमस्कार करतात व तेथे यात्राही भरते. परमेश्वराच्या संबंधाशिवाय महानुभाव थीय ओटे बांधून नमस्कार करीत नाहीत. ' सुकळी ' या ठिकाणी वाघ येत होता ते स्थान गावापासून थोडे दूर असावे. त्याप्रमाणे सुकळी गाव त्यापासून थोडे दूर आहे. येथे वाघ येण्याचा संबंध अधिक. कदाचित ढेरे यांच्या मताप्रमाणे डाकरामचे सुकळी नाव जमत नसेलहीं. पण सर्वच नावे अपभ्रंशाने तयार होत नसतात. जसे हिरवळीचे जालना, डोमेग्रामचे कमालपूर, इंद्रप्रस्थचे दिल्ली अशा प्रकारची शेकडो उदाहरणे देता येतील. त्याप्रमाणेच डाकरामचे सुकळी हे नाव झालेले आहे. तसे झाल्यानंतर स्वामींच्या स्थानाजवळ पुजारी लोकांनीच त्याला डाकराम म्हटले पण वस्तुतः डाकराम हे सुकळी डाकरामच !

•

डाकराम म्हणजे सुकळीच या विषयी एक महत्त्वाचा पुरावा श्रीनागदेवाश्रम बडनेरा येथील संग्रहालयातील एका जुन्या कमीतकमी ३०० वर्षापूर्वी नकललेल्या एकांक लीळाचरित्राच्या पोथीत आढळला आहे. ती लीळा जशीच्या तशीच पुढे देत आहे व पोथीच्या पानाचा फोटोपण स्वतंत्र पृष्ठावर छापला आहे.

## डाक्रामी व्याघ्रवीद्रावन :

गोसावी डाक्रामा बीजे केले: गोसावीयास पाणीपात्रायें जाले: मग पहुडावेयां भिमेश्वराचीयां देऊळा बीजे करीताती: तव गावीचेनी लोके म्हणीतले आहो महात्मे हो: यां देऊळासीं नको जाओ: एथ वाघु येत असे: गोसावी मागील ऐसी वास: तीयाकडे पाहीली: आणी आगाध चक्रवृत्ती ये आईकीले: म्हणौण णीगाले: गोसावियास चौकी आसन जाले: तव मध्याने ऐकेरात्री वाघु आला: तेने हाक दीधली: गोसावी सींहनादु केला: तो पौलि उडौणी गेला; ते राण सांडौणी पळाला: रावळें गावीचा लोकु: टाळ: घोळ: काहाळा: कांसोळी: मादळ: वाजवीत: हाका बोंबा देत आले: नीच त्याचा बोभाटु आइके आणि बाहीरी नीगे: तीथे दीसी काही नीगतां देखतीनां : मग म्हणती आजी वाघु आवीसावरी बैसला असे : म्हणौन न नीगे : ऐसे भीत भीत दारवठावरी आलें : तव गोसावींयास चौकी आसन असें : देखीले : आरें हें इस्वरु पुरुख रे : ऐसें म्हणौन अवघे साऊमे आलें : दंडवते घातली: मग गोसावीयांते पुसीले: जी एथ वाघु ये कीं : गोसावी म्हणीतले हो आला होता : जी : तरी तो कैसेंनी गेला : गोसावी म्हणीतले तेनें हाक दीधली : एथोनी महीनादू केला: ते हे नव्हे पौळी ऊडौणी पळाला: तें पडली असें तो हे राण सांडौनी पळाला : गोसावी म्हणीतलें बाई: हे चौकी आसन घालुनी बैसले: तै लागौणी हे स्थाण नीरऊपद्रव जाले : मग माहादाईसे वाराणसी गेली होती: तो पव्हातीया वाटा आला: लोकु म्हने: आधी हे स्थान ओस होते: वाघा भेण : मग साचो कारा रामु एथ आला: तो चौकी आसन घालूनी वैसला: तै लागौनी: तो वाघु गेला: तै लागुनी हें स्थान : वस्ते आलें : ऐसी गोष्टी माहादाईसी एऊनी : गोसावी पुढे सांघीतली: तेयांउपरी हे गोस्टी गोसावी माहादाइसा पुढां सांघीतली ॥२२॥

वरील लीळेत माहादाईसा वाराणसीला पव्हाबरोबर गेली असताना एके ठिकाणी वाघामुळे ओस पडलेले स्थान कसे वस्ते झाले, ही गोष्ट सांगितली. ती माहादाईसांनी स्वामींना येऊन सांगितली. त्या गोष्टीचा संबंध आपल्याशीच आहे म्हणून व्याघ्र विद्रावणाची लीळा तिला निरुपीलीं

## डाकराम म्हणजे मुकळी डाकरामच !



डाकराम म्हणजे मुकळी डाकराम याविषयीचा महत्त्वाचा पुरावा श्रीनागदेवाश्रम, बडनेरा ( अमरावती ) यांच्या संग्रहातील सुमारे तीनशे वर्षांपेक्षा जुन्या हस्तलिखितात आढळतो त्याचे हे छायाचित्र !

हे स्थान डाकराम म्हणजे सुकळी हेच संभवते. कारण तेच वाराणसीच्या मार्गावर येऊ शकते. आंध्रातील द्राक्षाराम नव्हे.

केशव बासांच्या रत्नमाळा स्तोत्रावरूनही द्राक्षाराम म्हणजे डाकराम हे जमत नाही. तेच डाकराम असते तर डाकरामचे द्राक्षाराम संस्कृत रूप म्हणून त्याशद्वाचा प्रयोग त्याने आपल्या लीळा वर्णनाच्या श्लोकात केला असता पण तसा केला नाही. रत्नमाळा स्तोत्रातील श्लोक पुढील प्रमाणे आहेत.

कृत्वासौपाणिपात्रं प्रभुरथ विजनं देवता वेश्मयास्यंस्तत्र
व्याघ्रस्छितिर्ज्ञैस्सतनुनगरज नैर्वार्यमाणो जगाम ।।
व्याघ्रस्तस्यागतिज्ञः कुपितश्चमहानादृह संचक्रेतत्रेशोलील
यासौस्वयमपिरुचिरं सिंहनादं जगर्ज्ज ।। १ ।।

व्याघ्रः श्रुत्वाथनादं ससपदि निरगाद्वेप मानोतिभीस्तत्र
त्रेशो सौम्यवासीत्सकळभय हरो योगिराजः परेशः ।।
प्रातःस्संपूजितुं तं नगरवरजना डांकिनी भीमकेशं-
याता व्याघ्र प्रयातं सुरसदृन गतं वीस्यनाथं विसिस्मुः ।।२।।

रत्नमाळा स्तोत्र व्याघ्र विद्रावणलीळा ।।१४४।।

[वरील श्लोक जुन्या पोथीतील (अशुद्ध लिखीत) जसेच्या तसे दिले आहे]

याप्रमाणे डाकाराम म्हणजे द्राक्षाराम नव्हे याचा स्पटपणे खुलासा होतो. उपरिनिर्दिष्ट लीळा आणि रत्नमाळा स्तोत्रातील उल्लेखावरूनसुद्धा कोठेही डाकराम म्हणजे द्राक्षाराम असे नोंदलेले नाही डॉ. ढेरे यांनो मात्र डाकराम म्हणजे द्राक्षाराम असे दाखवितांना ते एक स्वप्नरंजनच ठरले आहे, हे येथे स्पष्ट होते. सारांश, मुक्ताबाईची आणि श्रीचक्रधरांची भेट सालबर्डीच्या डोंगरावर झाली. श्रीशैल पर्वतावर नव्हे आणि डाकराम म्हणजे द्राक्षाराम नसून सुकळी डाकरामच होय या गोष्टींच्या निर्णया प्रत आपण आलो. यानंतर श्रीचक्रधरांच्या सिद्धसंपर्कासंबंधी डॉ. ढेरे यांनी केलेल्या विचारासाठीच तर आता पुढील प्रकरणाची ही वाटचाल !

संदर्भ टीपा–

१. वि. रा. करंदीकर, नवभारत, वाई, सप्टेंबर १९७७ पृष्ठ ५६
२. डॉ. शं. गो. तुळपुळे, (संपा.) लीळा चरित्र, एकांक, पुणे, १९६४, लीळांक ९, पृष्ठ ४
३. रा. चिं. ढेरे, चक्रपाणि, पुणे १९७७ पृ. १२२
४. श्रीनागदेवाश्रम, बडनेरा, अमरावती याच्या संग्रहातील एकांक चरित्राचे अप्रकाशित हस्तलिखित.
५. अ. का. प्रियोळकर (संपा.) महानुभाव: इतिहास–प्रकर्ण, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५ पृ. १५
६. डॉ. यू. म. पठाण (संपा.), स्मृतिस्थळ, औरंगाबाद, १९७४ पृष्ठ ३६, स्मृति क्रमांक ११५.
७. डॉ. वि. भि. कोलते, श्रीचक्रधर चरित्र, मलकापूर, द्वितीयावृत्ती १९७७, पृष्ठ ३०९.
८. रा. चिं. ढेरे, चक्रपाणी, पुणे, १९७७, पृष्ठ १३२.
९. तत्रैव पृष्ठ १२४.
१०. तत्रैव पृष्ठ १२५.

☆ ☆ ☆

## २

# श्रीचक्रधरांचा सिद्धसंपर्क

श्रीचक्रधरांना शैव ठरविण्यासाठी श्री. ढेरे यांनी त्यांच्या सिद्ध-संपर्काची चर्चा आपल्या ग्रंथात केली आहे.[१] "चक्रधरस्वामी ऋद्धिपूराहून येथे आले आणि १२ वर्षापर्यंत श्रीपर्वतावर राहिले. ते तेथील साधनेने भारलेल्या वातावरणाच्या ओढीनेच येथील दीर्घकालीन निवासकालात त्यांचा अनेक सिद्धसाधकांशी प्रत्यक्ष संबंध आला असणार. त्यांची 'करणी' आणि 'कथनी' त्यांनी साक्षात अनुभली असणार. त्यांच्या उत्थानाच्या व पतनाच्या कहाण्या त्यानी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे जाणल्या असणार, अनेक पूर्व-वर्ती सिद्धांच्या गूढ कथा ऐकल्या असणार त्यांच्या प्रकृतीला जे स्वीकरणीय वाटले असेल ते त्यांनी मनाच्या मंजुषेत साठविले असेल, तर जे तिरस्करणीय वाटले असेल त्याचा धिक्कारही केला असेल. नवसंप्रदाय प्रवर्तनानंतर विस्तारलेले त्यांचे विचारविश्व त्यांच्या श्रीपर्वतनिवासाशी निगडीत आहे, याचे भान ठेऊन जर आपण त्याचे विश्लेषण करू लागलो तर आपल्याला त्यात अनेक विचारप्रभावांचा संगम झाल्याचे आढळून येईल.

त्यांच्या वैचारिक घडणीत जसा बौद्ध तांत्रिकांचा वाटा आहे, तसाच शैव आणि शाक्त तंत्रसाधकांचा प्रभाव आहे; जसा वीरशैवांचा ठसा आहे तसाच वीरशैवांच्या कडव्या विरोधाला बळी पडलेल्या जैनांचाही संस्कार आहे. पूर्वजीवनात गुजरातेतील पाशुपत व वैष्णव वातावरणात वाढलेला हा प्रधानपुत्र उत्तरजीवनात एवढे 'विलक्षण' तत्त्वज्ञान कसे मांडतो, याचे उत्तर चक्रधरांच्या श्रीपर्वत निवासात साठवलेले आहे."

लीळा चरित्राच्या अनुरोधाने विचार केला तर ज्यांचे देह स्वामींनी स्वीकारले त्या हरिपाळावर वैष्णवांचे संस्कार होते. त्यांनी गोपाळमंत्राची दीक्षा घेतली होती. आणि वेळप्रसंगी ते गोपाळाची आन वहात असत. लीळाचरित्राच्या एकांकात हा उल्लेख आलेला आहे.[२]

'गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकारीले: गोंपाळमंत्री दीक्षा: गोपाळण्ही आणः जोआंचे व्यसन: राणियेचा पढीयावो: हरिपाळ नांव: '

या उपरोक्त एकांकातील पाचव्या लीळेतील मजकुरावरून असे स्पष्ट होते की हरिपाळ पूर्वी वैष्णव होते. स्वामींनी त्याचे वैष्णवत्व स्वीकारले. पुढे गृहत्यागासाठी रामयात्रेचे निमित्त करून तेथे जाण्याचे दाखविले. त्याऐवजीं कोठल्या शैवाच्या यात्रेला जाण्याचे दाखविले नाही. जे लोक स्वामींनी हरिपाळाचे देह स्वीकारले असे मानीत नाहीत. त्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला तरी, स्वामी श्रीचांगदेव राऊळ अवस्थेत श्रीकृष्ण भगवंताच्या द्वारकेत राहिले होते. कोण्या शैवांच्या साधना केन्द्रात नव्हे म्हणून श्रीचक्रधरांच्या ठिकाणी शैवांची एखादी पुसट खूणसुद्धा आढळत नाही. घरत्याग केल्यानंतर सरळ ऋद्धिपूरला येऊन थोड्याच वेळात शेंगुळवुडड्च्या उद्देशाने शक्तिस्वीकार करून निघून गेले. या वैष्णव धर्म स्वीकारलेल्या हरिपाळ उर्फ श्रीचक्रधर स्वामींना पाशुपत शैव तांत्रिकांच्या साधनेचे महान केंद्र म्हणून गाजत असलेल्या श्रीपर्वताकडे धावत जाण्याचे कारण काय असावे? किंवा तिकडे जाण्यास त्यांना आकर्षण का वाटले असावे? ते ढेरे यांनी दाखविले नाही.

किंबहुना त्यांना तसे दाखविता आलेले नाही. याउलट ऋद्धिपुराहून जवळ असलेल्या सालबर्डीच्या डोंगरावर त्यांनी उन्मनस्क अवस्थेत जाणे अधिक सुसंगत ठरते. पण ढेरे मात्र चक्रधरस्वामी सालबर्डीला न जाता श्रीपर्वतावर जातात असे मानतात. म्हणजेच अशावेळी ढेरे प्रथम अनुमान करतात आणि ते अनुमान म्हणजे जणू प्रस्थापित झालेला सिद्धांत असे मानून त्या आधारे पुढले अनुमान काढत जातात याचा प्रत्यय याठिकाणी स्पष्टपणे येतो.

चक्रपाणिचे प्रस्तावना लेखक प्राध्यापक नरहर कुरुंदकर म्हणतात,[३] "महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय यांचा अभ्यास करीत असताना वैष्णव परंपरांचासुद्धा अभ्यास करणे भाग आहे. या वैष्णव परंपरा आरंभीच्या काळात क्रमाने उत्तरेकडून दक्षिणेकडे सरकत आलेल्या आहेत. आणि नंतरच्या काळात दक्षिणेकडील प्रभावी वैष्णवांनी आपल्या वैष्णव उपासनेत संबंध उत्तरभारत गुंफून दाखविलेला आहे. इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकापासून पुढची दोन-तीनशे वर्षे वैष्णव उपासना उत्तरेकडून दक्षिणेकडे येतात. त्याही महाराष्ट्राला प्रभावित करतात आणि इसवी सनाच्या दहाव्या-अकराव्या शतकापासून वैष्णव परंपरा दक्षिणेकडून उत्तरेकडे जातात. त्याही महाराष्ट्राला प्रभावित करतातच." यावरून असे दिसते की शैवांप्रमाणे वैष्णवांचाही भारतभर प्रभाव होता. मग असे असताना केवळ शैव ठरविण्याच्या उद्देशानेच डॉ. ढेरे यांनी हा प्रपंच केला आहे असे होत नाही काय ?

तत्त्वज्ञानाचा विचार केला तरी महानुभाव पंथाची स्थापना करताना स्वामींनी भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार केला आहे. शैव तत्त्वज्ञानाचा नव्हे. सारांश, श्रीचक्रधरस्वामी व श्री चांगदेव राऊळ या दोघांना देहतः भिन्न व आत्मतः एक मानले तरी त्यांचा हरिपाळ अवस्थेपासून जो श्रीकृष्णाशी संबंध आला तो शेवटपर्यंत अखंड राहिला. या दोघांना देहतः व आत्मतः ही एक मानले तरी द्वारकेत राहण्यापासून महानुभावपंथाची स्थापना करून उत्तरापथाकडे प्रयाण करीपर्यंत हा संबंध

सारखा अखंडच टिकला. सिद्धांच्या संपर्काने स्वामी शैव बनले व नंतर त्यांच्या करणीत व कथनीत साम्य नसल्यामुळे अथवा कोण्या अज्ञात कारणामुळे त्यांच्याशी त्यांचे बिनसले म्हणून त्यांनी नव्या पंथाची स्थापना केली हे डॉ. ढेरे यांचे स्वप्न रंजन मात्र आहे. त्या विषयी त्यांना सबळ पुरावा पुढे करता आला नाही. सिद्धांच्या करणीत व कथनीत एकवाक्यता नसल्यामुळे किंवा कोण्या अज्ञात कारणामुळे सिद्धांशी त्यांचे बिनसले असले तरी शिवाशी बिनसण्याचे तरी काहीच कारण नव्हते. मग शिवाला त्यानी का सोडले ? त्यांना देवता मानूनही चवथ्या पाचव्या दर्जापर्यन्त खाली का आणले ?

मी तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी नाही. त्याविषयाशी निगडीत प्रश्नांची उत्तरे देण्याचा माझा यत्किंचितही अधिकार नाही असे डॉ. ढेरे म्हणत असले तरी ती पळवाट मात्र आहे. तत्त्वज्ञान बाजूला ठेवून केवळ सांस्कृतिक कूटे उलगडताना श्रीचक्रधर स्वामींना पाशुपत शैव म्हणण्याचा मग त्याना अधिकार कसा काय पोहोचतो ?

## श्रीचक्रधरांची आंध्र भ्रमंती–

लीळा चरित्राच्या एकांक भागातील काही लीळावरून असे जरूर दिसते की श्रीचक्रधर स्वामींनी आंध्रात बरेच दिवस पर्यटण केले होते. मात्र त्यांचे हे पर्यटण साळबर्डीच्या रहिवासानंतर व कांती-काटोलला वयस्तंभिनी विद्या स्वीकारल्यानंतरच झाले. आंध्रच्या पर्यटणात काही दिवस श्रीपर्वतावरही त्यांनी निवास केला असेल तर ते सांगता येत नाही. कारण श्रीचक्रधरस्वामींनी आपल्या एकांक भ्रमणाचा इत्थंभूत वृत्तांत सांगितलेला नाही कोणी जर पृच्छा केली तर प्रसंगपरत्वे त्या त्या वेळी त्यांनी विचार प्रकटीकरण केलेले आहे. या आंध्रपरिभ्रमणावधित श्रीपर्वताशिवायही कोठे सिद्धांशी संपर्क येणे अशक्य नाही. कारण शैवनाथ सिद्धांनी संपूर्ण भारतभर आपला प्रभाव पाडला होता. ते आंध्रात फिरले नसतील असे थोडेच आहे ? मात्र सिद्धांचा संपर्क येणे म्हणजे त्यांचें अनुयायित्व स्वीकारणे नव्हे. त्यांच्या गुणावगुणांचे, चांगल्या-वाईट वाग-

णुकीचे सूक्ष्मावलोकन करणे श्रीचक्रधर स्वामी सारख्यांना अशक्य नाही. सिद्धांच्या संबंधीचे बरेचसे ज्ञान श्रीचक्रधर स्वामींना होते. तेच त्यांनी वेळोवेळी आपल्या अनुयायांना सांगितले. महानुभाव पंथ श्रीचक्रधर-स्वामींना परमेश्वराचा अवतार मानतो व अशा परमेश्वर अवताराला इतराकडून विशेष रूपाने ज्ञान मिळविण्याची गरज नसते. परंतु इतरांनी समजा त्याना परमेश्वर अवतार मानले नाही तरी असामान्य व्यक्ती किंवा थोर महापुरुष तर त्यांना मानावे लागेल. अशा महापुरुषांना कोणाचे अनुयायित्व स्वीकारून ज्ञान मिळविण्याची काय गरज ? डॉ वि. भि. कोलते यांचा महानुभाव पंथाशी सुमारे पन्नास वर्षे तरी निकटचा संबंध आहे. त्यानी सपूर्ण आयुष्य महानुभाव वाङ्मयाच्या आणि तत्त्वज्ञानाच्या संशोधनात घालविले. तत्त्वज्ञानाचा अभ्यास व वाङ्मयाचा शोध घेत असताना महानुभाव पंथाचे महंत आराध्य मुरलीधर शास्त्री महानुभाव या पुस्तकाचे एक लेखक यांना ते आदरातिशयाने गुरुवर्य म्हणूनही कधी संबोधतात. पण डॉ. कोलते यानी महानुभाव पंथ स्वीकारला आहे काय ? त्याप्रमाणे इतर काही संशोधक, साहित्यिक आहेत की जे महानुभाव पंथाविषयी आदराचे उद्‌गार काढतात पण त्यांनी महानुभाव पंथ स्वीकारलेला नाही. म्हणजे पंथीय वाङ्मयाविषयी आदराचे उद्‌गार काढणारे सगळे महानुभाव पंथीय झाले आहेत काय? तसेच श्री चक्रधर स्वामींचा काही सिद्धांशी संपर्क आल्याने ते सिद्धांचे अनुयायी कसे होऊ शकतील ? हरिपाळ अवस्थेपासून शेवटपर्यंत श्रीचक्रधर स्वामींनी गोपाळकृष्णाच्या भक्तीचा प्रचार केला पण शैव भक्तीचा त्यानी कधीही केला नाही.

श्रीचक्रधर स्वामींनी वैराग्य ते भर्तृहरीचे, उर्ध्वरेता तो गोरक्ष, कान्हपादाचे पतन, लुईपाचे विकृताचरण इ. सिद्धांतासंबंधी यथार्थ रुपाने आपले मत व्यक्त केले ते गुणग्राहकतेचे, अवगुणाविषयी तिरस्काराचे सूक्ष्म निरीक्षणाचे द्योतक आहेत.

## नाथवाणी ते निकी:

श्रीचक्रधरस्वामींना सिद्धांच्या आणि नाथांच्या केवळ कथांचाच परि-

सारखा अखंडच टिकला. सिद्धांच्या संपर्काने स्वामी शैव बनले व नंतर त्यांच्या करणीत व कथनीत साम्य नसल्यामुळे अथवा कोण्या अज्ञात कारणामुळे त्यांच्याशी त्यांचे बिनसले म्हणून त्यांनी नव्या पंथाची स्थापना केली हे डॉ. ढेरे यांचे स्वप्नरंजन मात्र आहे. त्या विषयी त्यांना सबळ पुरावा पुढे करता आला नाही. सिद्धांच्या करणीत व कथनीत एकवाक्यता नसल्यामुळे किंवा कोण्या अज्ञात कारणामुळे सिद्धांशी त्यांचे बिनसले असले तरी शिवाशी बिनसण्याचे तरी काहीच कारण नव्हते. मग शिवाला त्यानी का सोडले ? त्यांना देवता मानूनही चवथ्या पाचव्या दर्जापर्यन्त खाली का आणले ?

मी तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी नाही. त्याविषयाशी निगडीत प्रश्नांची उत्तरे देण्याचा माझा यत्किंचितही अधिकार नाही असे डॉ. ढेरे म्हणत असले तरी ती पळवाट मात्र आहे. तत्त्वज्ञान बाजूला ठेवून केवळ सांस्कृतिक कूटे उलगडताना श्रीचक्रधर स्वामींना पाशुपत शैव म्हणण्याचा मग त्याना अधिकार कसा काय पोहोचतो ?

## श्रीचक्रधरांची आंध्र भ्रमंती–

लीळा चरित्राच्या एकांक भागातील काही लीळावरून असे जरूर दिसते की श्रीचक्रधर स्वामींनी आंध्रात बरेच दिवस पर्यटण केले होते. मात्र त्यांचे हे पर्यटण साळबर्डीच्या रहिवासानंतर व कांती-काटोलला वयस्तंभिनी विद्या स्वीकारल्यानंतरच झाले. आंध्रच्या पर्यटणात काही दिवस श्रीपर्वतावरही त्यांनी निवास केला असेल तर ते सांगता येत नाही. कारण श्रीचक्रधरस्वामींनी आपल्या एकांक भ्रमणाचा इत्थंभूत वृत्तांत सांगितलेला नाही कोणी जर पृच्छा केली तर प्रसंगपरत्वे त्या त्या वेळी त्यांनी विचार प्रकटीकरण केलेले आहे. या आंध्रपरिभ्रमणावधित श्रीपर्वताशिवायही कोठे सिद्धांशी संपर्क येणे अशक्य नाही. कारण शैवनाथ सिद्धांनी संपूर्ण भारतभर आपला प्रभाव पाडला होता. ते आंध्रात फिरले नसतील असे थोडेच आहे ? मात्र सिद्धांचा संपर्क येणे म्हणजे त्यांचें अनुयायित्व स्वीकारणे नव्हे. त्यांच्या गुणावगुणांचे, चांगल्या-वाईट वाग-

णुकीचे सूक्ष्मावलोकन करणे श्रीचक्रधर स्वामी सारख्यांना अशक्य नाही. सिद्धांच्या संबंधीचे बरेचसे ज्ञान श्रीचक्रधर स्वामींना होते. तेच त्यांनी वेळोवेळी आपल्या अनुयायांना सांगितले. महानुभाव पंथ श्रीचक्रधर-स्वामींना परमेश्वराचा अवतार मानतो व अशा परमेश्वर अवताराला इतराकडून विशेष रूपाने ज्ञान मिळविण्याची गरज नसते. परंतु इतरांनी समजा त्याना परमेश्वर अवतार मानले नाही तरी असामान्य व्यक्ती किंवा थोर महापुरुष तर त्यांना मानावे लागेल. अशा महापुरुषांना कोणाचे अनुयायित्व स्वीकारून ज्ञान मिळविण्याची काय गरज ? डॉ वि. भि. कोलते यांचा महानुभाव पंथाशी सुमारे पन्नास वर्षे तरी निकटचा संबंध आहे. त्यानी सपूर्ण आयुष्य महानुभाव वाङ्मयाच्या आणि तत्त्वज्ञानाच्या संशोधनात घालविले. तत्त्वज्ञानाचा अभ्यास व वाङ्मयाचा शोध घेत असताना महानुभाव पंथाचे महंत आराध्य मुरलीधर शास्त्री महानुभाव या पुस्तकाचे एक लेखक यांना ते आदरातिशयाने गुरुवर्य म्हणूनही कधी संबोधतात. पण डॉ. कोलते यानी महानुभाव पंथ स्वीकारला आहे काय ? त्याप्रमाणे इतर काही संशोधक, साहित्यिक आहेत की जे महानुभाव पंथाविषयी आदराचे उद्‌गार काढतात पण त्यांनी महानुभाव पंथ स्वीकारलेला नाही. म्हणजे पंथीय वाङ्मयाविषयी आदराचे उद्‌गार काढणारे सगळे महानुभाव पंथीय झाले आहेत काय? तसेच श्री चक्रधर स्वामींचा काही सिद्धांशी संपर्क आल्याने ते सिद्धांचे अनुयायी कसे होऊ शकतील ? हरिपाळ अवस्थेपासून शेवटपर्यंत श्रीचक्रधर स्वामींनी गोपाळकृष्णाच्या भक्तीचा प्रचार केला पण शैव भक्तीचा त्यानी कधीही केला नाही.

श्रीचक्रधर स्वामींनी वैराग्य ते भर्तृहरीचे, उर्ध्वरेता तो गोरक्ष, कान्हपादाचे पतन, लुईपाचे विकृताचरण इ. सिद्धांतासंबंधी यथार्थ रुपाने आपले मत व्यक्त केले ते गुणग्राहकतेचे, अवगुणाविषयी तिरस्काराचे सूक्ष्म निरीक्षणाचे द्योतक आहेत.

### नाथवाणी ते निकी:

श्रीचक्रधरस्वामींना सिद्धांच्या आणि नाथांच्या केवळ कथांचाच परि-

चय होता असे नव्हे, तर त्यांच्या गीतांशीही त्यांनी समरसता प्राप्त केली होती. एकदा आबैसाने त्यांच्याजवळ बसून एक चौपदी गायली. तेव्हा स्वामी आनंदाने उद्‌गारले की, ' हे नाथवाणी: हे सीधवाणी: नाथवाणी ती निकी: नाथवाणी सीधवाणी गावों ए: तैसे अर्वाचीक गावों नैए: "स्वामींनी केलेला हा सिद्धवाणीचा गौरव बोलका आहे. त्या वाणीच्या निकेपणाचा आणि गेयतेचा त्यानी केलेला गौरव सार्थ आहे. त्यांना त्या वाणीचे आकर्षण असल्याने शिष्य मुखाने तिचे श्रवण करण्यात जसा आनंद अनुभवीत, तसाच स्वत: गाण्यात अनुभवीत."

डॉ. ढरे यांनी वरीलप्रमाणे नाथवाणीचा श्रीचक्रधरस्वामींशी असलेल्या परिचयाचा उल्लेख करून त्यांच्याशी सिद्धसंपर्काचा धागा जुळविलेला आहे. पण वस्तुस्थिती तशी नाही. आबाईसाला स्वामी ' नाथवाणी ते निकी ' असे म्हणाले त्यामुळे स्वामींनी त्या वाणीचा खास गौरव केला किंवा आपल्या अनुयायांना ते गाणे नित्य आचरणात आणण्याची आज्ञा केली असे नाही. तिचे निकेपण एवढयापुरतेच सांगितले की आर्वाचिक गाणे, श्रृङ्गाररस प्रधान किंवा हास्य विनोदाचे जे असते त्यामुळे साधकांचे संस्कार खराब होऊन त्याच्या पतनाचे भय निर्माण होते. तसे नाथवाणीच्या गाण्याने होत नाही.

कारण तीत विरक्तीचा विषय असतो. विषयवासनांना उत्तेजन देण्याचा नसतो. म्हणूनच स्वामी म्हणाले, 'नाथवाणी सिद्धवाणी गावों ए: तैसे आर्वाचीक गावों म्हणो न एती: ' याचा अर्थ मात्र असा नव्हे की, त्यांनी शैवत्व स्वीकारले होते. आर्वाचाक गाण्याविषयी त्यांनी आणखी एकदा असाच निषेध केला होता. त्यातूनच ' गीत विखो ' या निषेध आज्ञेचा उदय झाला आहे ता येणे प्रमाणे—

स्वामींचा मुक्काम डोमेग्राम येथे असतांना नागदेवाचार्यांनी एकदा श्रीचक्रधर स्वामींना विचारले होते की, साधकांना करमत नसेल त्यावेळी गाता येईल का ? त्यावेळी ते म्हणाले होते की, ' गीत विखो ' कारण अशा करमणुकीच्यावेळी शृंगारिक गाणे गाईले जाण्याची शक्यता असते

सारांश सर्व गीते गाण्याला स्वामींचा विरोध नव्हता, पण अर्वाचीन गीत गायनाला मात्र कठोर विरोध होता. पण ढेरे यांना स्वामींनी केलेला सिद्ध-वाणीचा गौरव शैवत्वाशी जोडण्यात फार बोलका वाटतो. हे मत डॉ. वि. रा. करंदीकर यांनाही नापसंत आहे ते म्हणतात.

" गुरु परंपरेव्यतिरिक्त सिद्धांच्या व नाथांच्या संपर्काच्या ज्या खुणा चक्रधरांच्या पुढील जीवनात आढळतात म्हणून ढेरे देतात, त्यांचेही निरी-क्षण केले तर हाताला विशेष काही लागत नाही. " वैराग्य ते भर्तृहरीचे " " ऊर्ध्वरेता तो गोरक्ष " किंवा " नाथवाणी सिद्धवाणी निकी " हे अधून मधून निघालेले उद्‌गार आहेत; त्यांत चक्रधरांची केवळ काही प्रासंगिक मते व्यक्त होतात असे वाटते. नाथपंथातील गीते आवडण्याचा किंवा म्हण-ण्याचा उल्लेख केवळ प्रशंसापर आहे, त्यांच्या नित्य परिपाठात ती गीते होती असे आढळत नाही.नाथपंथी जोग्यांचा पोषाख पाहिल्यावर तो धारण करावा असे चक्रधरांना जे वाटले, त्याबद्दलही तेच म्हणावे लागते; तो काही त्यांनी नेहमीचा वेष म्हणून पत्करलेला दिसत नाही. "

एकदा एका मळ्यातील महालक्ष्मीच्या मंदिरात स्वामी विहरणासाठी गेले असतांना तेथे त्याना एक जोग्याचा वेश (गळकंठा, खापरी, काठी इ.) आढला. तो पाहून त्यांना क्षणैक 'जोगी होण्याची' प्रवृत्ती निर्माण झाली. त्यानी आपली वस्त्रे उतरून चौकात ठेवली, मुखाला विभुती फासली, सर्वां-गाला भस्म लावले, एका हाती खापरी घेतली, दुसऱ्या हाती काठी घेतली व अशा जोगी वेशात उभे राहून त्यानी भिक्षागीत गायला प्रारंभ केला.

कर धरि खापर । भिक्षापात्र ।
भस्म विधुळीत । विगळसीत गात्र ।
नित्य चळ चित्त ।।
मंद मंद मनसो विगळित गात्र ।
मन भुलि रे, मन भुलि रे ।।

हे गीत गाऊन झाल्यावर, 'मागील सीध एणें वचने भिक्षा करिति ।' असे त्यांनी बाइसेला सांगितले. जोगी वेश दिसताच तो परिधान करण्याची

व त्या वेशात जोग्याचे भिक्षागीत गाण्याची क्रीडा स्वामींनी करावी, हा केवळ अपघात नव्हे. या क्रीडेच्या प्रवृत्तीतून त्यांचा नाथसिद्ध–संपर्कच व्यक्त होत आहे असे ढेरे यांनी उपरोक्त लीळेच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. पण महालक्ष्मीच्या देवळात गळकंठा काठी घेऊन जोगियांचा वेश परिधान केला. ते त्यांच्या विनोदबुद्धिचेच द्योतक आहे. त्यांच्या विनोदीस्वभावाच्या अनेक खुणा लीळाचरित्रात विखुरलेल्या आहेत. स्वामींना जर जोग्यांच्या वेषावद्दल प्रेम असते तर तोच वेश आपल्या अनुयायांना धारण करण्यास त्यांनी सांगितले असते: पण तसे त्यांनी केलेले आढळत नाही. म्हणून केवळ क्रीडेच्या प्रवृत्तीतून त्यांचे नाथसिद्धत्व व्यक्त करणे धाडसाचे ठरणार आहे.

श्रीचक्रधर स्वामींचा अन्य संप्रदायाच्या सिद्धांशी जसा संबंध आलेला होता तसाच रससिद्धांशी आणि त्यांच्या रसविद्येशी आलेला होता असे मानायला लीळाचरित्रात व आद्यवाङ्मयात आधार आहेत असे डॉ. ढरे यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच रसविद्येचे महान आचार्य नागार्जुन आणि सिद्धकथांशी स्वामी चांगले परिचित होते. याचाही त्यांनी उल्लेख केला आहे. श्रीचक्रधर स्वामींना तांब्याचे सोने व कथलाचे रुपे करण्याची विद्या ज्ञात होती. परंतु ते त्या विद्येचा वापर करण्याच्या विरुद्ध होते असे लीळाचरित्रातील दोन लीळांच्या आधारे श्री. ढेरे यांनी दाखवलेच आहे परमेश्वर सान्निध्याला बाधक ठरणाऱ्या या द्रव्याकांक्षा प्रक्रियेचा स्वामींनी वारंवार निषेध केला असला तरी त्या विद्येशी ते जवळून परिचित होते. तसेच स्वामींनी सांगितलेल्या रससिद्धीच्या कथा, तांब्याचे सोने करण्यासारख्या प्रक्रियाविषयी प्रकट केलेली अभिज्ञता, त्यानी निवेदिलेले रसप्रकार यावरूनच केवळ रसविद्येमुळे ते सिद्धानुयायी होते. असे डॉ. ढेरे मानतात. व पुढे म्हणतात, रससिद्ध नागार्जुनाने रससाधनेची भट्टी ज्या पर्वतावर लावली होती. तो आंध्रमधील श्रीपर्वत होय. असे ढेरे मानतात. पण रसविद्या परिचयासाठी श्रीशैल पर्वतावर जाण्याची किंवा शैवत्व स्वीकारण्याची आवश्यकता नाही. कारण रसविद्येचे स्थान त्यावेळी महाराष्ट्रातसुद्धा होतेच

हे डॉ. ढेरे यांनी पृ. १९५ वर स्पष्ट केलेलेच आहे. त्याशिवाय श्रीचक्रधर स्वामींना अश्वविद्या चांगली अवगत होती, हे लीळाचरित्राच्या एकांका-मध्ये आढळते. तसेच चुना तयार करण्याचे ज्ञान, नांगर चालविण्याचे विशेष ज्ञान व यासारख्या अनेक विद्यामध्ये पारंगत असणे असे श्रीचक्रधर स्वामींचे व्यक्तित्व होते. त्यांना कोणाच्याही संपर्काची वा अनुयायित्वाची गरज भासणे शक्यच नाही.

स्वामी जसे अनेक विद्या पारंगत होते, तसेच ज्ञानेश्वरही होते, 'ज्ञाने-श्वरी'त अनेक शास्त्रांचे संदर्भ जसे येतात तसेच ज्ञानेश्वरांच्या व्यावहारिक सूक्ष्म अवलोकनातून अनुभवास आलेले दृष्टांतही येतात. षड्शास्त्राप्रमा-णेच कामशास्त्राचेही ज्ञानेश्वरांचे अध्ययन बारकाव्याचे होते. व त्याला अंतरदृष्टीची जोड मिळाली होती. म्हणून ज्याप्रमाणे ज्ञानदेवांना प्रपंचा-तील दृष्टांत देण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे त्यांना 'प्रापंचिक' म्हणता येणार नाही, त्याचप्रमाणे स्वामींना शैवसंप्रदायाचा व त्यांच्या विविध ज्ञानाचा परिचय होता, म्हणून त्याना शैव म्हणता येणार नाही.

संदर्भ टीपा–

१) रा. चिं. ढेरे, 'चक्रपाणि', पुणे १९७७, पृष्ठ १८०.

२) डॉ. शं. गो. तुळपुले, (संपा.) 'लीळाचरित्र', एकांक, पुणे, ३ री आवृत्ती, १९७२, पृष्ठ २, लीळांक ५.

३) प्रा. नरहर कुरुंदकर, 'चक्रपाणि', प्रस्तावना, पृष्ठ २३.

☆ ☆ ☆

३

# श्रीचांगदेव राऊळ

श्रीचक्रधर स्वामींच्या सिद्धसंपर्काचे रहस्य त्यांच्या गुरु परंपरेत शोधावयास हवे असे रामचंद्र चिंतामण ढेरे म्हणतात.[1] त्यापुढे ती परंपरा श्रीदत्तात्रेय–श्रीचांगदेव राऊळ–श्री गुंडम राऊळ–श्रीचक्रधरस्वामी अशी देतात. पण पुढे ते म्हणतात की, "त्यांची परंपरा दत्तात्रेयादी असली तरी ते स्वतः कृष्णभक्तीचे पुरस्कर्ते आहेत आपल्या परंपरेचा आणि कृष्ण-भक्तीचा समन्वय साधण्यासाठी त्यांनी 'पंचकृष्ण' कल्पना स्वीकारून श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय, श्रीचांगदेव राऊळ, श्रीगुंडम राऊळ आणि आपण स्वतः असे पाच परमेश्वरावतार हे आपल्या अनुयायांपुढे पूजाविषय म्हणून ठेवले. 'या मार्गासि श्रीदत्तात्रेयप्रभु आदिकारण' असे चक्रधर स्वामींचे वचन आहे. 'श्रीदत्तात्रेय प्रभूचा चहू युगी अवतारु' असेही त्यांनी म्हटले आहे. चांग-देव राऊळ यांना दत्तात्रेयानी माहूर या स्थानी व्याघ्ररुपाने दर्शन देऊन कृतार्थ केले, असे त्यांच्या चरित्रात वर्णन आढळते. 'सैह्याद्रलीळा' या नावाने गद्यात वर्णिलेल्या सात लीळा महानुभाव वाङ्मयात प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे रवळो बासांनी रचलेला 'सैह्याद्र वर्णन' हा माहूर माहात्म्यपर ग्रंथ दत्त गौरवाने भरलेला आहे. याशिवाय महानुभाव वाङ्मयात दत्तात्रेया विषयीचा उत्कट भक्तिभाव जागोजाग प्रकटलेला दिसतो.

विशेष म्हणजे काही वेळा दत्तात्रेयाला 'आदिनाथ' या नावानेही महानुभाव ग्रंथकार संबोधताना दिसतात. केसोबासांनी 'मूर्ति प्रकाश' या ग्रंथाचे मंगलाचरण करताना दत्तात्रेयाना 'आदिनाथ' म्हटले आहे–

"जय जय अविक्रया अच्युता । जय जय अप्रतिरुपा अद्वीता
जय बाह्याभ्यांतरी आदिनाथा । तूंचि अससी ।।११।।"

ढेरे यांच्या उपरोक्त विवेचनाच्या मतितार्थाधारे त्यांचे मते 'आदिनाथ' म्हणजे 'शिव'! केसोबासाने दत्तात्रेयांना 'आदिनाथ' म्हटले म्हणजे ते 'शिवस्वरूप' ठरतात. म्हणून ते शैवही ठरतात. श्रीचांगदेव राऊळांबाबत केसोबास 'मूर्तिप्रकाशात' म्हणतात. [२]

घेउनि मनुक्षवेखाची अवगणी । केली अवधूतधर्माची संपादणी ।
द्वारके क्रीडले श्रीचक्रपाणी । तया नमन माझे ।।१५।।

या ओवीत श्रीरचांगदेव राऊळाने अवधूत धर्माची म्हणजे नाथपंथाचो संपादणी केली म्हणजे स्वीकार केला असे स्पष्ट म्हटले आहे. म्हणून श्रीचांगदेव राऊळ शैव होते हे पण स्पष्ट होते. गुंडम राऊळांच्या शैवत्वाविषयी डॉ. ढेरे यांनी चांगदेव राऊळापासून शक्ती स्वीकाराच्या लीळेद्वारे दाखविले आहे की, गुंडम राऊळ हेही शैव होते. श्रीचक्रपाणी चरित्रात या शक्ति स्वीकाराचे वर्णन असे आले आहे [३]

"श्रीचक्रपाणी राऊळी श्रीप्रभूते देखिले : आन श्रीप्रभुकडे बीजे केले : श्रीचक्रपाणी राऊळाचा ऊजवा करी खरीटा असे : डावीए करी सूप असे : श्रीचक्रपाणी राऊळी श्रीप्रभुचेयां माथांवरि सूप ठेवीले : वरि खराटे याच्या घावो दिधला : दोंही देवा भेटी जाली : मग खेव दीधले : तेथ श्रीप्रभु परावर स्वीकरिले : अवर आच्छादिले : पर प्रकट केले : ।।१।। श्रीचक्रपाणी राऊळी श्रीप्रभुचा दंडु मोडीला : तो गोमतीये आंतु घातला : देव देवपट सुपी भरुणी गोमतिएमध्ये पाणीयात निक्षेपीले : मग श्रीचक्रपाणी राऊळीं बीजे केलें : श्रीप्रभुसी आपुलेनि करे झोळी दीधली : मग श्रीप्रभु

अवधूत वेष स्वीकरिला : श्रीप्रभु द्वारावतीए माजी भीक्षा करिती : तीये झोळी माजि पूडि घेत: गोमतीचा तीरो आरोगणा करीति: एसे कीतीएक दीवस तेथ राज्य केले : मग श्रीप्रभु चक्रपाणी राऊळासी आज्ञा मागौणी ऋद्धीपुरा बीजे केले : ॥ १२ ॥"

याप्रमाणे श्रीचक्रपाणि चरित्रात विशेष वर्णन करून त्याचे देवेदेवपट सुपात भरून ते नदी प्रवाहात बुडविलें आणि आपल्या गुंफेची वाट धरली. श्रीप्रभुही त्यांच्या मागोमाग त्यांच्या गुंफेत गेले.
तेथे गेल्यानंतर चांगदेव राऊळांनी श्रीप्रभूशी आपल्या हातून झोळी दिली त्यावेळी श्रीप्रभुंनी अवधूत वेष स्वीकारला.

वरील सर्व उदाहरणावरून श्री. ढेरे यांच्या मते श्री चक्रधर स्वामींची गुरुपरंपरा शैव ठरते. त्यामुळेच त्यांना श्रीगोविंदप्रभुजवळ व शक्ति स्वीकारानंतर श्रीपर्वताकडे जाण्याचे आकर्षण वाटले असे ढेरे यांना वाटते. ज्या मूर्तिप्रकाशातील उदाहरण डॉ. ढेरे देतात त्याचे कर्ते केसोबास हे कोणाचे शिष्य ? महानुभाव पंथाचे आद्य आचार्य श्रीनागदेवाचार्यांचेना ? 'मूर्तिप्रकाश' लिहिण्यापूर्वी केशोबासांना श्रीचक्रधरस्वामींच्या तत्त्वज्ञानाची जाणीव होती का नव्हती ? नव्हती म्हणावे तर 'मूर्तिप्रकाश' ग्रंथ चक्रधरस्वामींच्या तत्त्वज्ञानाने भरलेला आहे. याशिवाय त्यानंतर लगेच केशोबासाने स्वामींच्या तत्त्वज्ञानात्मक सूत्रपाठांचे व दृष्टांत पाठाचे संकलन केले. हे दोन्ही ग्रंथ श्रीचक्रधर स्वामींच्या तत्त्वज्ञानाचा मूळ पाया आहे. यावरच महानुभाव तत्त्वज्ञानाच्या वाङ्मयाचा वटवृक्ष विस्तारला आहे. या दोन ग्रंथाच्या आधारावर महानुभाव तत्त्वज्ञानासंबंधी भाष्य, महाभाष्य, प्रबंध, प्रमेये असे शेकडो ग्रंथ निर्माण झाले आहेत. स्वामींच्या या तत्त्वज्ञानात त्यांनी अन्वयव्यावृत्ती या प्रकरणात शिवाला देवता म्हटले आहे. परमेश्वर म्हटलेले नाही. श्रीदत्तात्रेयप्रभू, श्रीचांगदेव राऊळ, श्रीगुंडम राऊळ यांना त्यांनी परमेश्वरावतार मानले आहे. त्या तत्त्वज्ञानानुसार देवतेला परमेश्वर मानणे विकल्प दोष आहे, आणि परमेश्वराला देवता मानणे विपरित बुद्धी दोष आहे या दोन्ही दोषानी 'विकल्पमात्रे जाय :

जैथौनि होंए : तेथिच्या विपरित बुद्धीं जाय ' हे दोष आचरणारा धर्मभ्रष्ट होतो असे स्वामींनी निरुपिले आहे.

केशोबासांनी श्रीदत्तात्रेय प्रभूंना आदिनाथ व श्रीचांगदेव राऊळांना अवधूत म्हणून मूर्तिप्रकाशाच्या नमनाच्या ओवीत म्हटले आहे. त्यापैकी आदिनाथाचा अर्थ शिवस्वरुप अर्थात देवता व अवधूत पदाचा शिवभक्त शैव असा अर्थ अभिप्रेत होता असे मानले तर त्यांना श्रीचक्रधर स्वामींच्या तत्त्वज्ञानाचा विसर पडला होता. व ते धर्मपतित झाले होते असे मानावे लागेल. पण स्मृतिस्थळकाराने त्यांच्या रेखाटलेल्या चरित्राचा सूक्ष्म दृष्टीने विचार केला तर तसे म्हणता येणे शक्य नाही.

"भट्टोंबासीं तोखौनि म्हणितलें . 'माझे शास्त्र म्हाइंभटा लक्ष्मीधर भटाचेनि नूजळेचि: ते पंडित केशोदेयांसी चर्चा करीता उजळलें :' " ऐसे तोखलें : स्मृतिस्थळ :।। ६८ ।।

" पंडिता : केशवाद्या: सर्वांगीं काई देखणें असे ? देखणे ते डोळेचि कीं ! तैसे तुम्ही माझे डोळे कीं गा पंडीता : केशवदेया ! " स्मृतिस्थळ : ।। ९५ ।।

मग केशोबासांना आदिनाथ पदाचा कोणता अर्थ अभिप्रेत असावा, ही बाब विचार करण्यासारखी आहे. आदिनाथ पदाचा मुख्य मूळ अर्थ जगाचा सर्वप्रथम स्वामी-नियामक शास्ता असाच आहे व अवधूत पदाचा विरक्त असा अर्थ कोशकाराने दिला आहे. हे शब्द काहीसे शिव व शिवभक्त या अर्थाने शैवात रुढ झाले आहेत. म्हणून यांना अनेकार्थक मानावे लागल.

एकेका शब्दाचे अनेक अर्थ ज्याठिकाणी असतात. त्या ठिकाणी कोणत्या शब्दाचा कोठे कोणता अर्थ घ्यावा असे काही शास्त्रीय नियम आहेत. ते काव्यप्रकाशकार मम्मट आणि साहित्यदर्पणकार विश्वनाथ आदि विद्वानांनी आपापल्या ग्रंथात दिलेले आहेत ते असे—

' संयोगो विप्रयोगश्च साहचर्यं विरोधिता ।
अर्थः प्रकरणं लिङ्ग शद्बस्यान्यस्य सन्निधिः ॥
सामर्थ्यमौचिती देशः कालो व्यक्तिः स्वरादयः ।
शब्दार्थस्यानच्छदे विषेस्मृतिहेतवः ॥

हरीचे बेडकी, घोडा, विष्णू आणि वायू असे अनेक अर्थ असूनही सशङ्खचक्रो हरि येथे शंख चक्राच्या संयोगाने हरी म्हणजे विष्णू असाच अर्थ घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे बाकीच्या नियमांचाही विचार करावा लागतो. यात एक औचिती नियम आहे. त्या नियमाप्रमाणे ज्याठिकाणी जो उचित अर्थ असेल त्या ठिकाणी तोच घेतला जातो. केशोबासांनी मूर्तीप्रकाशात लिहिलेल्या आदिनाथ व अवधूत पदाचा अर्थ महानुभावपंथीय तत्त्वज्ञानाला अनुसरूनच घ्यावा लागेल कारण केशोबास महानुभाव पंथीय होते, म्हणून श्रीचक्रधर स्वामींनी ज्या श्रीदत्तात्रेयप्रभूंना व श्रीचांगदेव राऊळांना परमेश्वर अवतार मानले त्या श्रीदत्तात्रेय प्रभूंना केशोबास शिव व श्रीचांगदेव राऊळांना शिवभक्त म्हणून कधीच लिहिणार नाहीत

शैवातही शिवाला आदिनाथ या करताच म्हणतात की, त्या संप्रदायाची शिव पहिली पूज्य व्यक्ती होय ! जैनातही पहिल्या तीर्थंकराला आदिनाथच म्हणतात. महानुभाव पंथातही श्रीदत्तात्रेय प्रभु पहिली पूज्य व्यक्ती होय, कारण गुरु परंपरे प्रमाणे ते पहिले आहेत ' या मार्गीसी श्री दत्तात्रेयप्रभु आदिकरण ' असें म्हणून ते सूचित केले आहे.

' अवधूत ' म्हणजे ' विरक्त ' श्रीगुंडम राऊळ तथा श्रीचांगदेव राऊळ हे विरक्त अवस्थेत विहरत होते म्हणून त्यांना केशोबासाने ' अवधूत ' म्हटलेलेआहे. श्रीचांगदेव राऊळाने श्रीगुंडम राऊळांना अवधूत दीक्षा दिली म्हणजे विरक्त राहण्याची दीक्षा दिली, शैव दीक्षा दिली नाही. अवधूत शब्द शैवाबद्दल त्या संप्रदायात रूढ असला तरी 'विरक्त' या अर्थीही वापरला जातोच. महानुभाव शब्द संप्रदायवाचक असला तरी महान प्रभाव असलेल्या व्यक्तीसाठीही तो शब्द वापरला

आतोच म्हणून नुसत्या अवधूत शब्दाने श्रीचांगदेव राऊळ शैव होते असा निर्णय करणे हे केव्हाही संयुक्तिक ठरणार नाही.

डॉ. ढेरे श्रीचक्रधर स्वामींना शैव ठरविण्यासाठी श्री चक्रधरस्वामींचे गुरु गुंडम राऊळ व परमगुरु श्रीचांगदेव राऊळ या दोन्ही नांवाच्या पुढे जो 'राऊळ' शब्द अन्वित झाला आहे त्या शब्दाची चिकित्सा अशी करतात–[४]

" राऊळ म्हणजे लाकुल– "

चांगदेव राऊळ आणि त्यांचे गुंडम राऊळादि अनेक शिष्य यांच्या नांवातील 'राऊळ' हे पद नाथ, राशि, शिव, ध्वज या उत्तरपदांनी युक्त अशा शैव साधूंच्या नांवाप्रमाणेच संप्रदाय द्योतक आहे, हे उघड आहे. यादवकालीन मराठी वाङ्मयात 'राऊळ' हा शब्द सद्गुरु वगैरेंचा सादर उल्लेख करण्याच्या निमित्ताने वारंवार आलेला आढळतो. विवेकसिंधूमध्ये तो या अर्थाने अनेकदा वापरलेला दिसतो. हा शब्द 'राजकुल' पासून व्युत्पादण्याचा प्रयत्न केला गेला आहे. परंतु अर्थदृष्ट्या विचार करता 'राजकुल' शद्बाशी 'राऊळ' शद्बाचे हे उपयोजन मुळीच मेळ खात नाही 'राजकुल' हे राऊळ अथवा राऊळ या शब्दाचे कृत्रिम संस्करण ठरेल.. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांनीही यथार्थतेने असे दाखवून दिले आहे की 'रावळ' हा शद्ब 'लाकुल (लकुलीशानुयायी) शब्दापासून बनलेला आहे. हे व्युत्पादन भाषिक दृष्ट्या तर जमणारे आहेच परंतु ऐतिहासिक पुराव्यांनीही ते सिद्ध होते, 'रावळ' या पदाने स्वतःला उल्लेखणारे बाप्पा रावळ आदि राजपुरुष हे लकुलीश पाशुपत संप्रदायाचे अनुयायी होते, हे त्यांच्या कुळाच्या अनेक शासन पट्टामध्ये नोंदविलेले आहे." राऊळ हा शब्द लाकुल (लकुलीशानुयायी) यापासून तयार झालेला असून तो संप्रदायवाचक आहे. म्हणजेच पाशुपत शैवाचा बोधक आहे म्हणून श्रीचक्रपाणी राऊळ, श्री गुंडम राऊळ आणि श्रीचक्रधर स्वामीही शैव होते असे म्हणावे लागते असे डॉ. ढेरे यांचे मत आहे.

श्रीचांगदेव राऊळ व श्रीगुंडम राऊळ ही राऊळान्त नामे म्हाइंम-

भट्टांना पंचकृष्णांचे निरूपण करताना प्रथम श्रीचक्रधर स्वामींनीच उच्चारण केली. म्हणून पुढे पंथात ती रूढ झाली. मग श्रीचक्रधर स्वामींना असे भान राहिले नसेल काय? की आपण या दोघांना परमेश्वर अवतार सांगत असताना त्याचबरोबर राऊळान्त नाम उच्चारण करून शिवभक्त लाकुलीश सांगत आहो. शिवाला तर आपण देवता सदरात समाविष्ट केले आहे तर मग राऊळपदाने शिवभक्त लकुलीश सांगून विसंगती निर्माण करीत आहोत.

तसेच यावर विचार करताना असे दिसते की जर तो शब्द संप्रदायबोधक आहे तर स्वामींचे शिष्य नागदेव म्हाइंभट या सारखे व्युत्पन्न विद्वान आणि महदाईसा सारखी सतत प्रश्न विचारणारी विदुषी यांना श्रीगुंडम राऊळ व श्रीचक्रधर स्वामी हे शिवोपासक आहेत असे निश्चयपूर्वक माहीत असावयाला पाहिजे. कारण श्रीगुंडम राऊळ यांना श्रीचक्रधर शिष्यांनी पाहिलेले होते, अनेक वेळा त्यांच्या दर्शनाला ते जात असत. शक्ति स्वीकाराच्या लीळेच्या आधारे श्रीचक्रपाणी राऊळ म्हणजे श्रीचक्रधर स्वामींचे परमगुरु हे शैव आहेत हे पण त्या सर्वांना माहीत असावयाला हवे होते. मग त्यांनी सूत्रपाठाच्या अन्यव्यावृत्तीत ' कैलास वैकुंठाचे हरिहर ब्राह्मादिक देवता होती: पर परेश्वर नव्हेति ' असे ज निरूपण केलले आहे त्यावर त्यांचा विश्वास कसा बसला असता? कारण श्रीचांगदेव राऊळ, श्रीगुंडम राऊळ आपण स्वत: श्रीचक्रधर स्वामी हे सर्व परमेश्वराचे अवतार आहोत. देवता त्रिगुणात्मक, त्या शक्ती परमेश्वरापेक्षा कमी दर्जाच्या हेही प्रत्यक्ष श्रीचक्रधर स्वामींनीच केलेले निरूपण आहे. मग ते तिघहीं शिवोपासक असताना त्या शिवदेवतेपेक्षा श्रेष्ठ कसे? असा प्रश्न या सर्व स्वामींच्या शिष्यापुढे उपस्थित कसा झाला नाही? व त्यांचे विश्लेषण त्यांनी स्वामींना का विचारले नाही. मग म्हाइंभट्टासारख्या विद्वान शिष्यांना मूर्ख मानावयाचे की काय?

डॉ. ढेरे यांनी श्रीचांगदेव राऊळ व श्रीगुंडम राऊळ या नावाच्यामागे लागलेल्या राऊळ शब्दाला लकुलीश शब्दापासून व्युत्पन्न मानून

व्युत्पत्त्यार्थाच्या आधारे या दोघांना शैव ठरविण्याचा प्रयत्न केला आहे, पण सर्व शब्द सर्व ठिकाणी व्युत्पत्त्यार्थानेच उपयोजिले जातात. असे मुळीच म्हणता येत नाहीत. काही शब्द व्युत्पत्त्यार्थाने, काही रूढार्थाने व काही वेळपरत्वे दोन्ही अर्थाने उपयोजिले जातात. केवळ व्युत्पत्त्यर्थानेच त्यांचा उपयोग होतो असे मानले तर 'गौः शेते' म्हणजे बैल झोपतो असा प्रयोग मुळीच होणार नाही. कारण 'गच्छतीति गौ' म्हणजे चालणाऱ्याला बैल म्हणावे, गम=जाणे धातूला उणादि ओ प्रत्यय लागून गो शब्द बनतो. याचा व्युत्पत्त्यार्थ चालणारा गो = बैल असा होतो मग झोपलेल्याला गो = बैल कसे म्हणता येईल ? तसेच 'कुशान् लातीति कुशलः' अर्थात कुश नावाच्या गवताला आणणारा ग्रहण करणारा तो कुशल कुश व ला आदाने = ग्रहण करणे धातूपासून कुशल शब्द तयार होतो. मग अमूक मनुष्य अमूक कार्यात कुशल आहे असा प्रयोग कसा करता येईल ? त्या कार्यात तो कुश नावाचे गवत ग्रहण करणारा असतो काय ? इत्यादि विवेचन पं विश्वनाथाच्या साहित्य दर्पण ग्रंथातून येते, ते लक्षात घेण्यासारखे आहे.

सर्व ठिकाणी सर्व शब्दांचा व्युत्पत्त्यार्थाने उपयोग केला जात नाही म्हणूनच यादवकालीन वाङ्मयात व विवेकसिंधूतही राऊळ शब्द सद्गुरु वगैरेंच्या सादर उल्लेख करण्याच्या निमित्ताने अनेकदा वापरलेला दिसतो, असे ढेरे खुद्दच स्वीकारतात. तर मग राऊळ शब्द लकुलीशापासून तयार झाला असला तरी यादव काळात इतर अर्थाने त्याचा उपयोग होत असल्यामुळे व्युत्पत्त्यार्थाच्या आधाराने श्रीचांगदेव राऊळ व श्रीगुंडम राऊळ यांना शैव कसे ठरविता येईल ? यादवकालीन वाङ्मयाकाराना व विवेकसिंधूकार मुकुन्दराजासारख्या विद्वानांना डॉ. ढेरे यांचा मूर्ख ठरविण्याचा विचार आहे काय ?

'चांगदेव राऊळांची चरित्ररेखा[५]'

आदिनाथ दत्तात्रेयाचे शिष्य चांगदेव राऊळ हेच चक्रधर स्वामींचे परमगुरु होत 'लीळाचरित्र' द्वारावतीकाराच्या लीळा,' व 'फलटण महात्म्य' ही त्यांच्या चरित्रांची प्रमुख साधने.

पुण्याजवळ बाणगंगेच्या काठी असलेल्या फलटण या इतिहास प्रसिद्ध नगरात कऱ्हाडे ब्राह्मणाच्या घरी त्यांचा जन्म झाला. जनक नायक व जनकाइसा ही त्यांच्या मातापित्यांची नांवे. चांगदेव आणि चक्रपाणि अशा दोन नावांनी ते प्रसिद्ध होते. त्यांच्या पत्नीचे नाव कमलाइसा. पित्याच्या वर्षश्राद्धादिवशीच पत्नीने भोगदान मागित-ल्याने ते विषयप्रधान जीवनाला विटले, आणि माहूरला निघालेल्या यात्रि-कांच्या सोबतीने घराबाहेर पडले. माहूर येथे त्यांना दत्तात्रेयाने व्याघ्र-रूपाने दर्शन दिले. माहूर हे पुराण प्रसिद्ध क्षेत्रस्थान. तेथे दत्तात्रेयाचे आणि रेणुका अथवा मातंगी या शक्तीचे ठाणे जागते गाजते आहे. माहूर येथे काही काळ व्यतीत केल्यानंतर ते यात्रिकांसमवेत द्वारावती येथे गेले. आणि तेथे पाताळ गुंफेत राहू लागले. ते हाती खराटा घेऊन द्वारावतीचे रस्ते झाडीत आणि सुपात केराचे ढीग भरून गोमतीच्या प्रवाहात लोटीत. या त्यांच्या आगळ्या लीळेच्या काळात कोणी भाग्यवंत सापडल्यास ते त्याला सुपाने अथवा खराट्याने मारून कृपादान करीत. गुंडम राऊळ हे द्वारावती येथे आले असता त्यांनी त्यांना असेच कृपादान केले होते.

द्वारावती येथे पाताळ गुंफेत राहत असता त्यांनी 'अनंत चरित्रे केली : अनंता लीळा केलीया : अनंता जीवाते उद्धरीले ।' त्यांच्या योग सामर्थ्याची कीर्ती ऐकून कामाख्या नावाची योगिनी त्यांच्या गुंफेशी रतिभिक्षा मागण्या साठी आली. परंतु त्यांना ' ब्रह्मचर्याची प्रवृत्ति ' असल्यामुळे त्यांनी तिची याचना मानली नाही. गुंफेशी ती सतत सात अहोरात्र उभीच होती. अखेर तिने गुंफेत पाऊल ठेवण्याचे धाडस केले. त्यावेळी चांगदेव राऊळांनी ते ' पुर ' (देह) त्यागून भडोचच्या मृत प्रधानपुत्राच्या ' पुरा ' त प्रवेश करून नवा अवतार धारण केला. हा नवा अवतार म्हणजेच चक्रधर स्वामी होत. म्हणजे चक्रधर स्वामी हे देहतः वेगळे असले तरी आत्मतः चांगदेव राऊळच होत, असे महानुभावांच्या श्रद्धेनुसार ठरते. त्यामुळे चक्रधर स्वामींना चांगदेव राऊळ याही नावाने महानुभाव ओळखतात. त्या दोघात भेद दाखविण्यासाठी पहिले ' द्वारावतीचे चांगदेव राऊळ ' आणि दुसरे ' प्रतिष्ठानचे चांगदेव राऊळ ' असा त्यांचा सविशेष उल्लेख करतात.

डॉ. ढेरे याप्रमाणे श्रीचांगदेव राऊळांची चरित्र रेखा रेखाटून पुढे म्हणतात की, ' "भडोचच्या मृत प्रधान पुत्राच्या कायेवर आरोहण करून चांगदेव राऊळांनी नवा अवतार स्वीकारल्याची ही कथा तेथील ( भृगुकच्छ क्षेत्रातील ) लकुलीशाच्या कायावरोहण कथेशी पूर्णतः मिळती जुळती आहे. पाशुपत संप्रदायाचा संस्थापक आणि पुराणांनी शिवावतार स्वीकारलेला लकुलीश हा असाच मृताच्या शरीरात प्रविष्ट होऊन अवतरला होता, अशी कथा प्रसिद्ध आहे ...... चांगदेव राऊळांच्या पुनरावताराची कथा लकुलीशाच्या अवतरण कथेशी आणि अवतरण भूमीशी निकटतेने संबंधित असावी, हा केवळ योगायोग नव्हे. "

याचा अर्थ काय घ्यावयाचा ? लकुलीशाशी चक्रधर स्वामींचा ऐक्य संबंध जोडणे किंवा चक्रधरस्वामींनी प्रधानपुत्राचे देह स्वीकारले नसून लकुलीशाची ती नक्कल मात्र महानुभावांनी दाखविली आहे असे समजावे. चक्रपाणिचे प्रस्तावना लेखक प्राचार्य नरहर कुरुंदकर पृष्ठ ४३ वर म्हणतात की, " लीळाचरित्रात चक्रधर भडोचचे प्रधानपुत्र असल्याची व मृतशरीर उठविण्याची कहाणी आली आहे ती ऐतिहासिक तथ्याशी संबंधित नाही परंपरेची समजूत इतकाच तिचा अर्थ आहे. सबब चक्रधरांना गुजराती गृहित धरण्याचे कारण नाही. चांगदेव राऊळ द्वारकेत अनेक वर्षे होते; यामुळे चक्रधरांच्या भाषेत काही गुजराथी शब्द आढळतात, हे स्पष्टीकरण पुरेसे आहे एऱ्हवी सर्वज्ञ अपूर्व मराठी बोलतात, हाच लीळा चरित्राचाही अभिप्राय आहे. प्रधान पुत्राचे शरीर उठविण्याचा एक मुद्दा बाद झाला, म्हणजे त्यासह कामाख्येच्या निमित्ताने चांगदेवराऊळांनी देहत्याग केला, हा मुद्दाही आपोआप बाद होतो. "

श्रीचक्रधरांनी प्रधान पुत्राचे देह उठविले हे चमत्कार स्वीकारले नाही तर लकुलीशाने कायावरोहण केले हे तरी मग खरे कसे मानायचे ? चांगा वटेश्वर सर्पाचा चाबूक घेऊन वाघावर बसून आले, ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली, रेड्याच्या मुखातून वेद वदविले, चांगदेव चौदाशे वर्षे जगले, गोरक्षनाथाची शिष्या व चांगावटेश्वराची गुरु मुक्ताई म्हणजेच ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताई असे मानणे, त्रेतायुगी रुद्राने न्यायदर्शन सांगितले, अशा अनेक बाबी

दाखविता येतील की त्या सर्व बाद ठरवाव्या लागतील. सर्व अमान्य करावे लागेल. श्री. चांगदेव राऊळ व श्रीचक्रधरस्वामी या दोघांना एकच मानले तर चांगदेव राऊळ (श्रीचक्रधरस्वामी) गुरु की गुंडम राऊळ गुरु याचापण विचार करावा लागेल.

सांस्कृतिक विचार देखील ऐतिहासिक तथ्यांच्याच दृष्टिकोणातून तपासावे लागतील. लीळाचरित्राप्रमाणेच इतर संत वाङ्मयाचेही मग नव्या दृष्टिकोणातून विवेचन करावे लागेल. ज्या मुक्ताबाईच्या भेटीच्या उल्लेखाने डॉ. ढेरे हे स्वामींचे श्रीपर्वती राहणे व सिद्धांचा संपर्क लाभणे या गोष्टी मानतात ती मुक्ताबाईच ऐतिहासिक तथ्यावर खरे पाहता टिकणारी नाही. त्यामुळे प्राचार्य कुरुंदकर ज्या संशोधनाला आगळा प्रबंध मानतात त्यापैकी बरेचसे लेखन ऐतिहासिक तथ्यावर टिकाव धरू शकणारे नाही. महानुभाव पंथाच्या समजुतींना तर्काच्या कसोटीवर पारखणे व इतरांचे वाङ्मय अंधश्रद्धेने जसेच्या तसे स्वीकारणे पक्षपातीपणाचे ठरेल त्याला सत्यसंशोधनाचे स्वरूप कसे देता येईल ? सत्यसंशोधकांनी सर्वांचा विचार एकाच दृष्टिकोणातून करावयास पाहिजे. एकांगी विचाराने सिद्ध साधकपणा, आध्यात्मिक काही बाबी सर्व थोतांड मानावे लागेल.

## सूप आणि खराटा : मातंगी देवीची आयुधे– ?

चांगदेव राऊळ द्वारावतीमध्ये अवधूत वेषात विहरण करीत असतांना हातीं सूप आणि खराटा या दोन वस्तू बाळगीत असत, अशी वर्णने आढळतात. लीळा चरित्राच्या एकांकाच्या प्रारंभीची पुढील एक लीळा या संदर्भात विचार करण्यासारखी आहे. [६]

गोसावीं द्वारावतिएसि खराटेंवरि बीदी झाडीतिः मग सूपीं पुंजे भरितिः श्रीमुगुटावरि ठेवितिः गोमतीए मध्ये घालितिः सुपें मागुं प्रगटे खराटेनि विद्याः ।।

या संक्षिप्त लीळेवरून असे दिसून येते की, चांगदेव राऊळ द्वारावती मध्ये विहरण करीत असतांना हातात सूप आणि खराटा बाळगीत असत.

खराटयाने ते राजरस्ते झाडीत असत आणि गोळा केलेला केर सुपात भरून, ते सूप डोक्यावर घेऊन गोमतीनदीच्या प्रवाहात टाकीत असत. ते अधिकारी व्यक्तीच्या ठायी सुपाच्या आघाताने 'मार्ग' ( संप्रदाय– परमेश्वर विषयक ज्ञान ) प्रगटवीत असत आणि खराटयाच्या आघाताने 'विद्या' ( देवता विषयक ज्ञान ) प्रगटवीत असत 'श्रीचक्रपाणि चरित्रा' तही सूप खराटयाचे असेच वर्णन आहे.

"श्रीचांगदेव राऊळांच्या हाती सूप आणि खराटा या वस्तू केवळ त्यांच्या अवधूताची एक अलौकिक कळा म्हणून होत्या, की त्याना विशिष्ट उपासना संप्रदायाची चिन्हे म्हणून प्रतिष्ठा होती ? – या प्रश्नाचे उत्तर देणे तसे सोपे नाही. परंतु या वस्तूंच्या उल्लेखाबरोबर आपल्या दृष्टीसमोर शीतला आणि मातंगी या देवीची उपासना उभी राहते. सूप आणि खराटा ही जशी शीतलेची आयुधे आहेत, तशीच मातंगीचीही आहेत. विल्यम क्रुकने मातंगी आणि शीतला यांत अभेद आढळत असल्याचे सांगून, शीतले प्रमाणेच सूप आणि खराटा ही मातंगीचीही आयुधे असल्याचे, प्रत्यक्ष उपासना क्षेत्रातील निरीक्षणाच्या आधारे विधान केले आहे.

चांगदेव राऊळांचा शीतलेच्या उपासनेशी संबंध आला असल्याचे दिसत नाही, परंतु मातंगीच्या अर्थात रेणुकेच्या उपासनेचे महाक्षेत्र असलेल्या माहूरशी मात्र त्यांचा दृढ संबंध आला होता. चांगदेव राऊळांच्या हातातील या वस्तू मातंगीच्या आयुधांचे प्रतीक म्हणून असतील काय ? तसे असेल, तर 'मातंगी पट्ट' या संप्रदादायाच्या संस्थापनेशी त्यांचा संबंध अनुमानावा लागेल काय ? महानुभाव संप्रदाय आणि मातंपट्ट या दोन संप्रदायात जी काही आश्चर्यकारक साम्ये रेगाळत राहिली आणि त्यामुळे त्यात अभेद जाणवून, महानुभाव संप्रदायाच्या अनुयायांना असह्य निंदेला तोंड द्यावे लागले, यात इतिहासाचे एखादे गूढ चांगदेव राऊळांच्या हातांतील सूप–खराटयामध्ये दडून राहिले असेल काय ? आज तरी या प्रश्नांची निर्णायक उत्तरे देणे अशक्य आहे. उद्या कदाचित

नवी अज्ञातसाधने उजेडात येतील आणि या गूढांचा उलगडा करण्यास सहाय्यक ठरतीलही. तोवर हे प्रश्न आपल्याला असेच संदेहात ठेवणार आहेत. "

वर नोंद केल्याप्रमाणे डॉ. ढेरे श्रीचांगदेव राऊळांच्या हातात असलेल्या सूप-खराटा हे शीतलेची मातंगीची आयुधे म्हणून हातात धारण करीत असत. म्हणून ते मातंगीचे उपासक असून मातंगीपट्टच्या संस्थापनेशी त्यांचा संबंध असावा अशी कल्पना करतात.

कोणाचाही कोणत्याही संप्रदायाशी संबंध आल्याचा शोध करावयाचा असेल तर ती व्यक्ती त्या संप्रदाशी संबंध असलेल्या देवी देवतांची उपासना करीत होती काय ? हे अवश्य पहावे लागते. कारण तीच अन्तरंग बाब असते. केवळ बाह्य वेषभूषणादी पाहून कार्यभाग होत नाही. ही बाह्य चिन्हे सोंगपण ठरू शकतात. किंवा त्यांचे इतरही कारण संभवू शकते. उपासनेचाच अतरंगाशी संबंध असतो. म्हणून श्रीचांगदेव राऊळांचा मातंगी देवीशी संबंध जोडावयाचा असेल तर ते तिची उपासना करीत होते हे प्रथम सिद्ध करावे लागेल पण या विषयी डॉ. ढेरे खुद्द म्हणतात का, " चांगदेव राऊळांचा शीतलेच्या उपासनेशी संबंध आला असल्याचें दिसत नाही. " म्हणून शीतलेशी त्यांचा संबंध जोडणाऱ्या उपासनेचा मुख्य मुद्दा आपोआप बाद ठरतो. नंतर डॉ. ढेरे त्यांचा त्या देवीविषयी संबंध जोडण्याकरिता दुसऱ्या अनुमानाचा आश्रय घेतांना म्हणतात, ' परंतु मातंगाच्या अर्थात रेणुकीच्या उपासनेचे महाक्षेत्र माहूरशी मात्र त्यांचा दृढ संबंध आला होता. "

माहूर हे जसे रेणुकेच्या उपासनेचे महाक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते व आजही आहे तसेच किंबहुना त्यापेक्षाही रतिभर अधिक श्रीदत्तात्रेय प्रभूंच्या उपासनेचे महाक्षेत्र म्हणून श्रीचांगदेव राऊळ फलटणहून यात्रेकरूंच्या मेळचा बरोबर माहूरला आले. तेथे अरण्यात श्रीदत्तात्रेय प्रभूने व्याघ्ररूपाने त्यांना भेट दिली व त्यांच्याकडून श्रीचांगदेव राऊळाने परावर शक्तीचा स्वीकार केला, व त्यांच्या स्थानात ते जाऊन राहिले असा

लीळाचरित्रात स्पष्ट उल्लेख आढळतो. त्या स्थानापासून तीन–चार मैल दूर असलेल्या रेणुकेच्या स्थानात गेल्याचा पुसट उल्लेखसुद्धा आढळत नाही.

अशा स्थितीत केवळ त्या परिसरात राहिले एवढयाने ते त्या देवीचे उपासक बनले हे कशाच्या आधाराने ठरवावयाचे ? त्या देवीच्या स्थानाशी व तिच्या उपासनेशी श्रीचांगदेव राऊळांचा संबंध आला असता तर ते त्या देवीच्या स्थानात जाऊन राहिले असते किंवा त्या देवीच्या इतर ठिकाणच्या तशाच कोणत्याही स्थानात जाऊन राहिले असते. पण तसे न करता ते भगवान श्रीकृष्णचंद्राच्या द्वारकेत जाऊन राहिले. मग केवळ माहूरशी संबंध आल्याने इतर काही एक कारण न दिसता त्या मातंगी देवीच्या उपासनेशी त्यांचा संबंध जोडावयाचा कसा ? म्हणून माहूरशी संबंध आल्याने श्रीचांगदेव राऊळ हे त्या देवीचे उपासक बनले व तिची आयुधे म्हणून त्यांनी सूप खराटा हाती घेतला हे डॉ. ढेरे यांचे स्वप्नरंजन मानावे लागेल.

जर सूप खराटा मातंगींची–शीतलेची आयुधे म्हणून हाती धारण केली नव्हती, तर ते हाती काय म्हणून धारण करीत होते हा महत्त्वाचा प्रश्न शिल्लकच राहतो. म्हणून त्याचाच आता विचार करावयाचा आहे.

महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे जीवाच्या उद्धारासाठी परमेश्वर अवतार धारण करतो. जीवाचा उद्धार ईश्वरीय ज्ञान प्राप्त करून त्याप्रमाणे आचरण केल्याने होतो. परंतु ज्ञान प्राप्त करून घेण्याला जीवाला योग्य व्हावे लागते. ती योग्यता अनेक जन्मात संस्कार वाढल्याने प्राप्त होते. स्वामी म्हणतात, " अयोग्याते योग्य करीति : योग्यासी परमेश्वर ज्ञात देति: "

भगवद्गीताही म्हणते, ' अनेक जन्म संहिद्धस्ततो याति परां गतिम् ।

अनेक जन्मात सिद्धी प्राप्त करीत करीत जीव मोक्षाला प्राप्त होतो. ' बहूणां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते, पुष्कळ जन्माच्या शेवटी ज्ञान प्राप्त करून जीव मला प्राप्त होतो. ज्ञान देण्यासाठी उभयदृश्यावतार

होतो, पण संस्कार वाढवून जीवाला ज्ञानप्राप्तीला योग्य करण्यासाठी अनेक प्रकारचे अवतार होतात. हे अवतार जनतेत मिळूनमिसळून उपदेश करून नानाप्रकारचे चमत्कार दाखवून स्वत: चांगले आचरण करून जीवावर सत्संस्काराचा प्रभाव पाडून त्यांचे चांगले संस्कार वाढवतात. यांत अच्छादर्णाच्या अवरदृश्यावताराचा सिंहाचा वाटा असतो. तो जीवांना योग्य करीत असताना देवतांच्या विद्या देतो. बहियांग देतो, त्यांचा गृहस्थाश्रम सुखाचा व्हावा म्हणून त्यांना मद्यपानादी व्यसनापासून सोडवतो, सन्मार्गाला लावतो, त्यांच्यावर समतेचे सेवाभावाचे संस्कार स्वत: तसे आचरण करून रुजवतो, योग्य जीव भेटला तर त्याला किंवा आपण योग्य केलेल्या जीवाला ज्ञान देण्यासाठी आच्छादलेली परशक्ती प्रकट करून ज्ञान देतो.

ईश्वर अवताराप्रमाणेच काही महापुरुषही स्वत:च्या आचरणाने मानवात समतेचे व सेवाभावाचे संस्कार रुजवितात. यासाठीच राष्ट्रपिता महात्माजी हरिजनांच्या वस्तीत निवास करीत असत व सफाईचे काम पण करींत असत. त्याचप्रमाणे श्रीचांगदेव राऊळ विद्यादानादी प्रभाव उत्पादक कार्यं करीत असताना हाती सूप खराटा घेऊन ग्रामसफाईचे काम पण करीत असत. अशा कार्याचा प्रभाव किती पडत असे याचे उदाहरण उधळीनाथाच्या आचरणात दिसून येते. ते राजगुरु वैभव संपन्न असूनही आणि श्रीचक्रधर स्वामी भिक्षूच्या वेषात भिक्षा मागत होते. त्यांच्या प्रभावाची उधळीनाथाला पुसटशी जाणीवसुद्धा नव्हती. तरीपण त्यांची ती शरीराची उपेक्षणीय अवस्था पाहून त्याचे मन द्रवले व शिष्याला पाठवून आपल्या जवळ बोलावून वयस्तंभिनी विद्या देण्याचा प्रयत्न केला. स्वामींनी स्वीकारली नाही तरी 'पुरुष हटीया' एवढेच ते उद्‌गारले. पण उबगले नाही. त्यांना आसनावर बसवून त्यांच्या अंगातील काटे काढले,शरीरावर जागजागी रक्ताचे वाळलेले बिंदु होते ते ओल्या कपड्याने पुसून विद्याग्रहण करण्याची प्रार्थना केली आणि विद्या दिलीही श्रीचांगदेव राऊळ सूप खराटा हाती घेऊन सेवाभावाचे संस्कार कसे रुजवीत असत असत. त्याचे हे बोलके उदाहरण आहे. याचसाठी त्यांनी हाती सूप खराटा घेतलेला होता. या तथ्याचा

विचार न करता त्यांच्या हाती असलेला सूप खराटा हीं शीतलेची-मातंगीची आयुधे आहेत असे कल्पून त्यांना शीतलेचा उपासक ठरविण्याचा प्रयत्न करणे हे हास्यास्पद आहे.

## चांगदेव राऊळांचे ऊर्ध्वरेतेपण–

प्राचार्य नरहर कुरुंदकर चक्रपाणिच्या प्रस्तावनेत म्हणतात–[१]

"चांगदेव राऊळ ऊर्ध्वरेते होते. तेव्हा त्यांच्या उपासनेत स्त्रीला साधिका म्हणून स्थान असणारच. या चांगदेव राऊळांच्या जीवनाच्या पूर्वभागाचा मातंगीपट्ट संप्रदायाशी संबंध आहे. चांगदेव राऊळांच्या जीवनाचा पूर्वभाग जैनविरोध, वेदाचरण, शांकर अद्वैत यांनी भरलेला आहे तसा तंत्रोपासना, मातंगी संप्रदाय व ऊर्ध्वरेता होणे याही साधनानी भरलाच; आहे. हेच चांगदेव राऊळ पूढे नवपंथ प्रवर्तन करतात...... फलटण येथे चांगदेव राऊळ यांना स्वतःची स्त्री रतीचिया चाडा विनविते, म्हणून ते गृहत्याग करतात. हीही वैराग्याची प्रवृत्ती आहे. पण स्वस्त्रीविषयी असणारे हे वैराग्य रतिक्रीडेतून परमार्थ साधना करू पाहणाऱ्या परकीया साधिकेशी देहसंबंध ठेवून ऊर्ध्वरेतेपदी नेऊन बसविणाऱ्या तंत्रसाधनेच्या दिशेने जाणारे आहे.

उपरोक्त विचारात कुरुंदकरांनी एकतर श्रीचागदेव राऊळांचे उर्ध्वरेतेपण प्रमाणानी सिद्ध करावयास हवे होते ते सिद्ध झाले म्हणजे त्यांच्या उपासनेत स्त्रीला साधिका म्हणून स्थान असणारच हे म्हणणे युक्ति संमत झाले असते. नाहीतर त्यांची कोणी साधिका होती असे प्रथम दाखवावयास हवे होते. म्हणजे त्या साधिकेच्या अस्तित्वावरून त्यांचे ऊर्ध्वरेतेपण मानले गेले असते. पण यापैकी कुरुंदकरांनी एकही बाब सिद्ध करून दाखविली नाही. म्हणून त्यांच्या या विधानास अन्योन्याश्रयाचा दोष लागतो. या ऊर्ध्वरेतेपणाविषयी युक्तीने ते असे म्हणतात की, ऊर्ध्वरेता स्वस्त्रीचा त्याग करतो. श्रीचांगदेव राऊळांनी रतिभिक्षेसाठी आलेल्या स्वस्त्रीचा त्याग केला म्हणून ते ऊर्ध्वरेते होते ही युक्ती देखील अर्धसत्यबोधक

आहे. कारण ऊर्ध्वरेत्याप्रमाणेच संन्यास घेणाराही स्वस्त्रीचा त्याग करीत असतो.

श्री केसोबास, श्री नागदेवाचार्यं यांनी स्वस्त्रीचा त्याग केलेला होता म्हणून त्यांनाही उर्ध्वरेते मानावे लागेल. अशा स्थितीत स्वस्त्रीचा त्याग करून संन्यास घेणाऱ्या सर्व संन्याशाना उर्ध्वरेतेच मानावे लागेल. कामाख्या श्रीचक्रपाणी राऊळांना उर्ध्वरेते समजून आली होती. असेही म्हणता येत नाही कारण ती त्यांचा तपोभंग करण्याच्या उद्देशाने आली असल्याचा उल्लेख सापडतो. श्री चांगदेव राऊळ ऊर्ध्वरेते असते तर कान्हपादाच्या आणि ब्रहुडीच्या रतियुद्धाप्रमाणे यांचाही तसा रतिसंग्राम झाला असता मग हारजित कोणाची हा प्रश्न महत्त्वाचा ठरत नाही म्हणून श्रीचांगदेवावर ऊर्ध्वरेतेपणाचा आरोप करणे चिकित्सक संशोधक वृत्तीला शोभण्यासारखे नाही. चांगदेव राऊळांच्या या ऊर्ध्वरेतेपणातील ही एक बाब बाद ठरली म्हणजे चांगदेव राऊळांचे वैराग्य तंत्र साधनेच्या दिशेने जाणारे आहे हीही दुसरी गोष्ट आपोआपच बाद ठरते.

## चांगदेव राऊळांचा राऊळ परिवार

श्रीचांगदेव राऊळांना श्रीचक्रधर स्वामींनी अच्छादनीचा अवरदृश्यावतार म्हणून संबोधलेले आहे. ते फक्त देवतांच्याच विद्या देत असत त्यामुळे त्यांचे बावन्न ' विद्यावंत ' शिष्य होते. नित्यमुक्तीच्या उपयोगी तत्त्वज्ञान किंवा आचारधर्म त्यांनी कोणालाच सांगितला नाही. विद्या देणे म्हणजे संप्रदाय चालविणे असे नव्हे. ज्याला त्या प्राप्त करण्याचा अधिकार असेल त्यालाच ते विद्या देत. त्यात सांप्रदायाचा प्रश्नच उद्भवत नाही. म्हणून चांगदेव राऊळांच्या विद्यादानात शैव, नाथपंथी, वैष्णव, गाणपत्य या सर्वांचा समावेश होत होता. त्यांत बंधन येत नसे. विद्या साधलेले विद्यावंत त्यांच्याजवळ नेहमी राहतही नव्हते. म्हणून त्यांच्यापासून विद्या प्राप्त झालेल्या विद्यावंतावरून त्यांना व पर्यायाने श्रीचक्रधर स्वामींना नाथ, शैव वगैरे काहीच ठरविता येणार नाही.

## ‘ फलटण माहात्म्यातील ’ चांगदेव राऊळ

डॉ. ढेरे यांनी कृष्णमुनी डिंभाच्या ‘ फलटण माहात्म्य ’ यातील चांगदेव राऊळांच्या अवतरणाचा हेतू स्पष्ट करताना खालील ओव्या उद्धृत केल्या आहेत–

ऐसे त्रेती झाले रामाख्यान । द्वापार संपोनि कलि रिगाली दारुण
तेथे क्षपणिके केले उच्छेदन । वेदमार्गाचे ।।
परमेश्वरज्ञान उच्छेदिले । राजा मुख्य जैनामर्गी झाले
हारपोनि गेले ।। वेदकर्म ।।

बद्रिकाश्रमी धर्मऋषीचाकुमर । जया नाव नारायण परमेश्वर
अवतार तेणे धरिला मानवी अवतार । तिये फळस्थळी ।।
तेणें जैनमार्गाचे केले उच्छेदन । संस्थापिले निज परज्ञान
वेद कर्माचरण । चालीं लाविले ।।

( फ. मा. २.३५–३८ )

जैनांचा आणि वैदिकांचा हा संघर्ष सिंघण राजाच्या काळात झडला असे कृष्णमुनी म्हणतो, जैनांनी अन्य सर्व दर्शनेही ‘ अंत्यजमूळे मातांगमूळे’ असल्याचा प्रचार चालविला होता असेही तो म्हणतो परंतु येथे महानुभाव पंथ हाच मातंगीपट्ट होय, या आरोपाचे सूचन असल्याचे जाणवते असे डॉ. ढेरे नमूद करतात. जे जे ढेरे यांना अनुकूल असते ते ते स्वतः विषयी स्वीकारतात पण ‘ अंत्यजमूळे मातांगमूळे ’ ही कल्पना त्यांच्या विचार सृष्टीला परवडली नाही म्हणून ती महानुभावांशीं अन्वित करतात आणि म्हणूनच येथे महानुभाव पंथ हा मातंग पट्ट होय या आरोपाचे संसूचन मोठ्या हुशारीने करून जातात.

त्याचप्रमाणे चांगदेव राऊळांच्या अवधूत वेषाचाही स्पष्टपणे उल्लेख करतांना ते कृष्णमुनीच्या ‘ फलटण महात्म्या ’तील खालील ओव्या उद्धृत करतात–

श्रीदत्तगुरु करुनी । अवधूत वेष धरुनी ॥
द्वारावतीसी जाऊनी । क्रीडता जाला ॥

( फ. मा. ९.३७ )

कृष्णमुनीने चांगदेव राऊळांच्या चरित्राच्या संदर्भात दिलेली ही अलक्षित माहिती ढेरे यांना फारच महत्त्वाची वाटते कारण चांगदेव अथवा ' चक्रपाणि राऊळ ' हे ही ' राऊळ ' च होते– ते अवधूत वेषाने क्रीडत होते, हेही कृष्णमुनीने सांगितलेच आहे. विभूति राऊळ आणि चांगदेव राऊळ हे जैन विरोधक ज्ञानमार्गी महात्मे असल्याचा कृष्णमुनी आग्रहपूर्वक उल्लेख करतो यावरून लाकुल पाशुपत अथवा राऊळ हे वेदमार्गनिष्ठ होते, असा याचा अर्थ होतो हे ढेरे यानी स्वीकारले आहे. पण खरे पाहता उपरोक्त ओवीत ' अवधूत वेष ' याचा ढेरे यांना अभिप्रेत असलेला अर्थ कृष्णमुनीला अभिप्रेत नाही कारण ' अवधूत वेष ' म्हणजे ' विरक्ताचा वेष ' असे मानावे लागते याबद्दल यापूर्वी आपण विवेचन केलेलेच आहे. शिवाय कवी डिंभ हा फार उत्तरकालीन ग्रंथकार आहे.

श्रीचक्रधर स्वामींच्या तत्त्वज्ञानाला धरून जे वाङ्मय आहे ते सर्व महानुभाव पंथाला मान्य आहे, तसेच श्रीकृष्ण परमेश्वराचा अवतार म्हणून ' गीता ' ही श्रीकृष्णोक्ती म्हणून तीही प्रमाण आहे. तसेच श्रीचक्रधर स्वामींनी श्रीचांगदेव राऊळांच्या दहा लीळा सांगितल्या, श्रीदत्तात्रेयाच्या सात लीळा सांगितल्या व श्रीकृष्णाच्या ४८ लीळा सांगितल्या हे सर्व महानुभाव पंथीयानी प्रमाण मानले आहे. सारांश, श्रीचक्रधर निरुपित तत्त्वज्ञानाला अनुसरून असेल तेच महानुभाव पंथ प्रमाण मानतो. त्यावेगळे प्रामाण्य मान्य नाही. कृष्णमुनी डिंभ किंवा दर्शन प्रकाशकार मुरारीमल्ल यांनी काही सरमिसळ केलेली असून ते उत्तरकालीन ग्रंथकार आहेत. त्यांनी अनेक बाबतीत थापा पण मारल्या आहेत. म्हणून यांच्या विश्वसनीयत्व व अविश्वसनीयत्व याचा विचार उत्तरकालीन ग्रंथकार या प्रकरणात केला जाईल.

## संदर्भ टीपा–


१. रा. चिं. ढेरे, 'चक्रपाणि' पुणे, १९७७, पृष्ठ २०५

२. वि. भि. कोलते (संपा.) मूर्तिप्रकाश, नागपूर, ओवी १५

३. य. खु. देशपांडे (संपा.) श्रीचक्रपाणि चरित्र, शारदाश्रम, यवतमाळ लीळांक १२

४. रा. चिं. ढेरे, 'चक्रपाणि' पुणे, १९७७ पृष्ठ २०९

५. तत्रैव पृष्ठ २०६-२०७

६. शं. गो. तुळपुळे, (संपा.), 'लीळा चरित्र' एकांक, नागपूर-पुणे, १९७२, पृ. १ (लीळांक २)

७. रा. चिं. ढेरे, 'चक्रपाणि', पुणे, १९७७, प्रस्तावना पृ. ४६-४७


☆ ☆ ☆

# ४

# गुंडम राऊळ आणि उधळीनाथ

## श्रीचक्रधरांचे गुरू

श्रीचक्रधरांचे परमगुरू श्रीचांगदेव राऊळ होते. या चांगदेव राऊळांचे शिष्यापैकी गुंडम राऊळ आणि उधळीनाथ या दोघांना चक्रधरांनी गुरुस्थानी मानले असल्याची नोंद त्यांच्या संप्रदायिक चरित्रकारांनी केलेली आहे.[१] या दोघापैकी गुंडम राऊळाना त्यानी प्राधान्याने गुरू मानले आहे आणि उधळीनाथाना गौणत्वाने ते स्थान दिले आहे. असे म्हणून डॉ. ढेरे यानी या दोन्ही गुरुंचा संबंध शैव संप्रदायाशी जोडून श्रीचक्रधर स्वामींना पाशुपत शैव ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टीने त्यांच्या वैचारिक मांडणीतील असंबद्धता आपणास स्पष्ट करून श्रीचक्रधर स्वामींच्या गुरुपरंपरेत श्रीगुंडम राऊळांना जसे स्थान होते तसे उधळीनाथांना त्यांनी आपल्या गुरुपरंपरेत दिलेले नाही. हेही लक्षात घ्यावयास हवे. पुढे डॉ. ढेरे लिहतात–

## गुंडमराऊळ तथा गोविंदप्रभू

श्री चक्रधर स्वामींचे गुरू श्री गुंडम राऊळ तथा श्री गोविंदप्रभू यांचा जन्म विदर्भातील ऋद्धिपूर (जि. आमरावती) जवळ काटसरे नामक

गावी अनंत नायक आणि नेमाइसा या कण्वशाखीय ब्राह्मण दांपत्याच्या उदरी झाला.

साळिवाहन शकीं अकरा शतावरी । नव वर्षे प्लवंग संवत्सरी
भाद्रपद शुद्धाष्टमीं गुरुवारी । अवतरैल परमेश्वर ।।

( ऋद्धिपूर माहात्म्य, ९.६१४ )

अशा भविष्याच्या भाषेत कृष्णमुनी डिंभाने त्यांची जन्मतिथी नोंदविली आहे. या नोंदीनुसार भाद्रपद शु।। ८ शके ११०९ ( दि. १७ ऑगस्ट ११८७ ) ही त्यांची जन्मतिथी ठरते. नेमाईसाला झालेली मुले वाचत नसत म्हणून गुंडो, चिंधू अशी तुच्छ वस्तूंची नांवे ठेवली होती. पुढे हा पुरुष अवतारी आहे, अशी जाणीव झाल्यानंतर 'गुंडो' चे गोविंद आणि 'चिंधू' चे 'चिद्धव' अशी शोभन संस्कृतीकरणे हेतूपूर्वक करण्यात आली तरीही त्याना 'गुंडम राऊळ' या नावानेही अखेरपर्यन्त संबोधले जात होतेच. 'श्रीगोविंदप्रभू' या नावाचा केवळ 'श्रीप्रभू' असा संक्षेप आजही रूढ आहे.

सातव्या वर्षी त्यांची मुंज झाली. मुंजीनंतर बोपदेव उपाध्ये यांच्या जवळ त्यांनी वेदाध्ययन केले त्यांची बुद्धी अतिशय तीव्र होती. आणि वृत्ती बालवयापासून विरक्त होती. त्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षाच्या आतच संन्यास घेतला. संन्यासानंतर एकदा द्वारावती येथे गेले असता त्यांना तेथे निवास करणाऱ्या चांगदेव राऊळांनी दीक्षा दिली. या दीक्षालाभानंतर ते ऋद्धिपूरला परत आले आणि विदेही मुक्त स्थितीत विहरण करू लागले. त्यांनी सर्व विधिनिषेधांचा त्याग केला आणि आपल्या इह लोकातील जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत 'अनंत अचिंत्य लीळा' करून अनंत जीवांचा उद्धार केला.

### गोविंद प्रभूंचा शांकर संन्यास ?

गोविंद प्रभूंनी संन्यास घेतला होता. यासंबंधी महानुभाव परंपरेत अनेक उल्लेख आढळतात. प्रकाशित 'श्रीगोविंदप्रभु चरित्रा'मध्ये जरी

श्रीप्रभूंच्या संन्यास स्वीकाराची लीळा समाविष्ट नसली, तरी श्री. ह. ना. नेने यांनी अप्रकाशित 'ऋद्धिपुर चरित्रा'तील (क्र. ९) संन्यास स्वीकाराची लीळा 'सूत्रपाठाच्या' प्रस्तावनेत उद्‌धृत केली आहे ती अशी–[२]

संन्यासू स्वीकारू– : । : गोसावीं विद्याभ्यास केलेंयानंतरे संन्यासू स्वीकारावेयाची प्रवृत्ति जाली : वरुषा बारा : तथा : तेरा : एकीं वासना : सोळा : । : आनोबास : । : तळ्याचीए पाळीं वीहीरी दक्षिणीली पौळींसी : केशव उत्तराभिमुख संन्यासू मठू : तेथ संन्यासी असत : तया पासि गोसावी संन्यासू स्वीकरिला : रामेश्वर बासः । : सासटी पिंपळगावी गंगे आतु पंच देउळियापासी : । : परशराम बास : ।: : द्वारावतीए : । : गुरु नाव कमळारण्य : एकी वासना : कमळ वन : तयापासीं संन्यासू स्वीकरीला : गोसावी नांव विबुधारण्य एकी वासनाः विबुध वन : ।। : ऐसे गोसावीं योगपद्धतीचे नांव स्वीकरीलें :

( ऋद्धिपूर चरित्र लीळांक ९ )

या लीळेत कोणत्या वयात संन्यास स्वीकारला याबद्दल मतमतांतरे असली तरी त्यांनी तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवताच चतुर्थाश्रमात प्रवेश केला, हे स्पष्ट आहे.

ही दीक्षा त्यांनी ऋद्धिपुरातील संन्यासी मठात घेतली, की साष्टी पिंपळगाव येथील पंचदेव मंदिरात घेतली, की द्वारावती येथे घेतली याविषयीही मतभेद आहेत. त्यांनी पहिल्या द्वारावती यात्रेत संन्यास स्वीकार केला आणि दुसऱ्या द्वारावती यात्रेत चांगदेव राऊळांकडून शक्ति स्वीकार केला असे लीळाचरित्राच्या प्रकाशित पाठात म्हटले आहे.[३] त्यांनीं संन्यास महाराष्ट्रातच घेतला आणि नंतर द्वारावती येथे जाऊन चांगदेव राऊळांकडून शक्ति स्वीकार केला असा क्रम बहुमान्य आहे. कृष्णमुनी डिंभ 'आत्मतीर्थ प्रकाशाच्या' अखेरच्या अध्यायात असे म्हणतो की–

प्रथम शाखे अवतरला । साता वरुषा व्रतबंधु जाला
वेदाध्ययन करौंनि आला । गोदातीरासीं ।।
तेथ सासटीचा पिंपळपत्तनी । संन्यासु घेतला पंचदेओधामनी
मग पांचाळेश्वरा येऔनी । श्रीदत्त भोजन गुंफेसी ।।
नमस्करौनी श्रीदत्तासी । गोविंदप्रभू बीजे करी द्वारावतीसीं

( 'आत्मतीर्थ प्रकाश', १२.६५३, ६५४, ६५६ )

'श्रीचक्रपाणि चरित्रा' तही "मग सोळा वर्षा संन्यास स्वीकरीला: संन्यास स्वीकारलेया नंतरे श्रीप्रभु द्वारावतीयेसी बीजे केले" ( लीळा क्र. १२ ) असा घटनाक्रम वर्णिला आहे. मूर्तिज्ञानकारानेही 'संन्यास वेखे द्वारावतीए गमन' असेच म्हटले आहे.

या सर्व चर्चेतून डॉ. ढेरे म्हणतात की, "वय आणि स्थान या बाबतीतील मतभेदाशी आपणाला कर्तव्य नाहीं. गोविंदप्रभूंनी ऐन तारुण्यात संन्यास स्वीकरला होता आणि तोही शांकर परंपरेतील संन्याशा-कडून, हे सत्य आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे."

पुढे श्रीचक्रधर स्वामींनी आपल्या उत्तर जीवनात पैठण ग्येथे संन्यास स्वीकारून आपल्या नव्या विचार प्रणालीचा उपदेश सुरू केला पण स्वामींच्या संन्यासाचे स्वरुप ढेरे यांना ज्ञात नसल्याचा उल्लेख ते करतात. ढेरे म्हणतात– शांकर परंपरेतील संन्यासी स्वामीकडे कलुषित दृष्टीने पांहत असत हे लीळाचरित्रावरून आढळते. स्वामींनी मात्र एकदा शांकर परंपरेशी आस्थाबंध जोडणारे उदगार काढले होते याचा उल्लेख करून डॉ. ढेरे 'सैहाद्र लीळे' तील लीळा उद्धृत करतात ती अशी [४]

शंकराचार्य वरप्रदान ।। गोसावियाते बेंलोपुरी अवस्थान असे गोसावियाते महादाइसी पुसीलेः जी संन्यासियांसि सीखा सूत्र नाहीः संध्यास्नान नाहीः कव्हणीची षड्कर्मं नाही

आणि यांसि लोकीकी एसनी मान्यता काइसी जीः गोसावी म्हणितलेः संकराचार्ये श्रीदत्तात्रेय प्रभूते वीनविलेः जीः जीः म्या दर्शन केले असेः ते लौकीकी मान्य होआवेः श्रीदत्तात्रेय प्रभुनि म्हणितलेः होइलः म्हणोनि जालें ॥ ७ ॥

यावरून डॉ. ढेरे म्हणतात की, शांकर दर्शनाची एवढी लोकमान्यता ही श्री दत्तात्रेय प्रभूंच्या कृपेमुळे झालेली आहे.

श्रीदत्तात्रेयांच्या कृपेमुळे शांकरमताला मान्यता मिळाली हे मान्य पण त्यामुळे त्या परंपरेशी आस्थाबंध जुळत नाही. तो उत्तरकालीन ग्रंथ-काराच्या मन्तव्यामुळे जुळतो.

शंकराचार्य वरदभेटी । दर्शनमुद्रा मान्य केली जटी
तो दशनाम-आचार्य पटी । स्थापिला तुवा

( येल्हणसुत मंडळीकाची 'श्रीकृष्ण बाळ क्रीडा', १-२९ ।[५] )

'दर्शनप्रकाश'चा कर्ता मयंकसुत मुरारी म्हणतो-[६]

शंकराचार्यांचे चौघे शीक । प्रथम विश्वरुप दुसरा तोटक
तिसरा हस्तमलक । चौथा पृथ्वीधर ॥
तेथोनि तीर्थादि दशनाम । आणि त्रयोदश उत्तम
दोन्ही मार्ग प्रतिष्ठिले परब्रह्म । श्रीदत्तराजे ॥

येल्हणसुत मंडळींकाच्या मते शंङ्कराचार्यांना श्रींदत्तात्रेयप्रभूने दश-नाम संन्यासाच्या आचार्यपटावर स्थापन केले व मुरारीच्या मताने शाङ्कर मत व महानुभाव पंथ या दोन्ही मार्गांची श्रीदत्तात्रेयप्रभूने प्रतिष्ठापना केली. त्यामुळे दोहींचा आपसामध्ये बंधुभाव निर्माण होऊन आस्थाबंध जुळतो. पण हे वरील लीळेशी विसंगत आहे. कारण लीळेत शाङ्कर-मताची श्रीदत्तात्रेय प्रभूने स्थापना केली असा उल्लेख नसून, त्यांनी निर्माण केलेल्या दर्शनाला फक्त लोकमान्य होण्याचा वर दिला. एवढेच त्या

दर्शनाविषयी म्हणता येते. महानुभाव पंथाचे तसे नाही. कारण श्रीदत्तात्रेय श्रींचांगदेव–श्रीगुंडम राऊळ श्रीचक्रधरस्वामी या परंपरेने स्वामींनी परावर शक्तीचा स्वीकार केला. त्यानंतर महानुभाव पंथाची स्थापना केली. म्हणूनच श्रीचक्रधर स्वामी ' या मार्गासि श्रीदत्तात्रेय प्रभू आदिकारण ' असे म्हणतात. त्यामुळे महानुभाव पंथाच्या स्थापनेला जसे श्रीदत्तात्रेयप्रभू कारण ठरतात तसे शाङ्कर मताच्या प्रस्थापनेला कारण ठरत नाहीत. पण अशा उत्तरकालीन ग्रंथाच्या आधारे शांकरमताचा व महानुभाव पंथाचा दुवा ढेरे यांनी साधला आहे. यावर भर देण्यासाठी डॉ. ढेरे म्हणतात महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी हे संन्यासी होते व त्यांचे गुरु श्री गोविंदप्रभू यांनी तर शांकर परंपरेतील संन्यास स्वीकारला होता. त्यामुळे महानुभावांनी या परंपरेविषयी आस्था बाळगणे स्वाभाविक आहे.

श्रीचक्रधर स्वामींनी शांकर मताचा संन्यास स्वीकारला नव्हता. श्री गुंडम राऊळांनी जरी शांकर संन्यास स्वीकारला होता. तरी तो श्रीचांगदेव राऊळांनी मोडून टाकला. डॉ. ढेरे म्हणतात की, श्रीगोविंदप्रभूंना श्रीचांगदेव राऊळांनी अवधूत दीक्षा दिली होती. त्यांनी त्यांचा दंड मोडून गोमतीमध्ये फेकून देऊच एकप्रकारे त्यांचे संन्यासधर्माचे कर्मकांड मोडून टाकले आणि त्यांना स्वतः सारखेच विधिनिषेधाच्या अतित असलेले 'अवधूतत्व' प्रदान केले. मग डॉ. ढेरे यांचे लिखाण यावरुन दुटप्पी वाटत नाही काय ? असाच दुटप्पीपणा डॉ. ढेरे यांनी अनेक ठिकाणी केला आहे. हरिनाथाचे नाव जुळविण्यासाठी स्वामींना भडोचचे हरिपाळ मानले आहे. व त्यांचे चरित्र हरिपाळाशी जुळत नाही ते श्री चांगदेवराऊळांशी जुळविण्यासाठी प्रधानपुत्र हरिपाळाची पूर उठविण्याची कथा काल्पनिक मानून श्रीचांगदेव राऊळ व श्रीचक्रधरस्वामी यांना देहतः व आत्मतः ही एक मानले आहे.

ज्याठिकाणीं जे त्यांच्या पथ्यावर पडेल तेथेच ते विधान करतात ( पृ. २३० वर ते गोविंद प्रभूंना शांकर संन्यासी ठरवितात तर पृ. २३१ वर त्यांना 'अवधूत ठरवितात. ) महानुभाव पंथ संस्थापनेच्या अगोदर

श्री गोविंदप्रभूंचा शांकर संन्यास सोडविला गेला व श्रीचक्रधर स्वामींनी तर तो स्वीकारलाच नव्हता. अशा स्थितीत महानुभावांनी त्या परंपरेविषयी आस्था बाळगणे. कसे शक्य आहे. पान २२९ वर ढेरे लिहितात शांकर परंपरेतील सन्याशी त्यांच्याकडे कलुषीत दृष्टीनेच पाहत असत. आस्थाबंध नव्हता म्हणूनच संन्याशी स्वामीकडे कलुषीत दृष्टीने पाहत असत असे मानावे लागते. आस्थाबंध असल्यावर ते कलुषीत दृष्टीने कसे पाहतील ? या वरून डॉ. ढेरे यांच्या मतातील फोलपणा नजरेस येतो. याचाच अर्थ सोयीस्कर व फायदेशीर गोष्टीच फक्त ढेरे यांनी स्वीकारल्या आहेत.

येथेही लीळा चरित्रातील शंकराचार्यांनी दर्शन निर्माण केल्यानंतर श्रीदत्तात्रेयांना ते मान्य होण्यास वर मागितला व त्यांनी तो दिला हे ढेरे यांना मान्य नसून मुरारिमल्ल आदि ग्रंथकारांनी शांकरमत व महानुभाव पंथ या दोन्हींचे श्री दत्तात्रेयांनी प्रतिष्ठापन केलें हे मान्य केले आहे. त्यामुळे गोविंदप्रभूंचा संन्यास शांकर संन्यास नव्हता आणि त्यांचा 'अवधूत वेष' स्वीकारातील अवधूत्वाचा संबंध शैव मताशी न जोडता 'अवधूत' म्हणजे 'विरक्त' या अर्थानेच या अवधूत दीक्षेचाही विचार क्रमप्राप्त ठरतो.

## श्रीगोविंदप्रभूंचा वेष स्त्रीवेष नव्हे, आर्यं वेषच !

श्रीगोविंदप्रभूंच्या 'आर्ष' वर्तनाची कल्पना यावी म्हणून डॉ. ढेरे 'विचार बंद' ग्रंथातींल उतारा जो डॉ. कोलते यांनी 'श्रीगोविंदप्रभू चरित्राच्या' प्रस्तावनेत उद्धृत केला आहे तो देतात[७]–

"आर्य म्हणजे आरिखपण: म्हणजे मनुष्य व्यवस्थेशी अनसारखेपण। ... मा तर ते आरिखपण कैसे : ना उठणे म्हणजे शीघ्रता : बैसणे म्हणजे उकड : तथा श्रीचरणावर श्रीचरण घालौनी : चालणे म्हणजे गगनाची वास पहात : तथा दुडदुड धांवणे : बोलणे म्हणजे वेंमळ : तेंचि कैसे : ना : मेली आली : मेली गेली : तथा तेंचि शब्द पुन्हां पुन्हां बोलणे : घेणे म्हणजे आसडुनि : तथा लाख भाकर : आमलक : तथा : बदरीफळे बलात्कारे

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२६२९
निबंध रपाउ



घेणे : देणे म्हणजे टाकुन घालणे : यथा सेंगुळ बड्डे : नेसणे म्हणजे सोळा हात वस्त्र नीरीया घालुनि वामांगी पदर घेणे: जेंचि वेढणे तेंचि पांघुरणे: ऐसा वेष आरिख: म्हणजे मळवट: कुंकुम भरणे: माथां भांग खोपा जवादि भरणे: कर्णी सुकडी लावणे: पायी वाकी : गळां सांखळ मुकुटी तेल: वेणी: नाभिचुंबीत खाड तथा स्मश्रु: श्रीकर भवंडणे: टाका भवरी देणे: विहरण वर्तन आवघे आरिख: हे वेषाचे अंगीकृत तरि मूर्ति आरिख ते कैसी: ना पुराचे सौंदर्य ते नाही: आन मूर्ति शामगौर: आणि वामनेत्र लावणे: वाम कनिष्टिका वक्र करणे : हे मूर्तीचे आरिखत्व : ।"

श्री गोविंदप्रभूंच्या आर्षत्वाहूनही डॉ. ढेरे यांना उपरोक्त उताऱ्यावरून आणखी वेगळा बोध होतो. त्यांच्या मते,

(१) येथे वर्णिलेला श्रीप्रभूंचा वेष हा स्त्रीचा वेष आहे.

(२) ते सोळा हाती बस्त्र निऱ्या घालून नेसत असून डोक्यावरून पदर घेत असत.

(३) जरी लांब दाढी आणि मिशा राखल्या असल्या तरी डोक्यावरील केसांचा भांग पाडून ते वेणी घालत असत.

(४) त्यांच्या कानांत वलये, पायात वाक्या आणि गळयात साखळी परिधान केलेली असे.

अशा प्रकारे, स्त्रीची वस्त्राभरणे परिधान करून ते विहरत असत. पुरुषाने 'स्त्री' होऊन राहणे हा 'वामा भूत्वा यजेत् पराम्' या भूमिकेला अनुसरून उघड उघड शाक्त तांत्रिक आचार आहे. श्रीप्रभूंच्या या तांत्रिक वेषाचे गूढ हा संशोधनाचा विषय ठरावा असे आपले मत डॉ. ढेरे यांनी व्यक्त केले आहे. पण वस्तुतः हा स्त्री वेष नसून आर्यवेषच आहे. कारण बायलें स्त्रीवेष धारण करतांना लुगडे नेसतात, चोळी घालतात, उठण्यात, बैसण्यात, बोलण्यात, चालण्यात बायकी थाटाचा अभिनय करतात, व दाढीमिशी साफ करतात. तसे श्रीप्रभूंचे नाही. ते लुगडे नेसत नव्हते, चोळी घाळत नव्हते. जसे निऱ्या घालून ते धोतर नेसत होते. तसे

दाढी मिशी पण ठेवत होतें. उठणे शीघ्रतेने, बैसणे–उकड तथा श्री चरणावर श्रीचरण घालणे, चालणे ते गगनाची वास पहात पहात दुड दुड धावणे या गोष्टी स्त्रीवेषाला शोभण्यासारख्या नाहीत. म्हणून त्यांचा वेष स्त्रीवेष किंवा पुरुष वेष दोन्ही रूपाचा नाही. तो निराळाच आहे. म्हणूनच आर्यवेष आहे.

डॉ. ढेरे म्हणतात ' वामा भूत्वा यजेत् पराम् ' या तांत्रिकाच्या वचनाने स्त्री वेषाबरोबर शक्तीची उपासना करणे पण आवश्यक असते ती उपासना श्रीगोविंदप्रभू करीत नव्हते. यावरून श्रीप्रभूंचा तांत्रिक स्त्रीवेष नव्हता हे सिद्ध होत आहे. पण त्यांनी आर्यवेष का स्वीकार केला होता ? याचे उत्तर त्यांच्या चरित्रांचे सूक्ष्मावलोकन केल्यानेच मिळणार आहे.

" पाखळा बालक पांगुरवणे : ।। बाइल येकि पाणीयेसि नीगाली. तीचीये घरी वडील धाकुटें कोण्ही माणूस नाही : तव गोसावीं बीजें केलें : तीया म्हणीतलें : " राऊळो ! नावेक लेंकरू घेया हो : हेलभरी पाणीयां आणींत " मग गोसावी घेतले : नावेक खेळवीलें : मग खुंटीची पाखाल काढीली: येका आंखेयावरि नीजवीलें : एक आंखे पांगुरवीलें : आणि गोसावी बीजें केंलें : ।।

( श्रीगोविंदप्रभु चरित्र लीळा क्र ७. )

वीसांन घालणे : ।। एकु दी एकली एकली एकटीक (एकट ते) लेंकरूवातें न्हांणु बैसली : ते मनोर्थ करी : " राऊळ येते कां तरि वीसांन घालीते " तवं गोसांवी बीजें करीति : ते श्रीकरी तांबींया घेति : रोजणीचे पाणी बीसांनघालीति : मग म्हणे : " पुरेपुरे राऊळो ! ' मगा ते लेंकरुं न्हाणा : पाळणा घाली : नीजवी : मग गोसांवी बीजे करीति :

( श्रीगोविंदप्रभू चरित्र लीळा क्र ।।३९।। )

सकळ–ग्रहीं व्यापारू करणें ।। एकाचेया घरासि गोसावी बीजे करीति : तव एको स्त्रीया म्हणीतले : " राउळो ! पैलु पाटु आंणुनि दया कां ! " तयांचा पाटु आंणौनि देतिः एकांचा तांबीया भरूनि देतिः

एकांचे मडकें धों लागति : एकांचे मुसळ धरीती : एकांसि जेऊ वाढीति:
...... ऐसा सकळग्रही व्यापारू करीति :

( श्रीगोविंदप्रभु चरित्र लीळा क्र. ॥ ४० ।)

श्रीगोविंद प्रभु महाराजांच्या चरित्रात अशा अनेक लीळा आहेत. ज्यावरून माहिती पडते की, ते अनाथ असहाय रंजल्या गांजलेल्या महिलांचे सहाय्यक होते. अशी सहाय्यता करणे त्यांना आर्ष स्त्रीवेष धारण केल्यामुळे सहज शक्य झाले होते. जर ते पुरुष वेषात वावरणारे असते तर त्यांना तशी सहाय्यता करणे व अनाथ महिलांना ती घेणे पण कठीण झाले असते. कारण एकतर त्याना सहाय्यता घेण्यात लाज वाटली असती व दुसरे अपवादाचेही भय होते म्हणून आर्ष वेषात त्यांचे राहणे उचितच होते. वस्तुतः ते विदेही अवस्थेत होते. जीवनमुक्तासारखे होते. रुद्धपूरला एकदा न्यायभारती संन्याशांचा मेळा आला होता. तेव्हा म्हाइंभट्टासी त्यांची जीवनमुक्तावस्थेवर चर्चा झाली. त्यावेळेला म्हाइंभट्टानी श्रीप्रभूना जीवनमुक्त म्हणून दाखविले व त्यांनी ते मानले म्हणून ते शाक्त तांत्रिक ठरविणे केव्हाही शक्य होणार नाही.

### श्री प्रभु चौऱ्यांशी सिध्दातील अवधूत– गुंडमराऊळ नव्हेत

श्रीचक्रधर स्वामींना शैव ठरविण्यासाठी डॉ. ढेरे यांनी स्वामीचे गुरु श्री गुंडम राऊळ उर्फ श्री गोविंद प्रभु यांचे चौऱ्यांशी सिद्धातील अवधूत गुंडम राऊळ यांचेशी ऐक्य ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी चांगावटेश्वराच्या 'तत्वसार' ग्रंथातील प्रमाणांकरिता पुढील ओवी दिली आहे

'अवधुतु गुंडम राऊळ शवरी । मनु अजागिरी ।
जिराबाई खेचरी । देमादेवी ॥ ८७७ ॥

अवधूत विशेषण व गुंडम राऊळ नाव यावरून चौऱ्यांशी सिद्धातील अवधूत गुंडम राऊळ म्हणजेच श्रीगोविंदप्रभू हेच होते. असे श्री. ढेरे यांचे

म्हणणे आहे. पण पाशुपत शैव जर आपल्याला अवधूत व राऊळ म्हणवित होते, तर त्या पाशुपतापैकीच दुसरी कोणा चौऱ्यांशी सिद्धातील अवधूत गुंडम राऊळ नावाची व्यक्ती नसेल कशावरून ? जर श्रीगुंडम राऊळ चौऱ्यांशी सिद्धापैकी एक असते तर अवधूत या विशेषणावरून स्वामींचे गुरु श्रीगुंडम राऊळ यांना चौऱ्यांशी सिद्धात समाविष्ट करण्याकरिता दुसरा प्रबळ पुरावा ढेरे यांना देता आला असता पण ते देता येणे यांना शक्य झाले नाही.

चक्रपाणि पान १८३वर डॉ ढेरे म्हणतात "सिद्धां विषयीची स्वामींची माहिती वैशिष्ठ्यपूर्ण आहे. कान्हपादाचे वर्णन करताना 'तमासवे सातसे डबुरवां अंतराळी वाजेति : सातसे भूमंडळीं वाजेति : ' असे त्यांनी म्हटले आहे चौऱ्याऐंशी सिद्धांची जी पारंपारिक चित्रे उपलब्ध झाली आहेत, त्यात कान्हपाद अथवा कण्हपा याच्या चित्रात अनेक डमरू पहायला मिळतात."

डॉ. ढेरे यांच्या चौऱ्यांयशी सिद्धांची चित्रे उपलब्ध आहेत हे सिद्ध होते. तेव्हा श्री गुंडम राऊळ म्हणजे श्रीगोविंदप्रभू यांचे चित्र उपलब्ध असणारच. त्या चित्रात गुंडम राऊळाचा आर्यवेष, नाभीचुंबीत दाढी, कानात वलये, पायात वाक्या, गळयात साखळी परिधान केलेली. असे चित्र असावयास पाहिजे. पण आम्हाला वाटते असे चित्र त्या अवधूत गुंडम राऊळाचे नसावे. तसे असते तर तो फारच सबळ पुरावा होता तो यांनी जरूर पुढे केला असता कदाचित ब्लॉक करूनही तो छापला असता पण तसे चित्र नसून निराळेच असेल म्हणूनच त्यांनी तो पुरावा मांडला नाही यावरून सिद्ध होते की, चौऱ्यायशी सिद्धातील श्री अवधूत गुंडम राऊळ दुसरेच कोणी असावेत. स्वामींचे गुरू चौऱ्यांशी सिद्धातील श्रीगुंडम राऊळ म्हणजे श्रीगोविंद प्रभु नव्हेत.

## श्रीचक्रधरांचे आणखी एक गुरु : उधळीनाथ

भडोचच्या प्रधानाचे तरुण पुत्र हरिपालदेव हे विरक्त होऊन, रामयात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रात कसे आले आणि ऋद्धिपूर येथे श्रीगुंडम

राऊळांकडून परावर शक्तींचा स्वीकार करून 'चक्रधर स्वामी' कसे बनले, हा इतिहास लीळा चरित्राच्या वाचकांना सुपरिचित आहे. अगदी तरूण वयात चक्रधरांनी ऋद्धिपूरच्या श्रीगुंडम राऊळांकडून दीक्षा स्वीकार केली आणि उन्मनस्क अवस्थेत ते परिभ्रमण करीत राहिले. या परिभ्रमणाच्या वेळी श्रीचक्रधरांनी उधळीनाथ या विद्यावंताशी भेट झाली त्या भेटीसंबंधी लीळाचरित्रात 'कांतिएची लीळा' या नांवाची एक लीळा आहे.[८] ती अशी–

कांतीए श्रीचांगदेव राऊळ शिष्या भेटि
" महात्मे हो : तुम्ही श्रीप्रभुचेया दर्शना कां जा : "
" जी : आमुचे पर (म) गुरु म्हणोनी : "
" तुमचे परम गुरु ते कांतीए असति : "
मग कांतिएची लीळा सांघीतली :

कांतिएची लीळा: कांतिएसी पाणि पात्र करावेया नगरामध्ये बीजे केले : तेथ द्वारावतीकारांचे अनुग्रहीत राजगुरु होउनि वर्तत असति : तेही उपरिएवरुनि देखीले : आपुले सीष्याकरवि बोलविले : तेथ गोसावी बीजें केले : तीही म्हणीतले :" ऐसा पींडु : मा ऐसा का उपेक्षिला : गोसावी उगेचि होते : मग तीही विद्या संक्रमू आदरिली : गोसावी न स्वीकरीति : तिही म्हणीतले : पुरुषु हठिया असे : मग तिही म्हणीतले : " जी जी : आमते वयस्तंबनि विद्या असे : तिया पींडु धरे : ते स्विकरावी जी : " मग स्विकरिली महदाईसी पुसीले : जी जी: गोसावी विद्या स्विकरीली तरि तयांसि काइ जाले: " "तयांची वीद्या अपूर्ण होती ते संपूर्ण केली : जाली"

उपरोक्त लीळेद्वारे श्रीचक्रधर स्वामींनी उधळीनाथ या राजगुरुकडून वयस्तंभिनी विद्या स्वीकारल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे डॉ. ढेरे यांनी आराध्य मुरलीधर शास्त्री यांच्या कडील हस्तलिखितातील 'कांतीयें श्रीचांगदेव राऊळा : सीक्षा भेटी' या बृहत पाठाचा उल्लेख पान २३५-२३६ वर केला आहे आणि म्हटले आहे की " चांगदेव राऊळांचे एक

विद्यावंत शिष्य उधळीनाथ नामक एक योगी कांती नांवाच्या नगरात राज-गुरुपदाचा सन्मान अनुभवीत होते चक्रधर उमनस्क अवस्थेत भ्रमण करता करता कांती नगरातील राज रस्त्यावरून दुर्गाच्या कडेने जात होते. त्यांना पाहिल्यावर उधळीनाथांनी शिष्याकरवी त्यांना बोलावून घेतले आणि त्यांनी आपल्या पिंडाची ( शरीराची ) उपेक्षा केल्याबद्दल खेद व्यक्त केला. त्यानंतर उधळींनाथांनी चक्रधरांचे शरीर स्वतः पूसून काढले आणि त्यांना ‘दृढपिंडकरणीं विद्या’ व ‘वयस्तंभिनी विद्या’ आपणाकडून स्वीकारण्याची विनंती केली. स्वामींनी ती विनंती मानली व विद्या स्वीकारून उधळीनाथांना कृतार्थ केले.”

डॉ. ढेरे यांनी वरील प्रमाणे उल्लेख करून ज्या कांती नगरीत प्रसंग घडला ते ‘ कांति = काटोल, ता. काटोल, जि. नागपूर ( मध्यप्रांत ) ही स्थाननिश्चिती महानुभाव परंपरेतून डॉ. कोलते, नेने व डॉ. तुळपुले या तिघांनी स्वीकारल्याचे स्पष्ट केले आहे. आणि हे कांती म्हणजे काटोल नसून कांती म्हणजे कांची (कांजीवरम्) हे तामिळनाड मधील प्रख्यात पुरातन नगर असावे असे मानून त्याला काही आधारही देण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय कांची हे शैव संप्रदायाचे एक महाकेंद्र आहे. असे मानून ‘ कांती ’ हे ‘ कांची ’ चे पर्यायनाम असल्याचे म्हटले आहे. पाशुपत परंपरेतील योगी उधळीनाथ हा तेथील एखाद्या राजपुरुषाचा राजगुरु म्हणून सन्मान अनुभवीत होता आणि दक्षिणेत उन्मनस्क स्थितीत भ्रमण करणाऱ्या चक्रधरांची आणि त्याची भेट कांची येथेच झाली, असे मान ण्यास अडचण उरत नाही असे डॉ. ढेरे यानी म्हटले आहे.

## कांती म्हणजे काटोलच !

महानुभाव पंथ कांती म्हणजे काटोल, ता. काटोल, जि. नागपूर ( मध्यप्रांत ) असे मानतो. येथे श्री चक्रधरस्वामी उधळीनाथाकडून वय-स्तंभिनी विद्या स्वीकारली, व सहा महिने वास्तव्य केले. पण ढेरे कांती म्हणजे कांची म्हणतात, हे यापूर्वी आपण पाहिलेच आहे. त्यांचे म्हणणे

असे की, 'उधळीनाथ राजगुरु होते हे आपणास लीळाचरित्रावरून समजते.' काटोल राजधानी होण्याचा संभव नाही. कांची हे राजधानीचे ठिकाण होय.

डॉ. ढेरे ज्याप्रमाणे सालबर्डीचा डोंगर न घेता श्रीशैलपर्वत घेतात, डाकराम म्हणजे सुकळी डाकराम न घेता डाकराम म्हणजे आंध्रातील द्राक्षाराम घेतात. त्याचप्रमाणे कांती म्हणजे काटोल न घेता तामीळनाडू मधील कांची घेतात. याचे कारण असे की, श्रीचक्रधर स्वामींना पाशुपत शैव ठरवावयाचे आहे. कांची हे पाशुपतशैवांचे महाक्षेत्र म्हणून ते स्वामींना शैव ठरविण्यासाठी अत्यंत उपयोगी पडणारे आहे. स्वामींनी उधळीनाथापासून विद्या स्वीकारलेली कांती म्हणजे काटोल नसून कांची आहे. या विषयी ते तीन मुद्दे उपस्थित करतात.

(१) कांती म्हणजे काटोल हे भाषिकदृष्टचा पटण्यासारखे नाही. कांतीचे काटोल हे परिवर्तन होऊ शकणार नाही.

(२) काटोल हे एखाद्या राजकुलाच्या राजधानीचे ठिकाण असल्याचे ऐतिहासिक पुरावे अजून उपलब्ध झालेले नाहीत.

(३) कांतीपुर हे सप्तपुरीपैकी 'कांची' नगराचे नामांतर असल्याची नोंद म. म. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी 'प्राचीन भारतीय स्थलकोशा' मध्ये केली आहे.

कृष्णमुनी डिंभाने ऋद्धिपूर महात्म्य या ग्रंथात महानुभावीयांना पवित्र वाटणाऱ्या सात स्थलावर सातपुऱ्यांच्या महात्म्यांचा आरोप केला आहे. असे डॉ. ढेरे यांनी लिहून कृष्णमुनीच्या ऋद्धिपूर महात्म्यातील 'फलस्थानाते बोलीजे कांती' असे नमूद केले आहे. सारांश कृष्णमुनीने सप्तपुऱ्यातील कांतीचा आरोप फलस्थानावर केला आहे. त्यांना अभिप्रेत असलेली कांती म्हणजे कांचीच होय. त्याचप्रमाणे उधळीनाथ यांची कांती म्हणजे कांचीच घडू शकते, काटोल नव्हे. असे डॉ. ढेरे यांचे म्हणणे आहे. त्याचाच विचार करू या.

डॉ. ढेरे यांचा एक मुद्दा असा की, कांची म्हणजे काटोल हे भाषिक

दृष्ट्या पटण्यासारखे नाही. जर त्यांना आमर्दकचे रुपांतर औंढा हे पटते तर कांतीचे काटोल रुपान्तर का पटू नये ? आमर्दकांचे औंढयात रुपांतर करताना फक्त आवर्णाचे साम्य आहे. त्यातही आचा औ झाला आणि कांचीचे काटोल होताना पहिला वर्ण 'का' जसाच्या तसाच राहतो. मग आमर्दकाचे आऊंढयात रूपान्तर होण्यापेक्षा कांतीचे काटोल मध्ये होताना अधिक साम्य नाही काय ? आणि सर्वत्र अपभ्रंशानेच रुपान्तर होते असे म्हणता येत नाही, हे डाकराम सुकळीचे विवेचन करताना हिवरळीचे जालना इंद्रप्रस्थाचे दिल्ली इत्यादी दाखविलेच आहे. मग या ठिकाणीच डॉ. ढेरेंना कांतीचे काटोल होताना अडचण का भासावी ?

दुसरा मुद्दा काटोल कुण्या राजकुलाच्या राजधानीचे ठिकाण असल्याबद्दलच्या ऐतिहासिक पुराव्याचा अभाव. कांतीच्या लीळेमध्ये ते गाव कोण्या मोठ्या राजकुलाच्या राजधानीचे शहर होते असे म्हटलेले नाही. त्यात केवळ राजाचे राजगुरु उधळीनाथ एवढेच म्हटले आहे. पूर्वी एक–एक दोन–दोन गावाचेसुद्धा राजे होते. त्यांच्या राजधान्या खेडेगावातसुद्धा होत्याच. या खेडेगावच्या राजधानीची जाणीव आजसुद्धा उपलब्ध आहे. सातारा जिल्हयात साताऱ्याच्या जवळच राजाचे कुर्ले या नावाच्या राजधानीचे खेडे आजही उपलब्ध आहे. तशाच कोण्या छोटयाशा राज्याचे राजगुरु उधळीनाथ असतील. त्याला राजकुलाच्या राजधानीचे ठिकाण असल्याबद्दलच्या ऐतिहासिक पुराव्याची काय गरज आहे ? अशा छोटयाशा राजाची राजधानी ' काटोल ' संभवत नाही काय ? काटोलला स्वामींच्या चरण स्पर्शाने पवित्र झालेल्या स्थानावर ओटे बांधले आहेत त्याला परंपरेने महानुभाव संप्रदायिक नमस्कार करतात. ही परंपरा बाजूला सारून त्याऐवजी दुसरे स्थान निश्चित करावयाचे असेल तर त्याला तसा सबळ पुरावा हवा आहे. अशा न टिकणाऱ्या युक्तीने ते सिद्ध होऊ शकणार नाही.

तिसऱ्या मुद्याचा विचार तर कांती म्हणजे काटोल याशी संबंधच पोहोचू शकत नाही. उधळीनाथाच्या कांतीचा उल्लेख लीळाचरित्रात असून सप्तपुऱ्यातील कांतीचा उल्लेख कवी डिंभाच्या ऋद्धिपूर महात्म्यात आहे. या

दोहोच्या काळातील अंतर साडेतीनशे वर्षाचे आहे. त्या कांतीचे आणि या कांतीचे शेकडो मैलांचें अंतरही आहे. एका नावाची दोन गावे नसतात. त्यांचे निरनिराळया दूरदूरच्या प्रदेशात त्या नांवाचे निरनिराळे रूपांतर होणे शक्य नाही काय ? मग ती कांती म्हणजे कांची यावरून ही कांती-सुद्धा कांचीच हे कशाच्या आधाराने ठरवावयाचे ?

डॉ. ढेरे यानीं याविषयी आणखी एक बाब उपस्थित केली आहे. लीळाचरित्रात पर्वती क्रीडा, त्यानंतर 'कांतीये : श्रीचांगदेव राऊळां : सीक्षा भेटी ' त्यानंतर ' आंध्रदेशी तैल्यकारा भेटी ' असा क्रम आहे. या क्रमाचा विचार केला म्हणजे श्रीपर्वतापासून काटोल फार दूर पडते. व तामीळनाडूतील कांची जवळ पडते. म्हणून कांती पदाने कांची घेणेच योग्य आहे असे डॉ. ढेरे म्हणतात. त्यांची ही बाबही अशीच फोल आहे. त्यांच्या मताने पर्वती क्रीडा म्हणजे श्रीपर्वतावर क्रीडा हे सिद्ध झाले आहे, पण त्याचा विचार करून पर्वतीक्रीडा म्हणजे सालबर्डीच्या पर्वतावर क्रीडा हे दाखविलेच आहे. अशा स्थितीत श्रीपर्वतापासून कांची जेवढीं दूर आहे त्यापेक्षा सालबर्डीपासून कांती म्हणजे काटोल फार जवळ आहे. म्हणून ही बाबही कांती म्हणजे कांची सिद्ध करण्यास पुरेशी नाही.

## श्रीचक्रधरांची परंपरा निष्ठा आणि परंपरा विरोध–

डॉ. ढेरे पृष्ठ २४२ वर असे म्हणतात की–[९]

" चक्रधर स्वामींचे परमगुरु चांगदेव राऊळ आणि गुंडम राऊळ व उधळीनाथ हे तिघेही नाथ संप्रदायात समाविष्ट झालेल्या लाकुल पाशुपत संप्रदायाचे अनुयायी असून चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ या दोघांचा शाक्त तंत्राशीही जिव्हाळचाचा संबंध होता, असे मानायला पुरावे उपलब्ध आहेत, हे आपण पाहिलेच आहे. महानुभाव संप्रदायाच्या स्थापनेनंतरचे चक्रधरस्वामी या परंपरेचे विरोधक आहेत, हे नव्याने सांगण्याची आवश्यकताच नाही. म्हणजे चक्रधर स्वामींनी आपल्या परंपरेशी मतभेद झाल्यानंतर नवाच संप्रदाय स्थापन केला, असे

मानावे लागते. पण आश्चर्य असे की, तीव्र मतभेदापासून पूर्व-परंपरेच्या विरोधात नवा संप्रदाय स्थापन केल्यानंतरही स्वामी आपल्या परंपरेविषयी दृढ श्रद्धाभाव बाळगून होते. आपल्या गुरुविषयीचा आणि परमगुरुविषयीचा हा पूज्यभाव त्यांनी कधी उणावू दिला नाही. आपल्या शिष्यांनाही त्यांनी या दोघां पुरुषांविषयी श्रद्धाभाव पाळायला वारंवार सांगितले होते.

परंपरा विरोधातही चक्रधर स्वामींनी ही परंपरानिष्ठा कशी टिकविली, परंपरा निष्ठेमुळे परंपरेशी असलेल्या त्यांच्या प्रामाणिक मतभेदांना बाधा कशी पोचली नाही, नवविचार प्रवाहाच्या काळात पूर्वपरंपरेतील अनेक पुरुष हयात असूनही त्यांनी आपल्या कार्याचा तोल कसा सांभाळला, या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक ठरते. या अत्यंत नाजूक परिस्थितीतून वाटचाल करण्यासाठी स्वामींनी जो उपाय शोधला, तो पुढीलप्रमाणे—

(१) चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ आणि आपण स्वत: हे तीनही परमेश्वरावतार असल्याचे त्यांनी घोषित केले, त्यामुळे हे तीनही पुरुष श्रद्धा स्थानांच्या एका उच्चतम श्रेणीत आले.

(२) यापैकी पहिले दोन अवतार हे परमेश्वराच्या उभय शक्तीपैकी एक शक्ती आच्छादून आणि एकच शक्ती प्रकट करून अवतरले होते. परंतु आपण स्वत: मात्र उभयशक्ती प्रकटून अवतरलो आहोत, ही बाब त्यांनी आपल्या शिष्यांच्या मनावर दृढतेने ठसविली. यामुळेच चांगदेव राऊळ आणि गुंडम राऊळ हे दोघेही ईश्वरावतार म्हणून परम वंदनीय असले, तरी जीवोद्धरणाच्या कार्यात ते 'उभयदृश्यावतारी' चक्रधर स्वामीपेक्षा आपोआपच उणे ठरले.

(३) चांगदेव राऊळ हे स्वामींच्या गुरुबोध प्रसंगापूर्वीच 'पुरत्याग' करून गेले होते, परंतु गुंडम राऊळ मात्र स्वामींच्या महानिर्याणानंतर सोळा वर्षेपर्यंत विद्यमान होते. त्यामुळे प्रश्न होता तो फक्त गुंडम राऊळांच्या बाबतीत. तरीही स्वामींनी त्या दोन अवतारांच्या आच्छादिलेल्या व दृश्य ठेवलेल्या शक्तीविषयी आपल्या शिष्यांना जो विचार सांगितला,

तो नेमका गैरसोयीचा वाटणारा. चांगदेव राऊळांनी परशक्ती आच्छादून अवरशक्ती प्रकट केली होती आणि गुंडम राऊळांनी अवरशक्ती आच्छादून परशक्ती प्रकट केली होती, असे स्वामी सांगत असत. याचे कारण असे की, चांगदेव राऊळ विद्यमान नसले तरी त्यांचे अनेक शिष्य प्रशिष्य सर्वत्र विखुरलेले होते. ते स्वामींच्या शिष्यांना भेटण्याचा संभव होता. परंतु गुंडम राऊळ हे विद्यमान असले तरी, ते विदेही अवस्थेत बालोन्मत्त पिशाच्चवत् वावरत असल्यामुळे विचार-प्रचाराच्या पातळीवरची कोणतीही अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया यांच्याकडून घडण्याचा सुतराम संबंध नव्हता गुंडम राऊळ हे पराशक्ती प्रकट करणारे परमेश्वरावतार आहेत, असे म्हटल्याने त्यांच्याविषयी श्रद्धाभाव बाळगणारा सर्व वर्ग संतुष्ट राखणे सोपे झाले आणि चांगदेव राऊळ हे अवरशक्ती प्रकट करणारे अवतार होते, असे सांगितल्याने त्यांच्या अनुयायांच्या ज्ञानाची व आचारांची गौणता आपोआपच ठसविता आली.

(४) चांगदेव राऊळांनी अवरशक्ती प्रकट केलेली असल्यामुळे त्यांनी आपल्या बहुतेक शिष्यांना ( गुंडम राऊळ वगळून ) विद्यामार्गाचाच उपदेश केला; परमेश्वराहून कनिष्ठ असलेल्या आणि पमेश्वरावर ज्यांची प्रतिष्ठा अवलंबून आहे अशा देवतांची उपासना सांगितली, असे स्वामी सांगत असत. यामुळे अर्थातच चांगदेव राऊळांच्या विचार प्रचाराला पूर्णपणे छेद आला आणि त्यांच्या बावन्न शिष्यांना ( स्वामींच्या परिभाषेत विद्यावंतांना ) सहज डावलता आले.

परंपरा निष्ठा आणि परंपरा विरोध यांचा समन्वय घडविण्यासाठी परंपरा विरोधातही परंपरानिष्ठा पाळण्यासाठी स्वामींनी योजलेली ही युक्ती पाहून भगवान् बुद्धाला अवतार म्हणून स्वीकारणाऱ्या वैदिकांच्या कुशलतेचे मला स्मरण होते. "

डॉ. ढेरे यांनी परंपरानिष्ठा आणि परंपरा विरोध या दृष्टिकोणातून केलेले विवेचन सर्वांना स्पष्टपणे कळावे म्हणून हा बृहद् उतारा याठिकाणी दिला आहे. आता त्यांच्या या सर्व मुद्यांचा परामर्श घेताना प्रा. वि. रा.

करंदीकर नवभारतच्या लेखात म्हणतात–[१०] ते विचार या संदर्भात समर्थनीय ठरावेत–

"चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना केली यामध्ये त्यांनी आपल्या गुरुकडून आलेली जुनी परंपरा तोडली, पण ती तशी तोडली तरी त्यांनी तो परंपरेचा धागा नष्ट केला नाही, अशी ढेरे यांची मांडणी आहे. परंपरानिष्ठा आणि परंपरा विरोध हे दोन्ही विशेष त्यांच्या नवसंप्रदाय प्रवर्तनात दिसतात, असे त्यांचे म्हणणे आहे. हे साधण्यासाठी चक्रधरांनी काही गोष्टी मुद्दाम केल्या असे ढेरे सांगतात. चांगदेव राऊळ, गुंडम राऊळ व आपण स्वतः हे तिघेही ईश्वरावतार होत हे चक्रधरांनी सांगितले; पण तसे करतांना पहिल्या दोघात एकेकच शक्ती असून आपण ' उभय दृश्यावतारी ' आहोत असे म्हटले व अप्रत्यक्षपणे त्या दोघांना आपल्याहून गौण ठरविले. चांगदेव राऊळांनी पराशक्ती आच्छादून अवरशक्ती प्रकट केली, असे सांगण्यामध्ये स्वामींचे चातुर्य आहे. चांगदेव राऊळ पूर्वीच समाधिस्त झाले असल्याने त्यांचा उपसर्ग पोचण्याची भीती नव्हती. आणि गुंडम राऊळांना परमेश्वरावतार म्हटले तरी त्यांच्याकडून आपल्या विचार प्रसारात अडचण उत्पन्न होण्याचा संभव नव्हता, असा चक्रधरांच्या मनातील रोख असल्याचे डॉ. ढेरे सुचवितात. ( पृ. २४३ ) पण स्वतःच्या गुरुबद्दल असा भाव चक्रधरांच्या मनात होता असे म्हणणे त्यांच्या पदरी ढोंगीपणा बांधणारे व त्यांना कमीपणा आणणारे नाही का ? शिवाय लीळाचरित्रात गुंडम राऊळाबद्दल चक्रधरांनी जे उद्‌गार काढलेले आहेत ते निरतिशय आदराचे आहेत, त्यात त्यांनी काही हातचे राखून ठेवले आहे असे वाटत नाही चक्रधरांची हीच भावना त्यांच्या शिष्यवर्गात पोचली असणार, कारण तसे नसते तर श्रीचक्रधरांच्या महानिर्याणानंतर दुसरा कोणताही आधार न उरलेले नागदेवाचार्य, म्हाइंभट, केसोबास आदी चक्रधरांचे शिष्य गोविंदप्रभूजवळ जाऊन राहिले नसते. चांगदेव राऊळांना तर बाजूला सारण्याचा प्रश्नच नव्हता, कारण त्यांनी यापूर्वीच हा लोक सोडला होता. चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ यांच्याबद्दल जी

आदरभावना पंथीयांनी बाळगणे आवश्यक होते. ती स्वतः चक्रधरांनीच सांगितल्यामुळे शिष्यांच्या ठायी निर्माण झाली. चक्रधर काही बोललेच नसते तर त्या दोघांबद्दल शिष्यवर्गात पूज्यभाव उत्पन्न होण्याचे कारण नव्हते. त्यांच्या दृष्टीने चक्रधर हे अवतारी पुरुष होते व अशा ईश्वरी विभूतीचे गुरु व परमगुरु म्हणून गुंडम राऊळ व चांगदेव राऊळ हेही ईश्वरी पुरुष होते, आणि तेही चक्रधरांनी तसे म्हटले म्हणून. अशा परिस्थितीत बुद्धाला अवतार मानणाऱ्या वैदिकांच्या कुशलतेशी ढेरे यांनी चक्रधरांच्या या योजकतेची तुलना केली आहे ती अस्थानी वाटते. आणि " स्वामींनी योजलेली ही युक्ती पाहून त्यांच्या कुशल विचार जागरण शक्तीची खात्री पटते." (पृ. २४४) हा त्यांचा निष्कर्षही अकारण वाटतो. वैदिक धर्माच्या पुरस्कर्त्यांना बुद्धाची अडचण वाटत होती, तशी चक्रधरांना चांगदेव राऊळ व गुंडम राऊळ यांची वाटत होती असे म्हणता येत नाही."

डॉ. ढेरे यांच्या परंपरा निष्ठा आणि परंपरा विरोध या विषयीचे विवेचन आम्ही स्वतः न करता डॉ. श्री. वि. रा करंदीकर यांच्या नवभारत मासिकातील प्रकाशित झालेल्या ग्रंथसमीक्षात्मक लेखाचाच अंश उद्धृत केला आहे याचे कारण असे की, आमचे विवेचन पंथीय दृष्टीकोणाचे मानले जाईल. पंथियेतर विद्वानाचे तसे मानले जाणार नाही. डॉ. करंदीकर, डॉ ढेरे यांचे मत देऊन असे म्हणतात की, " स्वतःच्या गुरुबद्दल असा भाव चक्रधरांच्या मनात होता असे म्हणणे त्यांच्या पदरी ढोंगीपणा बांधणारे व त्यांना कमीपणा आणणारे नाही का ? शिवाय 'लीळाचरित्रा'त गुंडम राऊळाबद्दल चक्रधरांनी जे उद्गार काढलेले आहेत ते निरतिशय आदराचे आहेत, त्यात त्यांनी काही हातचे राखून ठेवले आहे असे वाटत नाही." वस्तुतः मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी याच्या विवेचनात वरील मुद्याच्या विवेचनाची काही गरज नव्हती, पण तो त्यांनी का विवेचिला हे समजणे कठीण आहे. पण त्यामुळे अशी शंका मनाला चाटून जाते की, स्वामींचे व्यक्तिमत्व व विलक्षण तत्त्वज्ञान हे डॉ. ढेरे यांना सहन झाले नाही की काय ?

संदर्भ टीपा–

१. वि. भि. कोलते, श्रीचक्रधर चरित्र, मलकापूर, १९५२ पृ. ७७
२. ह. ना. नेने (संपा.), 'श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ', नागपूर, आवृत्ती तिसरी, शके १८६४, उपोद्घात, पृ. १०–११.
३ शं. गो. तुळपुळे (संपा.) लीळाचरित्रः एकांक, नागपूर पुणे १९७२ पृ, १ लीळांक ३
४. वि. भि. कोलते (संपा.), रवळे व्रासकृत सह्याद्रीवर्णन पुणे १९६४ परिशिष्ट, २ पृष्ठ ३०९
५. ल. ना. आव्हाड (प्रका.) ' श्रीकृष्ण बाळक्रीडा ' ढकांबे (जि. नासिक). १९५६ पृ. ३-४
६. शं. न. जोशी (प्रका.), 'मतिरत्नाकर व दर्शनप्रकाश. पुणे, पृ. ९२ (मतिरत्नाकर)
७. वि. भि. कोलते, ( संपा. ) ' श्रीगोविंदप्रभू चरित्र ' प्रस्तावना, पृ. ३४-३५
८. शं. गो. तुळपुळे, (संपा.) ' लीळाचरित्र ' एकांक, नागपूर-पुणे, १९७२, पृ. ४, लीळांक १०
९. रा. चिं. ढेरे, ' चक्रपाणि ', पुणे, १९७७, पृ. २४२/४३
१०. वि. रा. करंदीकर, ' नवभारत ' वाई, सप्टें. १९७७ पृ. ६४

☆ ☆ ☆

५

# श्री चक्रधर आणि हरिनाथ

श्रीचक्रधर आणि हरिनाथ या प्रकरणात डॉ. ढेरे यांनी श्रीचक्रधर आणि हरिनाथ व त्याच अनुरोधाने रामदेव दादोस आणि 'विवेक सिंधू-कार' मुकंदराज यांचे गुरु रघुनाथ यांचे ऐक्य कल्पिले आहे. तसे करीत असतांना त्याविषयी पूर्वकालीन ग्रंथकारांचा आधार मिळत नसल्याने उत्तर-कालीन ग्रंथकाराना अधिक महत्त्व दिले आहे. त्यांना ऐतिहासिक तथ्ये जतन करणारे मानले आहे. सत्याचा शोध करावयाचा असेल तर 'रामदेव' व रघुनाथ यांचे ऐक्य संभवनीय आहे किंवा नाही याचा प्रथम विचार करावा लागेल. कारण यांच्या ऐक्याच्या संभवनीयतेवरच श्रीचक्र-धर स्वामी व हरिनाथ यांचे ऐक्य संभवनीय आहे म्हणून त्याचाच प्रथम विचार करू–

रामदेव (दादोस) हे स्वामींचे एकांकातील शिष्य असले तरी एक तर ते पहिले शिष्य नाहीत. त्यांच्या अगोदर भांडारेकर दामोदर पंडित ओंरंगलचे माधव भगत दोन्ही तैल्यकार हे आहेत. यांच्या (रामदेव दादोसांच्या) भेटी-पासून पैठण पर्यंतच्या एकांक काळातील स्वामींच्या पर्यटणाचा लीळाचरित्र काराने निश्चित रूपाने क्रमबद्ध निर्देश केला आहे. या काळात रामदेवांना

स्वामींची भेट तीन वेळा झाली आहे. पहिली भेट, एकांक भागाच्या अठ्ठावन्नाव्या लीळेत [1] वटेश्वराच्या गुरवाने स्वामींची प्रशंसा ऐकल्यावरून ते आंबजयेला त्यांच्या भेटीस गेले . तेथून त्यांना वटेश्वराला घेऊन आले. हा सहवास तीन दिवसांचा! 'आरोगणा जाली; मग वटेश्वरी पहुडःत्रिरात्र एक अवस्थान ! यावरून हा सहवास तीन दिवसांचा होता हे स्पष्ट होते. यावेळेला रामदेवाला स्वामींपासून स्थित्यानंद लाभला तो अठरा दिवसांचा नसून थोड्या वेळेचा म्हणजे तासाभराचाच होता–

दुसऱ्या भेटीचा वृत्तांत एकांकाच्या एकोणसाठाव्या लीळेत आला आहे.[2] हीं भेटसुद्धा वसनीएहुनी वटेश्वराशी आले तेथे झाली. रामदेव स्वामींना गावात घेऊन गेले. गोपाळ मंदिरात स्वामी एक दिवस राहिले. या लीळेच्या शेवटी म्हटले आहे–

" रात्रीं गोपाळी आरोगण : तेथ पहुड होए : उदया गोसावियां बीजेकरितां म्हणींतलें : 'जी : जी : दीसच्यारि राहावे जी : सुतक सरैल मग मातें गोसावीया सरैसे एवों एइल ? : सर्वज्ञ म्हणीतले : हे आता न ऱ्हाये : मग तुम्ही मागीला कडौनि या' : तंव तेही म्हणीतलें : ' जी जी : दर्शन कव्हणे ठाइ देइजैल ' : सर्वज्ञ म्हणीतले 'मेघंकर प्रांताकडे देईल' . ।।

तेथ पहुड होए या वाक्यावरून तेथे अधिक दिवस राहिले असावे असा संभ्रम निर्माण होतो, पण याच लीळेत जी : जी : आमुते दैविक पडले असे तरी गोसाविया आरोगणालागी अन्न आणू येईल : असा आणि शेवटी दीस चारी रहावे : सुतक सरैल मा माते गोसावीया सरसें एवो येईल : असा उल्लेख आहे. या दोन्ही उल्लेखावरून स्वामी सुतकात आले व सुतक संपण्यापूर्वीच निघून गेले. म्हणून अधिक काळ राहण्याचा संभव नाही.

या भेटीतही दादोसांना एकदोन दिवसापेक्षा अधिक सहवास लाभला नाही.

तिसऱ्या भेटीची हकीकत एकसष्टाव्या लीळेत आली आहे.[3]

'पव्हेदेवा भेटी : वीसइ ब्राम्हणाचे अन्न आरोगण : आंज-नीए वसति' या लीळेत शेवटी " मग दादोस वरणभात घेऊनि आले : गोसावियासि आरोगण दीधली : तेयांति प्रासादु जाला : मग तेथ वसति जाली : एरी दीसीं देवा पाठवणी जाली : "

या तिसऱ्या भेटीचा सहवास एक दिवसाचा आहे.

स्वामींच्या व रामदेवांच्या एकांकातील तीन भेटीतील रामदेवाला पाच सहा दिवसापेक्षा अधिक सहवास लाभला नाही. एवढ्या अल्प काळात रामदेवाला, मुकुंदराजासारख्यांना वेदान्ताचे ज्ञान करून शिष्य करण्याइतके वेदान्ताचे ज्ञान स्वामींकडून लाभणे शक्य झाले असेल काय ? हा विचार डॉ. ढेरे व त्यांचे चक्रपाणिचे प्रस्तावनाकार प्रा. कुरूंदकर यांनी हा करू नये काय ? या दोघा चिकित्सक विद्वानांकडून असा विचार न होणे आश्चर्यजनक आहे.

श्रीनागदेवाचार्यांना महानुभाव तत्वज्ञानात निष्णात होण्यास चार वर्षांचा काळ लागला. ते निरूपण करतांना पुष्कळ वेळा संपूर्ण रात्री निघून जात असत. दिव्यातले तेल सरले तर स्वामींच्या खाण्याचे तूप त्यात घालावे लागत असे. ( 'डोमेग्राम पूजावसर' पहा. ) नागदेवाचार्यांच्या पूर्ण ध्यानांत आले किंवा नाही त्यासाठी निरूपण केलेले पुन्हा पुन्हा स्वामी विचारत. कधी कधी स्वतः म्हणवूनही घेत असत. अशा रीतीने रात्रंदिवस निरूपण करून चार वर्षात नागदेवाचार्यांना तयार केले. तरीपण कसर राहूनच गेली. कारण म्हाइंभट्टाना स्वामीच्या लीळांचे व स्वामींनी निरु-पिलेल्या तत्वज्ञानात्मक त्या त्या वचनांची विचारपूस करण्याकरिता निरनिराळ्या ठिकाणी रवाना केले. त्यांनीही अत्यंत परिश्रमाने ती माहिती मिळविली. मग रामदेवासारख्याना वेदांतात निष्णात होणे व त्यानी मुकुंद-राजासारख्याना शिष्य करून त्या वेदांताचा उपदेश करावा एवढे वेदांत ज्ञान रामदेवानी पाच सहा दिवसात आत्मसात केले हे शक्य आहे काय ?

राजकारणात किंवा पंथापंथाच्या वादात खरे खोटे कसेही विधान केले तरी एकप्रकारे खपून जाते. पण स्वतःला सत्यसंशोधक मानणाऱ्या डॉ. ढेरे यांच्यासारख्यांनी सत्याचा अपलाप करणे व खरेखोटे कसेही विधान करून स्वाभिमत सिद्ध करणे केव्हाही शोभनीय नाही. त्यासाठी संशोधकाने विशेष अवधानपूर्वक विधान करणे योग्य ठरते. डॉ. ढेरे यांनी आपल्या शोधनिबंधात केलेला विचार व त्यासाठी मांडलेले पुरावे ज्या ग्रंथातील आहेत ते ग्रंथ विश्वसनीय आहेत किंवा नाहीत याचा पण विचार करावयास हवा होता. तो तसा केलेला दिसत नाही. डॉ. ढेरे म्हणतात–[४]

(१) " ज्या काळात चक्रधरांनी रामदेवाला भेटून त्याला स्थित्यानंद दिला, तो चक्रधर चरित्रातील एकांक काळ अत्यंत रहस्यमय आणि भूतकाळाच्या तमोमय गर्भात दडी मारून बसलेला आहे. त्याकाळात चक्रधर स्वामी बालोन्मतपिशाच्चवत अवस्थेत एकाकी भ्रमण करीत होते. एकांकी काळाच्या समाप्तीनंतर शिष्यांनी जिज्ञासेने विचारलेल्या काही प्रश्नांना चक्रधरांनी जी उत्तरे दिली, त्यावरून त्यांच्या पूर्वजीवनातील काही घटना ज्ञात झाल्या आहेत. अर्थात चक्रधरचरित्रातील हा काळ रहस्यमय असून त्या काळातील घटना एकटे चक्रधरच जाणोत. त्यांनी शिष्यांच्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरातून ज्ञात होणारे एकांककालीन अपुरे व संदिग्ध वृत्त किती विश्वसनीय आहे, हे ताडून पहाण्यास आज काहीच साधन उपलब्ध नाही ' तेथेच ते लिहितात.

(२) " शके ११८९ च्या ज्येष्ठांत चक्रधरांनी आंबजय येथे रामदेवाशी प्रथम भेट झाली. ही घटना चक्रधरांच्या एकांक काळात घडली. शके ११८९ च्या आश्विनात चक्रधरांनी पैठण येथे नागांबिकेला प्रेमदान केले व आपल्या चरित्रातील एकांककाळ संपविला " पुढेही ते म्हणतात[५]–

(३ ' आंबजय येथे चक्रधर आणि रामदेव यांची प्रथम भेट झाली ती शके ११८९ च्या ज्येष्ठ व षष्ठीच्या दिवशी. त्यानंतर रामदेव चक्रधरभेटीस वारंवार जात असे आपल्या गुरुदेवांच्या दार्शनिक मतपरिवर्तनामुळे त्याचा मानसिक संघर्ष वाढत गेला. त्याची गुरुनिष्ठा शबलीत होऊ

लागली. पुढे चक्रधरांचा पट्टशिष्य बनलेला नागदेव आणि त्याचा परिवार प्रथम रामदेवाच्याच पारमार्थिक आश्रयाखाली होता. नागदेवादी आपल्या शिष्यांनी चक्रधरांना अनुसरू नये असे त्याला वाटे."

उपरोक्त तीन उताऱ्यांपैकी २ व ३ वरून स्पष्ट दिसते की रामदेव दादोसची पहिली भेट शके ११८९ ज्येष्ठ महिन्यात झाली व स्वामींचा एकांक काळ आश्विन महिन्यात संपला. तेव्हापासून ढेरे यांच्या मताप्रमाणे स्वामींचे मतपरिवर्तन झाले. हा एकांक काळ फक्त पांच महिन्यांचा होता. तो पण लीळाचरित्रात क्रमबद्ध आहे हेही स्पष्ट आहे त्यात अज्ञान नाही, मग ढेरे यांच्या पहिल्या उताऱ्यातील रामदेवाच्या भेटीचा तो चक्रधर चरित्रातील एकांक काळ अत्यंत रहस्यमय आणि भूतकाळाच्या तमोमय गर्भात दडी मारून बसलेला कसा? त्या काळात चक्रधरस्वामींचे बालोन्मत्त पिशाच्चवत वर्तन कसे? हे डॉ. ढेरे यांचे परस्पर विसंगत लिखाण नाहीं काय?

या तिसऱ्या उताऱ्यात नागदेव व त्यांच्या परिवाराने श्रीचक्रधरांना अनुसरू नये असे रामदेवाला वाटे. खरेतर नागदेवादींना रामदेवानेच व्यसनातून मुक्त करून परमार्थाला लावले हा काळ एकांकातील आहे काय? पण तसे म्हणता येत नाही.कारण नागदेवादींना रामदेव सिन्नरला (श्रीनगर) घेऊन आले त्यावेळी डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे स्वामींचे मतपरिवर्तन झाले होते हे ढेरे यांना मान्य आहे ना? ही रामदेव नागदेवादी भेट शके ११८९ नंतरची आहे. जर रामदेव दादोस मुकुंदराजासारख्यांना शिष्य करण्यासारखे अद्वैत तत्त्वज्ञानाचे जाणते होते व गुरूचे मतपरिवर्तन झाले हे पण त्यांना माहित झाले होते मग नागदेवांना अद्वैत तत्त्वज्ञानाचे निरुपण का केले नाही? नागदेवाने ज्याप्रमाणें स्वामींच्या तत्त्वज्ञाचा प्रसार केला तसा रामदेवाने वेदांताचा प्रचार का केला नाही? हा विचार डॉ. ढेरे यांनी मुद्दामच टाळला आहे. ढेरे यांचा हा प्रयत्न स्वामींना शैवनाथ असे ठरविण्याच्या अट्टाहासातून निर्माण झाला आहे. यासाठी लीळाचरित्रासारख्या ग्रंथाना अविश्वसनीय मानून उत्तरकालीन काही ग्रंथ स्वामींना शैव ठरविण्यात उपयोगी ठरतात. म्हणून त्यांना मान्यता दिली आहे. उत्तर-

कालीन ग्रंथ स्वामींना शैव ठरविण्याच्या विरुद्ध गेले असते तर ज्याप्र-माणे डॉ. भाऊसाहेब कोलते यांनी मुरारी यक्षदेवाच्या भानुविजयाचे व काही ग्रंथातील शक निर्देशक ओव्यांचे धज्जे उडवले तसे डॉ. ढेरे यांनी धज्जे उडवले असते.

रामदेव दादोस डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे मुकुंदराजासारख्या अद्वैत वाद्याचे गुरु होते तर रामदेवाच्या अंतकाळी त्यांची दुरवस्था का व्हावी ? मुकुंदराजाने किंवा त्यांच्या कोणाही शिष्याने त्याच्याजवळ का असू नये ? तसेच स्वामींनी महानुभाव पंथाच्या स्थापनेला सुरुवात केल्यावर जेव्हा नागदेवाचार्य स्वामींना अनुसरतात असे वाटले तेव्हा रामदेव त्यांना कामखेड्याला घेऊन गेले.त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला. त्याची आई आबाईसा यांनाही सांगून पाहिले. स्वामींनीही नागदेवांना जवळ ठेवू नये म्हणून त्याविषयी त्यांना पुष्कळ सांगितले, त्याच्या पत्नीलाही भडकावून पाठविले, तिने पुष्कळ आक्रोश केला. आपली खानपानाची दुर्दशा दाखविली. स्वामीनी त्यांना घरी पाठवून आपले लहान भाऊ वैजोबा यांच्याकडून सर्व संपत्तीत वाटणी घ्यायला लावली. इतके बिनसल्यावरही स्वामींच्या भेटीला ते येतच राहिले तर मुकुंदराजानेही स्वामींच्या भेटीला का येऊ नये?

## रामदेव म्हणजे रघुनाथ नव्हे

रामदेव–रघुनाथ ऐक्यासंबंधी डॉ. ढेरे यांनी महानुभाव वाङ्मया-शिवाय जो पुरावा दिला आहे तो असा[६] –

मुकुंदराजाच्या शिष्य परंपरेतील ज्योतिनाथ यांचे अशुद्ध श्लोक उद्धृत केले आहेत. ते असे–

तथा श्री हरिनाथेन प्रणिपत्य महेश्वरे ।
बोधितोनंत शिष्याय त्रीणि मुख्य भक्तेदा ।। ४ ।।
रामचंद्रस्य शिष्यस्य नागदेवस्य धीमत्ता
विश्वभरश्च नाथश्च त्रीणि शिस्यो हरिः सम ।। ४ ।।

तसेच प्रकाशानंदनाथाचा प्रशिष्य व्यंकट यांचा ' पंच पंथानुभव ' या ग्रंथातील उल्लेख असा [७]

हरिनाथाचे कृपावेश । प्रसिद्ध झाले तिघे शिष्य ।
रामचंद्र आणि नागेश । विश्वंभर तीसरा ।। २५०८ ।।

या दोन्ही ठिकाणी रामचंद्र, नागेश किंवा नागदेव आणि तिसरा विश्वंभर असे तीन प्रमुख शिष्य मानले आहेत. ज्याचेमुळे रामचंद्रांला रामदेव आणि नागेशाला नागदेव मानावयाचे आणि त्या आधारे श्रीचक्रधर स्वामींना हरिनाथ मानावयाचे तर तिसरा प्रसिद्ध शिष्य विश्वंभर लीळाचरित्रात मुळीच येत नाही. तसेच ' पंचपंचानुभव ' यात येणारे नागेश नांवही नागदेवाचे महानुभाव वाङ्मयात कोठे येत नाही. मग रघुनाथ, नागेश व विश्वंभर हे तीन हरिनाथाचे निराळेच शिष्य मानून हरिनाथ आणि श्रीचक्रधरस्वामी या दोन्ही व्यक्ती भिन्न भिन्न का मानू नयेत ?

श्रीचक्रधर स्वामींचे एकांककाळातील काहीसे अस्पष्ट आणि उत्तर-कालीन आठ वर्षाचे चरित्र तर अगदी स्पष्ट आहे. त्यात थोडया फरकाचे काही निरनिराळे पाठ असले तरी वाइंदेशकर अगर तळेगावकर पाठातून सुद्धा विश्वंभर नावाचा श्रीचक्रधर स्वामींचा कोणी प्रमुख शिष्य होता. असे डॉ. ढेरे यानी का दाखवून दिले नाही ? हरिनाथाचे संपूर्ण चरित्र आढळतच नाही. मुकुंदराजाने आपल्या परम गुरुविषयी हरिनाथाबद्दल जी अल्पशी माहिती दिली आहे तेवढीच काय ती उपलब्ध आहे. मुकुंदराजांनी विवेकसिंधूच्या' अखेरच्या प्रकरणात गुरुगौरवासाठी पुढील फक्त आठ ओव्या लिहिल्याआहेत. [८]–

सुरेंद्रभारती मुख्य । हरियेप्रबोधिले कीर शिष्य ।
परि कृपा असंख्य । स्फुरली रामचंद्री ।। १०२ ।।
कृपादृष्टीसरिसी । अवर्तली रामासीं
उमसु घेवोनेदी मानसी । ब्रह्मानंदु तो ।। १०३ ।।

अठरा दीन परियंता । जाळी उन्मनी अवस्था
मनोवृत्ती समस्ता । खुंटलिया ।। १०४ ।।

मग समाधी विसर्जली । तुरयावस्था प्रकटली ।
जियेचेनि सकळ शृष्टी देखिलीं । शिवात्मक हे ।। १०५ ।।

वर्णाश्रमाचा पांगु । न करी रामु नि:संगु
अखंड फळला राजयोगु । म्हणोनिया ।। १०६ ।।

सत्कामाचिया अकरणी । प्रत्यवावो गेला जळोनि
पापवासना रामामनीं । आथीचि ना ।। १०७ ।।

रामु गुणाचा सागरु । महीमेचा मेरु
ब्रम्हविद्या देता उदारु । तोचि एकु ।। १०८ ।।

अनेक शिष्य प्रबोधिले । ब्रम्हसुखी आनंदवीले
ब्रम्हविद्येचे तारु घातीले । सकलां जनांसी ।। ११२ ।।

उपरोक्त ओव्यातील पहिल्या एकशेदोनव्या ओवीत मुकुंदराजाने सुरेंद्रभारती आदि शिष्यांचा उल्लेख केला आहे. पण सुरेंद्रभारती नांवाचा प्रमुख शिष्य लीळाचरित्रात कोठेच आढळत नाही. तसेच श्री चक्रधर स्वामींचा परमकृपाप्रसाद रामदेवावर नसून नागदेवावर होता हे ' लीळाचरित्रा 'वरूनच स्पष्ट होते. एकशेचार या ओवीत रामदेवाला अठरा दिवसांची उन्मनी अवस्था प्राप्त झाली होती असे म्हटले आहे. पण रामदेवाला पहिल्या भेटीत तासाभरापेक्षा अधिक स्थित्यानंद प्राप्त झाला नाही. आंबजय व वटेश्वर मिळून पहिल्या भेटींचा काळच मुळी तीन दिवसांचा आहे. हे लीळाचरित्राद्वारे यापूर्वी दर्शविले आहेच. त्यानंतरच्या दोन भेटीही एकेक दिवसाच्या आहेत. डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे स्वामींनी नवमतप्रवर्तन करण्यापूर्वी तीनही भेटी मिळून पाच-सहा दिवसापेक्षा अधिक काळ नाही. चौथी भेट तर नवमतप्रवर्तनापूर्वी स्वामींनी रामदेवांना मुळीच दिली नाही. मग रामदेवाचे आणि रघुनाथाचे ऐक्य स्वीकार-

ण्यासाठी या अठरा दिवसाच्या उन्मनी अवस्थेचा रघुनाथाचा संबंध राम-देवाशी कसा जोडायचा व त्याला पाचसहा दिवसांत अद्वैत वेदान्त ज्ञान झाले हे तरी मानावयाचे कसे ?

ओवीं ११२ मध्ये रघुनाथाने ब्रम्हविद्येचे तारू घातले असे म्हटले आहे.त्याचा संबंध रामदेवाशी जोडावयाचा कसा? रामदेवाने जर ब्रह्मविद्येचे तारु घातले असे मानावयाचे तर रामदेवाने नागदेव आदींना श्रीचक्रधर स्वामींकडे कां आणले असते ? त्यांनी वेदान्ताचा उपदेश स्वतःच केला नसता काय ?

पृष्ठ २५६ वर डॉ. ढेरे स्वामींच्या हरिनाथ नावाविषयी लिहितात की, "चक्रधरांचे मूळ नांव हरिपाळ असे होते. नाथपंथात मूळ नावाच्या आधारे ही पंथीय नावाची सिद्धी होत असे. हे महाराष्ट्रीय नाथपंथीयांची चरित्रे पाहिली म्हणजे ध्यानात येईल. ज्ञानदेवांचे ज्ञाननाथ हे पंथीय नाव मूळ नावावरूनच साधलेले आहे. हरिपाल म्हणजे हरिनाथ आणि हरिपा-लाचा-चक्रधराचा-महानुभाव पंथाच्या प्रवर्तनापूर्वीचा म्हणजे नाथपंथातील शिष्य रामदेव म्हणजे रघुनाथ " याठिकाणीं डॉ. ढेरे यांनी भडोचचे प्रधान विशालदेव यांचे पुत्र हरिपालदेव तेच श्रीचक्रधरस्वामी असे स्वीकारून त्यांचा शिष्य रघुनाथ व त्याचाच शिष्य विवेकसिंधूकार मुकुंदराज, हे तर अगदी स्पष्ट मान्य केले आहे. पुढे पृष्ठ २६९ वर डॉ. ढेरे काय गडबड कर-तात तेही पाहण्यासारखे आहे–

आदिगुरु श्री आदिनाथु । तेथोनि श्रीहरिनाथु
तेयाचा शिष्य श्री रघुनाथु । जो गुणसिंधु ।। १८.३४ ।।

आदिनाथ – हरिनाथ – रघुनाथ – मुकुंदराज अशी मुकुंदराजाची स्वकथित परंपरा आहे. यातील आदिगुरु आदिनाथ म्हणजे प्रत्यक्ष शिव-देवता असल्यामुळे आपणास हरिनाथ व रघुनाथ या दोनच व्यक्तींचा ऐति-हासिक विचार कर्तव्य ठरतो. पैकीं हरिनाथाविषयी मुकंदराज म्हणतात–
( चक्रपाणि पृ. २६९ )

जीवाचिये अंतःकरण । जाले कलीमळीन
म्हणौनि लोपले ज्ञान । स्वस्वरुपाचे ।। ३६ ।।
तेव्हळी कृपाळुवांचा राणा । जीवासी करावेया सोडवण
अवतरला आपण । श्रीवैकुंठ नाथु ।। ३७ ।।
वैन्या गंगेचिए तीरीं । मनोहर अंबानगरी
तेथ प्रकटले श्रीहरी । जगदीश्वरु ।। ३८ ।।
मध्यंदिनी शाखे । अवतारु केला परमपुरुषे
चापेगोरेटेनि वेखें । मनोहरे ।। ३९ ।।
वर्ते मनुष्यवेखें । तेंया कव्हणी नोळखे
प्रत्यक्ष निधानातें न देखे । हतदैवु जैसा ।। ४० ।।
श्रीवछपद लपविले । ते दक्षिणजंघे दाविले
कलियुगी अवतरण केले म्हणौनिया ।। ४१ ।।
जेयाचिये नामसंकीर्तन । करी भवासी निकृंतन
तेयासी मेखला बंधन । पिता करीता जाला ।।४२।।
वेदशास्त्राचा अभ्यासु । त्याकरिता न लगेचि आयासु
जो चतुर्विध वाचेचा ईक्षु । तेथ विस्मयो काइसा ।।४३।।
श्रीहरी येण्हे नावे विख्यातु । अवतरला श्री अनंतु
तेथेचि महिमा अद्‌भूतु । भविष्योत्तर पुराणी ।। ४४ ।।

मुकुंदराजाच्या विवेकसिंधूतील वरील ओव्यावरून हरिनाथ हे विष्णूचे अवतार होते. त्यांचा वैनगंगेतीरी अंबानगरीत अवतार झाला. ते माध्यंदिन शाखेचे होते. वडिलांनी त्यांचे मौजीबंधन केले व त्यांनी थोड्याच दिवसात विनाकष्ट वेदाध्ययन केले. हे सर्व वर्णन श्रीचक्रधरांशी जुळत नाही.

पुढे पृ. २७८ वर डॉ. ढेरे लिहितात– "हरिनाथ–चक्रधर एक-

त्वाच्या दृष्टीने या हरिनाथाचे चरित्रविषयक विशेषगोष्टींचा विचार आपणास कर्तव्य आहे. या सर्व गोष्टीकडे एकदम दृष्टिक्षेप टाकताक्षणीच आपणास हे सहजपणे जाणवू लागते की, यागोष्टी चक्रधराऐवजी चांगदेव राऊळांना अधिक लागू पडतात पुढे पृ. २८४ वर ते म्हणतात की, 'चक्रधरस्वामी मूळचे गुजराती असून ते गुजरातेतून महाराष्ट्रांत आले ही एक कल्पित कथा (Myth) आहे अशी जी काही अभ्यासकांची साधार धारणा आहे, तिचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. चांगदेव राऊळ आणि चक्रधर स्वामी हे केवळ आत्मतःच नव्हे तर देहतः ही एकच होते काय, या दृष्टीनेही विचार करायला ही धारणा आपणास प्रवृत्त करते, साधनांच्या आजच्या स्थितीत मात्र याविषयी निर्णयकरीत्या काही सांगता येत नाही. "

डॉ. ढेरे यांचे परममित्र प्रा. कुरुंदकर यांनी तर चक्रधर स्वामींचे व चांगदेव राऊळांचे एकत्त्व निश्चितपणे कल्पिले आहे. ते म्हणतात "चक्रधरांनीही वयस्तंभिनी विद्येचा स्वीकार केला आहे. वयस्तंभिनी एक समजूत मानून आपण पढे गेले पाहिजे आणि आपण असे म्हटले पाहिजे कीं, श्रीचक्रधर आयुष्याच्या शेवटापर्यन्त अगदी तरुण दिसत होते. तेव्हा त्यांचे वय ५५ ते ६० च्या सुमाराचे असावे. याहून अधिक वृद्ध ते असणार नाहीत. महानुभाव पंथाचा त्यांनी केलेला उपदेश हा शेवटच्या आठ वर्षातील आहे. तेव्हा हा उपदेश प्रवर्तित करतांना त्यांचे वय पंचेचाळीशी ओलांडून गेलेले असेल अगर नसेल. ह्या वेळेपर्यंतचा काळ चांगदेव राऊळांचा होता. तेव्हा त्यांचा गृहत्याग विशीपंचविशीतला, काही वर्षे परिभ्रमण काही वर्षे श्रीपर्वत आणि काही वर्षे द्वारावती असा मधला पंधरा-सोळा वर्षांचा काळ गेलेला दिसतो. "

याप्रमाणे चांगदेव राऊळाशी हरिनाथाचे ऐक्य मानले तर चांगदेव राऊळ (चक्रधर) व श्रीगुंडम राऊळ यांचा गुरु-शिष्य संबंध कसा मानावयाचा ? द्वारकेला गुंडम राऊळाने चांगदेव राऊळाना गुरु मानले. त्याच चांगदेव राऊळाने ऋद्धपुरला गुंडम राऊळाचे शिष्यत्व स्वीकारले, हा विरोध येणार नाही काय ? पण अशा सत्य संशोधकांना अशी अडचण

कोठून निर्माण होणार ? ते गुरुशिष्य संबंध म्हणजे केवळ महानुभावांचा समज असे मानून मोकळे होतील. जे सत्यसंशोधक रामदेवांना रघुनाथ ठरविण्यासाठी स्वामींच्या पाचसहा दिवसांच्या भेटीतच मुकुंदराजासारख्यांचा गुरू ठरविण्याइतपत अद्वैत तत्त्वज्ञानाचा पंडित करू शकतात. त्यांना अशा अडचणीची गरज कोठून भासणार ?

तसेच श्रीचक्रधरस्वामींचे हरिनाथ नाव जुळविण्यासाठी स्वामींना गुजराथचे हरिपाळ स्वीकारावयाचे व हरिनाथाची माध्यंदिन शाखा, मुंज व अल्पकाळात वेदाध्ययन इत्यादि मुंकुंदराजाने वर्णिलेले चरित्र विशेष जुळत नाही म्हणून गुजराथचे हरिपाळदेव ही कल्पना मानून श्रीचांगदेव राऊळांकडे धाव घ्यावयाची ही या बोटावरची थुंकी त्या बोटावर लावण्यासारखी चलाखी नाही काय ? गुजराथचे हरिपाळदेव व चक्रधरस्वामी हे एक किंवा श्रीचांगदेव राऊळ व श्रीचक्रधर स्वामी हे एक ! दोहोपैकी एकच स्वीकारावयास हवे. निष्कारण कोलांट उड्या मारू नयेत.

श्री चांगदेव राऊळांना हरिनाथ ठरविले तरी ते २७४ पृष्ठावर विवेकसिंधूतील दिलेल्या ओव्यात हरिनाथाने केलेल्या होमाची पूर्णाहूती, त्यात शिवाचे प्रकट होणे, हरिनाथाला अलिंगन देणे, ऋत्विजांचे पळून जाणे, बेशुद्ध होणे अशा अनेक गोष्टी वर्णिल्या आहेत. याबाबी चांगदेव राऊळाशी तरी संबंध ठेवतात काय ? ज्यांना पूर्वकालीन ग्रंथांचे प्रामाण्य मानावयाचे नाही, हेतूतः ऐतिहासिक तथ्ये दुर्लक्षिली असे मानावयाचे आणि उत्तरकालीन ग्रंथांचे प्रामाण्य स्वीकारावयाचे त्यांना कोणतीच अडचण भासणार नाही. पुढे आणखी ढेरे म्हणतात [१०] "नागदेवाच्या परंपरेत त्यांचे चरित्र 'चक्रधर' या नावाने गाजत राहिले, तर पहिल्या रघुनाथाच्या वेदान्ती परंपरेत त्यांचे चरित्र 'हरिनाथ' या नावाने वर्णिले गेले. 'हरिनाथ' या नांवाने चक्रधरांच्याच चरित्राचा तपशील जर आपल्या अनुयायांपुढे आला, तर त्यांचा बुद्धिभेद होईल, अशा भीतीमुळे रघुनाथाच्या परंपरेत हरिनाथाच्या पूर्वावताराचे चांगदेव राऊळांचे चरित्र स्वीकारले गेले. या कृतीमुळे गुरूनिष्ठेचे रक्षण झाले आणि बुद्धिभेदाचे भयही संपले"

जर बुद्धिभेद टाळण्यासाठी आपल्या गुरूचे म्हणजे हरिनाथाचे म्हणजेच श्रीचक्रधरांचे चरित्र न सांगता श्री चांगदेव राऊळाचे चरित्र सांगितले तेच त्यांनी–मुकुंदराजांनी विवेकसिंधूमधून वर्णन केले तर तोच बुद्धिभेद टाळण्यासाठी रामदेवाने श्रीचक्रधर स्वामींच्या भेटीला तरी पुन्हा पुन्हा का यावे ? त्या योगाने मुकुंदराजाचा बुद्धिभेद होण्याचा संभव नव्हता काय ? उलट पुन्हा पुन्हा स्वामींच्या भेटीला येण्याने बुद्धिभेद होण्याचा अधिक संभव होता पण त्यांनी ते वर्ज्य केले नाही. त्यांचा आणि स्वामींचा संबंध शेवटचे तीन–चार महिने सोडून सतत सारखा राहिला आहे. संपूर्ण पूर्वार्धाच्या व उत्तरार्धाच्या चारशेवीस लीळापर्यन्त हा संबंध आहे. हा सर्व विचार केला म्हणजे रामदेवाचे व रघुनाथाचे तसेच चक्रधरांचे व हरिनाथांचे ऐक्य ही बाब कपोलकल्पित बनावट आणि केवळ 'मनसा चिंतीत' आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

डॉ. ढेरे यानी श्रीचांगदेव राऊळ, श्रीगुंडम राऊळ यांना पाशुपत–शैव–नाथ ठविण्याचा व हरिनाथ श्री चक्रधरस्वामी व रामदेव–रघुनाथ यांचे ऐक्य कल्पून श्रीचक्रधरस्वामींना शिवोपासक ठरविण्याचा प्रयत्न केला आहे या विषयी लीळाचरित्रात व आद्यग्रंथकारांच्या ग्रंथात आधार सापडला नाही. म्हणून उत्तरकालीन ग्रंथकारांना हेतुतः ऐतिहासिक तथ्याचे जतन करणारे मानले आहे. त्यापैकी मुरारी यक्षदेव हे तर १९४६-४७ साली निवर्तले. त्यांची आरतीही डॉ. ढेरे प्रमाणभूत मानतात. [११]

आरती आदिनाथा । महाराजा अवधूता
दुजिया हरिनाथा । परकैवल्य अनंता ॥१॥
हिंडता वैनतीरी । अंबावतीए मुरारी
भेटला रामनाथा । दाना केले मा वेदान्ता ॥२॥
राघवे मुकुंदेसी । तोचि मार्गु निरोपीला
मुकुंदे जैतुपाळा । केला ज्ञानाचा सोहोळा ॥३॥
हरीन्द्रे शिष्य केले । मुख्य छपन्न गणिले
वडीलु रामनाथु । धारा नागोबा महंतु ॥४॥

वेदांता या सिद्धान्ता । दोन्ही मार्ग निरोपिता
राघोबा पै वेदान्तु । नागो भटासी सिद्धान्तु ।।५।।

ही आरती डॉ. रा. चिं. ढेरे यांनी ज्या डॉ. य. खु. देशपांडे यांचा उल्लेख करून उद्धृत केली आहे ती आरती डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास या ग्रंथात खालील प्रमाणे मुद्रित केलेली आहे.[१२] ती अशी–

आरती आदिनाथा । महाराज अवधूता । दुजिया हरिनाथा ।
पर कैवल्य अनंता । आरती ।।
हिंडता वैनतीरी । अंबावती ए मुरारी । भेटला रामनाथा ।
दाना केले मा वेदान्ता ।। आरती ।।
राघवे मुकुंदेसी । तोचि मार्गु निरोपीला । मुकुंदे जैतुपाळा ।
केला ज्ञानाचा सोहळा ।। आरती ।।
मुकुंदापासोनोया । तेची निवृत्तीसी आले । निवृत्तीं निरोपीले ।
ज्ञानोबासि या वहिले ।। आरती ।।
हरिंद्रे शिष्य केले । मुख्य छपन्न गणिले । वडील रामनाथु ।
धारा नागोबा महन्तु । आरती ।।
वेदान्ता या सिद्धान्ता । दोन्ही मार्गा निरोपीता । राघोबा
पै वेदान्तु ।
नागोभट्टासीं सिद्धांतु ।। आरती ।।
विनवी यक्षदेवो। जाखो निवृत्तीं मुरारी । चुकवी जन्मवारी ।
तुची भक्तांचा कैवारी ।। आरती ।।

यामुळातील आरतीतील काहीभाग वगळून डॉ. ढेरे यांनी केलेली चलाखी पहाण्यासारखी आहे.

'मुकुंदे जैतपाळा । केला ज्ञानाचा सोहाळा' येथे आरतीचे कडवे संपते त्यानंतर लगेचच मूळच्या आरतीत आणखी एक कडवे आहे.

मुकुंदा पासोनिया । तेचि निवृत्तीसी आले
निवृत्ती निरोपिले । ज्ञानदेवासी वहिले ॥३॥

हे कडवे डॉ. ढेरे यांनी जाणीवपूर्वक गाळले आहे. त्याचे कारण, जर ते कडवे मानले तर,

रामदेव – मुकुंदराज – निवृत्तीनाथ – ज्ञानदेव याप्रमाणे परंपरा ठरवून ज्ञानदेव श्रीचक्रधर स्वामींच्या परंपरेत येतात. त्यामुळे समस्त वारकरी संप्रदायाचा रोष ओढवून घेण्याची फार मोठी भीती डॉ. ढेरे यांना वाटली असावी. महानुभाव संप्रदायालाही ती परंपरा मान्य नाहीच. पण त्याबरोबरच असणारी श्रीचक्रधर–रामदेव–मुकुंदराज ही परंपराही मान्य नाही.

सारांश,

हरिनाथ–(चक्रधर)– रघुनाथ (रामदेव) यांचे ऐक्य बनावट आहे हे पुन्हा आणखी स्पष्ट होते पुढे याच पानावर डॉ. ढेरे ही आरती यक्षदेव अथवा निवृत्तीदेव यांनी रचली आहे असे म्हणतात.

'विनवी यक्षदेवो । जाखो निवृत्ती मुरारी'
अशी कविनाम मुद्रा या आरतीच्या शेवटी स्पष्टपणे नोंदविली आहे. हे यक्षदेव नागदेवाचार्यांचे शिष्य होत. 'जाखदेव ते श्रीनागदेवाचार्यांचे शिष्य, असे इतिहास प्रकरणात आहे.

यक्षदेव आम्नाय हा महानुभाव संप्रदायाच्या तेरा आम्नायापैकी एक आम्नाय असून त्याचे प्रेरणास्थान हे यक्षदेवच होत. त्यांनी परंपरेच्या आरतीप्रमाणेच आपले गुरु नागदेवाचार्य यांचीही एक आरती रचली आहे. या गुरुच्या आरतीत त्यानी गुरुचे धावते चरित्र सांगताना एका कडव्यात म्हटले आहे–

कव्हणे एकी दिनी । रामनाथा नागदेवा
सिद्धनाथी भेटी जाली । स्थिती राघवे दिन्हली

सामर्थ्य देखोनिया । जीवीं विरक्ती बाणली
राघवे हरिनाथा । मग निरोवन केली

ही आरती पण त्याच यक्षदेव मुरारीची आहे. मूळ यक्षदेव श्रीनागदेवाचार्यांचे शिष्य असले, एका आम्नायाचे प्रवर्तक असले तरी महानुभाव पंथात मूळ पुरुषाच्या नांवाने, परंपरेने पुढील महंताचे तेच नाव चालू राहते. ज्याप्रमाणे आद्य शंकराचार्यांचे चार प्रमुख शिष्य झाले ते चारी पीठाधीश शंकराचार्यच म्हणवितात. त्यापैकी कोणी आधुनिक पीठाधीश शंकराचार्याने जर ग्रंथरचना केली तर ती आद्य शंकराचार्यांची रचना म्हणता येणार नाही. त्याच प्रमाणे या आरत्याही मूळ पुरुष यक्षदेवांची कृती नाही. या आरतीत आपले मुरारी हे नांव १९४६–४७ साली निवर्तलेल्या यक्षदेव महंतांनी घातले आहे.

हरिनाथ व श्रीचक्रधर स्वामी यांच्या ऐक्यासाठी कृष्णमुनि कविडिंभ यांच्या आरतीचाही एक पुरावा दिला आहे. त्याचा विचार उत्तर कालीन ग्रंथकार या प्रकरणात केला जाईल तसेच महंत श्रीगोविंदराज दयाळराज यांच्या 'ज्ञानसिंद्दा' तील लेखाचा पुरावा दिला आहे तो असा–

'... मुकुंदराजांचे परमगुरु भगवान श्रीचक्रधर असले पाहिजेत. तसे असल्याशिवाय महानुभाव लेखक व कवी त्यांना नमन वगैरे कधीच न करते. दुसरे असे की, मुकुंदराजाविषयी महानुभाव पंथात जितकी माहिती सापडते, तितकी माहिती अन्य कोणत्याही समाजात अगर इतरत्र सापडणे शक्य नाही. मुकुन्दराजांचा महानुभाव समाजाशी काही तरी आप्तसंबंध असल्याशिवाय वृद्धाचारात, आम्नायात (त्यांचा) नामनिर्देश करणे अथवा त्यांना नमस्कारादी करणे केव्हाही शक्य नाही. महानुभाव पंथाच्या ग्रंथात मुकुंदराज हा रामचंद्र (रामदेव–रघुनाथ) या एकाच व्यक्तीचा शिष्य होता. रामचंद्र भगवान श्रीचक्रधरांचा ( हरिनाथांचा ) आद्य शिष्य होता. हरिनाथ हे आदिनाथ ( श्री दत्तात्रेय ) यांचे शिष्य होते, असे लीळाचरित्रावरुन, वृद्धाचारावरुन अगर अन्वयसारावरुन स्पष्ट होते."

महन्त गोविंदराज यांनीं अनुमानिलेला हा संबंध महानुभाव पंथात परंपरागत मान्य झालेला दिसतो. उपरिनिर्दिष्ट महानुभावीय ग्रंथातील उल्लेखाशिवाय म. हरिराज करसालकर यांच्या संग्रहातील परंपरा-वृक्षात मुकुंदराजांचा नामनिर्देश 'श्रीचक्रधर स्वामी– रामदेवराव वडणेरकर (दादोसी)– मुकुंदराज' या क्रमाने केलेला आहे." असाच परंपरा–वृक्ष महन्त गोविंदराज यांनाही पाहावयास मिळाला होता. या परंपरेच्या नोंदीचा अर्थ हाच की, चक्रधर म्हणजे हरिनाथ आणि रामदेव दादोस म्हणजे रघुनाथ.

कै. श्री. वा. ना. देशपांडे यांनी संपादिलेल्या स्मृतिस्थळात मूळ पोथी प्रमाणे स्वामींचा त्रिविध परिवार दाखविला आहे- १) दर्शनीये ( ज्यांना स्वामींचे दर्शन झाले ते) २) अनुसरले (सर्वसंग परित्याग करून ज्यांनी संन्यास स्वीकारला ते ) ३) बोधवंत ( ज्यांना शक्तीरूप ज्ञानसंचार-झाला ते ) चवथा वेधवंत संभवतो. म्हणजे ज्यांना स्वामींविषयी किंवा स्वामींच्या विषयी श्रद्धा आहे तो. पंथीयदृष्टया हेच चार नमस्कार करण्यायोग्य आहेत यापैकी मुकुंदराज एकातही बसू शकत नाही. मग श्रीचक्रधर स्वामी त्यांचे परमगुरु मानले तरी ते नमस्कार करण्यायोग्य कसे ठरतील ? तसे मानले तर, श्रीचांगदेव राऊळांच्या सर्व विद्यावंतांचे शिष्य-प्रशिष्य सर्वच नमस्कार करण्यायोग्य ठरतील. कै. महन्त श्रीगोविंदराज दयाळराज हे पण हरिनाथ व श्रीचक्रधरस्वामी यांना एक ठरवून श्रीज्ञानेश्वरांना स्वामींच्या शिष्य-परंपरेत आणावे या मताचे आहेत म्हणून ती नमस्काराची युक्ती देतात. पण ती फोल आहे.

पुढे डॉ. ढेरे यांनी कै. महन्त श्री गोपीराज हरिराज करसालकर यांच्या संग्रहातील परंपरा–वृक्षाचा उल्लेख केला आहे. पण जो पर्यंत हा परंपरा–वृक्ष जुना दर्शनप्रकाशकार मुरारीच्या पूर्वीचा आढळत नाही तो पर्यंत तो मान्य करता येत नाही. दर्शनप्रकाशकार मुरारीपासूनच ही गडबड झाली आहे. या गडबडीविषयी पूर्ण विचार ' उत्तरकालीन ग्रंथकार ' या प्रकरणात केला जाईल.

गोविंदराज दयाळराज यांनी आपल्या लेखात महंत श्री मुरारी यक्षदेवबुवा महानुभाव यांच्या संग्रहातील एका ग्रंथातील 'वेदान्तमार्ग-सिद्धांतमार्ग परंपरा कथन, या मथळयाखाली काही भाग दिला आहे तो असा–

"...... भगवान श्री चक्रधरे भार्गवक्षेत्रास हरिपाळाचे पुर (देह) उठविले तेथुन वैदर्भी प्रयाण केले: तेथ अंबजये वेणूतरी रामचंद्रासी दर्शन जाले : मग रामदेवासी हरिनाथे (श्रीचक्रधरे) स्थिति प्रगटली : ते अठरा दिवस भोगिली : तद्नंतर उन्मनी प्रगटली. मग समाधी विसर्जली : तुर्या प्रगटली. मग रामचंद्रासी सिद्धी जाली : मग रामचंद्रे विनविले, ' जी : जी वेदान्ता शास्त्र निरुपावे जी. ' सर्वज्ञ ब्रम्हविद्या निरपू आदरली : रामचंद्रे म्हणीतले 'जी : जी आपली ब्रह्मविद्या रायारानाकी : जी मजवर वेदांतच निरोपावे': मग हरिनाथे ( चक्रधरे) रघुनाथाप्रती (रामचंद्र) वेदान्तशास्त्राचे रहस्य निरोपिले : ते रघुनाथे आपला शिष्य अथवा भाचा मुकुन्दराजास सांगोपांग निरोपिले : ते व्याख्यान मुकुंदराजे लिहिले : मग मुकुंदरायासी राजुररोहिणीखेडीचा राजा जैतुपाल तेणे प्रार्थीले, जे ' परोपकारार्थी हे वेदान्तरहस्य बाळबोध भाषेत बांधावे. ' मग मुकुंदराजे वेदान्तरहस्य ओवी व्याख्यान प्रकरण ओवीबद्ध ग्रंथ केला, तया नाव विवेकसिंधू ठेविले. तै पासुनी विवेकसिंधु प्रगटिला."

तसेच डॉ. ढेरे अन्वयसारातील उतारा देतात.[१३]– ' आपण श्रीहरिनाथे महासिद्ध पुरुषे रघुनाथ शिष्य केला : तो वडिल : तदनंतरे सुरेन्द्रनाथभारतीनाथ, नागार्जुन एवमादि छप्पन शिष्य केले : तयामाजी नागार्जुन भटासी आचार्यत्व देऊन महात्ममार्ग प्रकट केला.'

याप्रमाणे वरील दोन्ही आरत्या, वेदान्तमार्ग–सिद्धांतमार्ग परंपराकथन आणि अन्वयसार – विवेक सिधूतील काही माहिती घेऊन महंत श्री मुरारी यक्षदेव, महंत श्री दत्तलक्षराज व महंत श्री गोपीनाथ या तिघांनी काही भेसळ करून काही नवीन रचून हरिनाथ – रघुनाथ – मुकुंदराज – निवृत्तीनाथ – ज्ञानदेव अशी परंपरा ज्ञानेश्वरांना श्रीचक्रधरस्वामीच्या शिष्यपरंपरेत आणण्यासाठी रिकामी उठाठेव केली आहे. ती डॉ. ढेरे

यांना श्रीचक्रधर स्वामींना शैव ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते. म्हणून ढेरे यांनी हे सर्व उत्तरकालीन पुरावे खात्रीचे आहेत वा नाहीत याचा विचारही न करता सर्व मान्य करून आपल्या 'मनसा चिंतीत' शोधदिशेला आधारभूत म्हणून वापरले आहे.

लीळाचरित्राच्या कोणत्याच पाठात ज्याला आधार नाही ते मान्य करण्यासाठी 'रेंगाळत राहिले' पूर्वकालीन ग्रंथकारांनी हेतूतः दुर्लक्षिले.' 'उत्तरकालीन ग्रंथकारांनी हे ऐतिहासिक तथ्य जतन केले.' या मतलब सिद्धीसाठी योजलेल्या युक्त्या आहेत. श्रीचक्रधरस्वामींच्या एकांत काळातील लीळाचरित्राशिवाय दुसरा पुरावा संभवूच शकत नाही. म्हणून ते मान्य करता येत नाही अशा क्लृप्त्यामुळे खऱ्याखोटयांची ओळख करणे कठीण होऊन बसेल हे सूज्ञांनी लक्षात घ्यावयास हवे.

कै. महंत दत्तलक्षराज, कै. महंत मुरारी यक्षदेव व कै. महंत गोपीराज यांनी महानुभावीय वाङमय जनतेपुढे आणण्यासाठी जीवापाड प्रयत्न करून दुर्मिळ वाङ्मय जमवणे, त्याचे रक्षण करणे व संशोधक विचारवंताना ते उपलब्ध करून देणे यासंबंधी त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. त्यांचे ते ऋण मोठे आहेच. पण त्याबरोबर खाडाखोड करणे भेसळकरणे, जुन्याच्या नावावर नवीन रचना करणे इ. उलाढाली करण्यासही त्यांनी कमी केले नाही. म्हणून त्यांच्या संग्रहातील व त्यांनी संशोधकांना पुरविलेले लिखाण डोळसपणे तपासणे आवश्यक आहे. आपले मन्तव्य ज्यामुळे सिद्ध होते ते न तपासताच जसेच्या तसे स्वीकारून प्रमाणरूपाने मांडणे डॉ ढेरे यांच्यासारख्या संशोधकांना केव्हाही योग्य नाही. मुकुंदराजाचे नाव महानुभावीय वळणाचे आहे असे ढेरे म्हणतात.[१४] जसे गोपीराज, हरिराज, गोविंदराज, दयाळराज इत्यादी.

श्री. वा ना. देशपांडे यांच्या स्मृतिस्थळातील श्रीचक्रधरस्वामींचे श्रीनागदेवाचार्यांचे पारिमांडल्य आनोबासाचे व जानोपाध्याचे, कवीश्वर-भानुभट बोरीकरांचे शिष्य खालीलप्रमाणे आहेत.

श्रीचक्रधर स्वामींचे शिष्य–

भट : १ (नागदेव) : २, नाथोबा : ३, श्रीप्रभूचे लक्ष्मीधरबा : ४, कोथळोबा : ५, वैराग्यदेव : ६, भटाचाभाऊ महादेऊबा : ७, रामदेऊ : ८, चांगदेवभट : ९, जाणो उपाध्ये : १०, कान्होपाध्ये : ११।

श्रीनागदेवाचार्यांचे शिष्य–

बाईदेबास १: उपाधिबास २ : अमृते मायांबास ३ : केशोबास ४ : पंडितबास ५ : राजुरकर लक्ष्मींधरबास ६ : कविश्वरबास ७ : आनोबास ८ : राघवभट ९ : अनंत १० : आकाइचे रामदेव ११ : परसरामदेव १२ : डींडोरी गोंदोबा १३ : देवतासंबंधी महादेवबा १४ : विरक्त रूपदेवोबा १५ : विरुपाख्य महादेवोबा १६ : जनकांवासदेवभट १७ : वांकी विष्णुभट १८ : सेईगाव खेइभट १९: सेईगाव कृष्णभट २० : वाळुके राम देव २१ : नरेन्द्र बास २२ : विनायेक बास २३ : सोमण बास २४ : काळे कृष्णभट २५ : गोरे कृष्णभट २६ : सूचंच चांगदेवभट २७ : वासुदेवभट २८: वांकुडे हरिभट २९ : वांकुडे डाइंभट ३० : कटककार केशव नायेक कटक देमा (इ)चे संबंधीये : ३१ : पोकळे वाल्हनाइक ३२ : चक्रपाणिबास ३३ : धनेश्वरभट ३४ : लखुभट ३५ : जायभट ३६ : कान्होपाध्ये ३७ : येवंते रामदेव पंडित ३८ : गोरे राजोपाध्ये ३९ : भाऊ लखदेवोबा ४० : गुर्जर हरिभट ४१ : पिंपळें रामदेव ४२ : मधुर गोविंदभट ४३ : दंड माणिकभट ४४ : काळीचे जनकभट ४५ : पुरीचे चांगदेवभट ६ : धर्महळीसाइ देव ४७ : अवीद्यात्मक सुष्ठपाणिभट ४८ i मुसा (स)ळे साईदेव ४९ : धुपे साइदमुनी ५० : कट(क)कार वंकी ५१ : आपलो ५२ :

पारमांडल्य आनोबासांचे शिष्य–

वासुदेवभट १ : वामनबास २ : तीकोबास ३ : देमनबास ४ : सोमणबास ५ : हरगर्वबास ६ : हरिपाळ हरिभट ७ : सिवन नागदेवभट ८ : मुनि कृष्णबा ९ : तथा कृष्णभट १० : नागनाथबास ११ : कमळभट १२ : मुनिमेइ देवोबा १३ : कांकरे महादेवोबा १४ : वांकी

येल्होबा १५ : मथन येल्होबा १६ : रामनाथ भट १७ : वाल्हंभट १८ : रोपे रामदेवो १९ : गणेशभट भट २० : गोपीनाथभट २१ : साळिवे मुरारी भट २२ : नेइभट २३ : जोइसीभट २४ : चांगदेवभट २५ : आपदेवोभट २६ : काइदेवो पंडित २७ : हरिदासभट २८ : दुरुडीभट २९। कळके केइभट ३० :

जाणो उपाध्यांची शिष्या कमळाहेसा तिचे शिष्य संतोबास १ : नरहरिबास २ : वि(र)क्त वैजोबास सडे हरिभट ४ : भिंगार हीराइसांचे गुरू भाया-बास ५ : साइंभट सातभाऊ ६ : पुरोखाबास ७ : नागोबास ८ : जोगो-बास ९ : जनकोबास १० : येल्होबास ११ : दाई भागवत १२ : धानोबास १३ : हरिदेवोबास १४ : कमळदेव मुनि १५ : मूनितिकोबा १६ : मुनि लुइबा १७ : आराधीये केशोबास १८ : नरसोबा १९ : हरिभागवत आइसांचे आजे २० :

कवीश्वर भानुभट बोरीकरांचे शिष्य—

परसरामबास १ : रामेश्वरबास : २ :

या ठिकाणी तीन पिढ्यांची नामावली दिली आहे. त्यात एक तरी राजान्त नाम आहे काय ? फक्त केसोबासाचे काव्यातून केशिराज नाव येते. पण ते नाव त्यांचे पूर्वाश्रमीचे आहे. तसेच मुकुंदराज हे नाव विवेक सिंधूकाराचे पूर्वाश्रमीचे आहे. हे यावरून सिद्ध होते. नावे नेहमी बदलतात. म्हणून प्रमाण देतांना त्या काळाचा विचार महत्त्वाचा ! पूर्वकालीन सिद्धी-साठी अलिकडील प्रचलित पुरावा वादार्ह ठरतो हा अक्षम्य दोष डॉ. ढेरे सहज करू शकतात.

सारांश, डॉ. ढेरे यांच्या प्रबंधातील प्रतिपादनांत अनेक कच्चे दुवे आहेत. ते आपण पाहिले. विशेषतः हरिनाथ आणि चक्रधर यांचे एकत्त्व सिद्ध करतांना हरिनाथाचे चरित्रमात्र चक्रधरांचे नसून ते त्यांचा पूर्वावतार असलेल्या चक्रपाणिचे आहेत असे त्यांना मानावे लागले आहे. त्यामुळे ज्या गावी चक्रधर (हरिपाळ) व रामदेव दादोस यांची भेट झाली. ते आंब-

जय हे वऱ्हाडातील गाव बाणगंगेच्या तीरावरील फलटण नगराकडे त्यांना फरपटत न्यावे लागले आहे. हरिनाथाच्या विश्वंभर नामक तिसऱ्या शिष्याचा चक्रधराच्या शिष्यमंडळीत कोणताही दुवा डॉ. ढेरे याना दाखविता आला नाही. ही व अशा अनेक बाबी बाधक म्हणजे नवीन संशोधकाना आव्हाने आहेत असे डॉ. ढेरे यांनी नमूद करणे ही बाब स्वप्नरंजनासारखी झाली आहे.

एकच मासलेवाईक उल्लेख यासाठी पुरेसा होईल तो असा की, हरिनाथ व चक्रधर ऐक्याबाबत डॉ. ढेरे यांच्या प्रतिपादनेची चर्चा डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आपल्या प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (पूर्वार्ध) या ग्रंथात अतिशय विस्ताराने केली आहे. त्यांत डॉ. देशपांडे यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांना ढेरे यांनी समर्पक उत्तरे देणे आवश्यक होते. काही बाधक बाबी म्हणून त्यांनी त्याचा निर्देश करणे शक्य आहे. तथापि डॉ. अ. ना. देशपांडे यांचा किंवा त्यांनी उपस्थित केलेल्या विवेचनाचा उल्लेख किंवा या बाबींकडे डॉ. ढेरे यांनी केलेले दुर्लक्ष हे संशोधनाच्या दृष्टीने समर्थनीय वाटत नाहीत. डॉ. ढेरे यांच्या कल्पकतेचा वारु काही ठिकाणी भरभक्कम पुराव्याच्या भूमीचा बळकट आधार सोडून कल्पनाविश्वात फार उंच उडाला आहे. त्यामुळे अकारण काही नवीन प्रश्न उद्‌भवले आहेत. अशा प्रश्नांचा विचार डॉ. ढेरे यानीच करावयास हवा.

## संदर्भ टीपा–


१. शं. गो. तुळपुळे, (संपा). लीळाचरित्र एकांक, पुणे, १९७२, पृष्ठ ३२, लीळांक ५८.

२. तत्रैव पृष्ठ ३२, लीळांक ५९.

३. तत्रैव पृष्ठ ३३, लीळांक ६१.

४. रा. चिं. ढेरे, चक्रपाणि, पुणे, १९७७, पृष्ठ २५८.

५. तत्रैव पृष्ठ २६३.

६. तत्रैव पृष्ठ २५५.

७ तत्रैव पृष्ठ २५६

८ तत्रैव पृष्ठ २६२

९ तत्रैव प्रा. नरहर कुरुंदकर, प्रस्तावना, पृष्ठ ४४.

१० रा. चिं. ढेरे, चक्रपाणि, पुणे, १९७७ पृ २८४

११ तत्रैव पृष्ठ २५०

१२ डॉ. अ. ना. देशपांडे, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' पूर्वार्धं, खंड पहिला, पूर्वार्धं ,नागपूर, १९६६ पृष्ठ २७८

१३. रा. चिं. ढेरे, चक्रपाणि, पुणे, १९७७, पृष्ठ २५३.

१४. तत्रैव पृष्ठ २५७.

☆ ☆ ☆

६

# महानुभाव पंथाचे काही उत्तरकालीन ग्रंथकार–

## श्री चक्रधर स्वामींच्या निरूपणातून तत्त्वज्ञान निर्मिती–

महानुभावपंथ प्रस्थापनेपूर्वीची श्रीचक्रधरस्वामींविषयीची थोडी फार जी माहिती मिळते ती त्यांच्या शिष्यांनी प्रसंगोपात्त जे काही विचारले व अनुषंगाने स्वामींनी जे काही निरूपण केले तेवढ्यापुरतीच ! कारण एकांक काळात स्वामी प्राय : एकटेच परिभ्रमणात होते. भांडारेचे दामोदर भट्ट यांच्या सन्निधी बरेच दिवस होते. तसेच वरंगळचे माधवभट्ट काही दिवस होते. पण ते महानुभाव पंथ प्रवर्तनापूर्वी बरेच दिवस अगोदर निधन पावले होते. अगदी शेवटी शेवटी रामदेव भेटले. तेच फक्त एकांक काळातील होते. व शेवटपर्यंत स्वामींच्या भेटीला येत असत त्यांच्या संबंधामुळेच नागदेवाचार्य स्वामींच्या भक्तीस लागले.

स्वामींनी महानुभाव पंथ स्थापन करताना वेळोवेळी ज्या तत्त्वज्ञानाचे व आचारधर्माचे निरूपण केले ते सर्व नागदेवाचार्य यांची चुलत बहीण माहादाईसा व काही इतर भक्त यांनी वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नावरून ! त्यातही नागदेवाचार्यांचा अधिकार पाहून त्यांना अधिक निरूपण केले. डोमेग्रामला तर दिव्यातले तेल संपले तर स्वामींच्या खाण्यातील

उपयोगात येणारे तूप घालून दिवा जळत ठेवला जात असे व निरूपण करीत असत. कधी कधी तर त्या निरूपणात संपूर्ण रात्र व्यतीत होत असे उत्तरापथाला प्रयाण करण्यापूर्वी श्रीनागदेवांना आचार्यपद देऊन सात दिवस रात्रंदिवस सारखे निरूपण केले. माहिंभट्टाने श्रीचक्रधरस्वामींच्या संबंधित स्थळांना व व्यक्तींना भेटून माहिती गोळा करून नागदेवाचार्याकडून सत्यतेची मान्यता मिळवून 'लीळाचरित्र' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यातच श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, आचारधर्म व इतर निरूपण साठविले गेले. त्यातूनच केसोबासाने नागदेवाचार्यांच्या सल्याने सूत्रे व दृष्टांत निवडून त्याचा अन्वय लावला. त्याच्या आधाराने महानुभाव वाङ्मय समृद्ध झाले आहे. लीळाचरित्र ग्रंथ खालसेयांच्या धाडीत गेल्यावर जे अनेक पाठ तयार झाले त्यापैकी एकालाही प्रमाणभूत न मानता डॉ. ढेरे उत्तरकालीन ग्रंथकार व त्यांच्या माहितीला महत्त्व दिले. जी माहिती आपल्या पथ्यावर पडत असेल मग ती अगदी अलीकडील पन्नासवर्षापूर्वीची का असेना रेंगाळत आली आहे असे म्हणत म्हणत ती स्वीकारली व जी आपल्या पथ्यावर पडत नसेल ती महानुभावांचे अज्ञान म्हणून घोषित केले हे शास्त्रीय दृष्टिकोणाला कसे मानवते ?

'लीळाचरित्रादी' आद्य महानुभावीय ग्रंथाचा कोणीही पक्षपातशून्य वाचक हे कबूल करील की, ज्याच्यावर विश्वास ठेवता येत नाही. असा वृत्तांत या ग्रंथात नाही. मात्र डॉ. ढेरे यांना त्यांच्या विश्वसनीयत्वाबद्दल संशय आहे. म्हणून चक्रपाणि पृ. २६५ वर रामदेवाचा विचार करतांना डॉ. ढेरे म्हणतात– " हा महानुभावीय वृत्तांत विश्वसनीय मानला तर रामदेवाच्या देहांताची घटना चक्रधरांच्या निर्याणानंतर व नागदेवाचार्यांच्या निर्याणापूर्वी ( शके ११९६ ते १२३४ च्या दरम्यात ) घडली. यावरून त्यांचा संशय दिसून येतो. त्यांना विश्वसनीय ग्रंथ वाटतात ते मयंकसुत मुरारीचा 'दर्शन प्रकाश' व कविडिंभ कृष्णमुनी आदींचे 'ऋद्धिपूर महात्म्यादी' ग्रंथ. म्हणूनच ते म्हणतात. " मला अनेक कारणांनी असे वाटते की, उत्तरकालीन महानुभाव ग्रंथकाराची ही धारणा अपसमजातून अथवा नवकल्पनारंजनातून उद्‌भवलेली नसून ती आद्य महानुभाव ग्रंथकारानी

हेतूतः दुर्लक्षिलेल्या ऐतिहासिक तथ्यांचे जतन करणारी आहे."

कोणत्याही ग्रंथाची विश्वसनीयता किंवा अविश्वसनीयता ठरवावयाची असेल तर त्याला तसेच बलवत्तर प्रमाण दाखवावे लागते. जे आपल्या पथ्यावर पडते ते विश्वसनीय व जे पथ्यावर पडत नाही ते अविश्वसनीय असे मानून भागत नाही. ती स्वार्थी वृत्ती ठरेल.

## उत्तरकालीन ग्रंथकारांची अविश्वसनीयता–

लीळाचरित्र, स्मृतिस्थळादी आद्य ग्रंथात जिला आधार नाही ती सर्व माहिती मुरारीच्या दर्शनप्रकाश या ग्रंथात व कविडिंभ कृष्णमुनीच्या ऋद्धिपूर माहात्म्यादी ग्रंथात येते. तीच पुराव्यासाठी डॉ. ढेरे यांनी वापरली आहे. त्याच माहितीविषयी उत्तरकालीन ग्रंथकाराने ऐतिहासिक तथ्य जतन केले म्हणून मानले आहे. यातही मयंकसुत मुरारीचा दर्शन-प्रकाश ग्रंथ अधिक बोलका आहे. त्यात सर्व दर्शनाविषयी सर्व पंथाविषयी माहिती ग्रथित केली आहे. याच मुरारीने याच दर्शनप्रकाशात महानुभाव पंथाचा संबंध न्यायदर्शनाशी जोडला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी इतर शास्त्राचा संबंध इतर पंथाशी जोडला आहे त्याने इतर दर्शनाचा इतर पंथाशी जोडलेला संबंध सत्य ठरत असेल तर न्याय दर्शनाचा महानुभाव पंथाशीं जोडलेला संबंध सत्य आहे असे मानावे लागेल. इतर पंथाशी इतर दर्शनाचा जोडलेला संबंध खोटा ठरत असेल तर महानुभाव पंथाशी न्यायशास्त्राचा जोडलेला संबंध तरी खरा कसा मानता येईल ? तसेच त्याने सहा दर्शनाचा जो विचार मांडला आहे त्याविषयी त्याला त्या दर्शनाचे ज्ञान कितपत होते. हे पण त्याच्या लिखाणावरून तपासावे लागेल. त्याला त्या त्या दर्शनाचे ज्ञानच नसेल तर तो थापा मारणारा आहे असे मानता येणार नाही काय ? त्याने सहा दर्शना (शास्त्रा)चा जो संबंध इतर पंथाशी जोडला आहे तो खालीलप्रमाणे–

तत्कामशास्त्रं किल धर्मशास्त्रं
तद्योगशास्त्रं त्वथ सांख्यशास्त्रम् ॥

वेदान्तशास्त्रं त्वथ पंचमं च
तन्न्यायशास्त्रं प्रवदन्ति षष्ठम् ।। ५६ ।।

कामे मुद्री धर्मे कुंची योगे लिंगी सांख्ये जाटी ।।
वेदान्ते वैदण्डी चोक्ता न्याये मुण्डी प्रोक्ता मार्गाः ।।
कामशास्त्र म्हणजे चार्वाक । तेथ मुद्रीदर्शन बोलिले एक ।।
तें सांगतां आईक । पंथ बारा ।। १७९ ।।

नाटेश्वर भैरव संतनाथ । जालंधरी वाघळी अवघटी अघड कळंक पंथ ।।
अघोर मच्छ अळपाळी महिंद्रनाथ घोडाचुडी ।। १८० ।।

सुवर्णपंथ बाळनाथ । हा योग जाणिजे बारा पंथ ।।
आता आईका वृत्तान्त । धर्मशास्त्राचा ।। १८१ ।।

धर्मशास्त्र म्हणजे मीमांसका । तेथे कुंची दर्शनद्विध देखा ।।
तयाचे पंथ आईका । भेद चौऱ्यायशी चौदा ।।१८२।।

निजप्रभु आणि जिन । आनंद नारदप्रभु जनार्दन ।।
ब्रह्मांड कीर्ती जयमल जाण । प्रताप नववा ।।१८३।।

तारक वैराग्य पितांबर । चंद्र विष्णु ब्रह्मा शंकर ।
हे आदि करूनी चौऱ्यायशी विस्तार । गुच्छ बोलिजेती ।।१८४।।

आतां सोफी पंथ विस्तार । तयाचा चतुर्दश निर्धार ।।
ऐका करूनी आदर । सांगेन आतां ।। १८५ ।।

प्यारे मुल्ला अबदाल फकीर । जंदे मलंग कादी कलंदर ।।
मुंडे किलशेख सैयदसार । दर्वेश भडंग महमदी सोफी ।। १८६ ।।

योगशास्त्रे ते तृतीय जाणा । तेथ लिंगी दर्शनाची ना मना ।।
तयाचे भेद विचारणा । पंथ पांच ।। १८७ ।।

रेवण मैराळ आचार्या । एको राम पंडित आराधिया ।।
हे प्रथम जंगमाचार्या । कलियुगी पांच ।। १८८ ।।

माचया आणि बंबया ।। चंदया आणि कंकया ।।
पांचवा तो गुंडया । हे जंगमाचार्ये ।। १८९ ।।

सांख्य शास्त्री जटी दर्शन । तयाचे पंथ दश नामन ।।
हे दर्शनाचे लक्षण । बोलिले असे ।। १९० ।।

तीर्थ भारती पर्वत गिरी । बन अरण्य आश्रमपुरी ।।
सरस्वती सागर विस्तारी । हा दशपंथ संन्यास ।। १९१ ।।

वेदांत शास्त्रीं दर्शन श्रीपाद । अवतार संख्या दर्शन भेद ।।
म्हणोनि न करावा प्रतिवाद । शास्त्र साक्षी असे ।।१९२।।

स्वरूप चैतन्य ब्रह्म । आनंद प्रकाश राम ।।
स्वामी दोन्ही दत्तनाम । ज्योति जीर्ण संन्यास ।।१९३ ।

न्यायशास्त्री मुंडी दर्शन । तयाचे तेरा पंथ जाण ।।
हे ज्ञानसार ओळखण । तै चुके संसृती ।।१९४।।

मयंकसुत मुरारीच्या दर्शनप्रकाशातील ओव्या वर नमूद केल्या आहेत. त्यात त्याने सहाशास्त्रापैकी कोणते पंथ कोणत्या दर्शनाचे मानणारे आहेत हे दाखविले आहेत. त्याचे ते विधान कसे चुकीचे आहे हे प्रसिद्ध दोन-तीन उदाहरणे देऊन दाखविता येते. मुरारीने जैन व सोफी मुसलमान हे धर्मशास्त्र व मीमांसादर्शनाचे मानणारे आहेत, असे सांगितले आहे व आद्य शंकराचार्य, त्यांचे तीर्थादि दशनाम संन्याशी सांख्यदर्शनाला मानणारे आहेत असे सांगितले आहे. पण हिन्दूंचे धर्मशास्त्र जैन किंवा मुसलमान कसे मानतील ? जैनाचे जैनदर्शन व मुसलमानांचे कुराणरूपी धर्मशास्त्र आहे हे प्रसिद्धच आहे. तसेच आद्य शंकराचार्य द्वैतवादी सांख्य-दर्शनाला मानणारे नसून उत्तरमीमांसा – वेदान्तदर्शनाला मानणारे आहेत. त्यांनी त्या दर्शनावर अद्वैतमत प्रतिपादक भाष्यच लिहिले आहे. हे पण प्रसिद्ध आहे. याचप्रमाणे इतर धर्मपंथ कोणत्या कोणत्या शास्त्राचे मानणारे आहेत या विषयीचे मुरारीचे विधानही चुकीचे आहे. याच संदर्भात महानुभाव पंथाचे न्यायदर्शन आहे असे तो मानतो, ते मान्य कसे करावयाचे ? ते मानावयाचे तर महानुभावीय आद्य ग्रंथाचा पुरावा हवा व न्यायदर्शनाच्या तत्त्वज्ञानाचा व महानुभाव तत्त्वज्ञानाचा मेळ बसावयास हवा. पण तो तसा बसत नाही.

## कृष्णमुनी व मयंकसुत मुरारी गुरुबंधु

न्यायदर्शनाचा व महानुभाव पंथाचा संबंध सर्वांत प्रथम मुरारीने व कवि डिंभ कृष्णमुनीने जोडला आहे. त्यांचेच अनुकरण शुकदेव चरित्रकार गोपालदास आदीने केले आहे. त्यात मयंकसुत मुरारी व कवी डिंभ कृष्णमुनि हे दोघे गुरुबंधू असले आणि दोघांनीही न्यायशास्त्राचा सम्बन्ध महानुभाव पंथाशी जोडला असला तरी कवि डिंभ कृष्णमुनि काव्यग्रंथाचा लेखक आहे. व मुरारी अध्यात्म विषयाचा लेखक आहे. दोघांचे विचार एक असणे शक्य आहे. म्हणून मुरारीच्या दर्शन प्रकाशाचा विचार करणेच योग्य वाटते. तोच येथे केला आहे.

मुरारीचे सहादर्शनाविषयी ज्ञान कितपत आहे हे पण त्याच्या दर्शनप्रकाश या ग्रंथावरून पाहणे उचित होईल, उदाहरणादाखल दोन-तीन दर्शनांच्या उल्लेखावरून बाकीच्या बद्दल अनुमान करणेही शक्य होईल. त्याने आपल्या दर्शनप्रकाश ग्रंथात वेदान्तशास्त्राचे पहिले सूत्र–

" प्रमाणप्रमेयोपाधिमायाविवर्त दृष्टांत प्रयोजन सिद्धान्त वेदान्त महावाक्यानां तत्त्वज्ञात् पारमेष्ठयं संगच्छेत इति वेदान्तशास्त्रस्यादिमं सूत्रम् " ॥ ८२ ॥

हे लिहिले आहे पण हे पहिले सूत्र नसून ' अथातो ब्रह्मजिज्ञासा ' हे आहे. तसेच ' वेदान्ताख्यं पंचभिरध्यायैः सूत्रितम् ' असे वेदांत शास्त्राचे पाच अध्याय मानले आहेत. पण खाली मराठीत म्हणतो " वेदान्त शास्त्री पंधरा अध्याय म्हणत । सूत्रे पंधराशते त्रेपन गणीत । दाहा पदार्थ बोलत । फळ पारमेष्ठ्य ॥ २६४ ॥

त्याला आपण संस्कृतात काय लिहितो व खाली मराठीत काय लिहितो याचेसुद्धा भान राहिलेले नाही. या वेदान्त शास्त्राची सूत्रे १५५३ लिहितो पण आहेत ५५६ व अध्याय चार आहेत. योगशास्त्राचे पहिले सूत्र–

"प्रमाणप्रमेयोपाधियोगसिद्धियोगानांतत्त्वज्ञानादजरोमरोभयो भवेदिति योगशास्त्रस्यादिमं सूत्रम " ॥ ८८ ॥

हे लिहितो ' अष्टाध्यायै सूत्रितं योगशास्त्रम् म्हणजे योगशास्त्राचे आठ अध्याय आहेत. असे लिहून सूत्रसंख्येविषयी ' सूत्रें तेरा शते आणि दाहा गणीत ' म्हणजे १३१० असे लिहितो. पण या योगशास्त्राचे पहिले सूत्र ' अथ योगानुशासनम् ' हे आहे. या शास्त्राचे फक्त चार पाद आहेत. १) समाधीपाद, २) साधनपाद, ३) विभूतिपाद, ४) कैवल्यपाद अध्याय एकही नाही. सूत्रे १९५ आहेत.

धर्मशास्त्रा (मीमांसादर्शना) चे पहिले सूत्र–

" प्रमाणप्रमेयकर्मलाभमीमांसा धर्माणां तत्त्वज्ञानान्महेन्द्रधिष्ण्यं च समश्नुते इति धर्मशास्त्रस्यादिमं सूत्रम् ।। ९१ ।।

हे लिहून संस्कृतात ' पंचाध्यायैः सूत्रितं धर्मशास्त्रम्।' असे लिहितो पण खाली–

" धर्मशास्त्रीं दाहा अध्याय परमित । सूत्रे अकराशते सोळा गणीत ।
पदार्थ पंच अवधारित । मळमहेन्द्र ।। २७९ ।।

असे नमूद करून याच धर्मशास्त्राचे दहा अध्याय व १११६ सूत्रे लिहितो. येथेही आपण संस्कृतात काय लिहिले आहे. आणि मराठीत काय लिहित आहो याचे त्याला भान राहिले नाही. धर्मशास्त्राचे पहिले सूत्र मुरारीने लिहिले नसून ' अथातो धर्म जिज्ञासा ' हे आहे. अध्याय पाचही दहाही नसून बारा आहेत. सूत्रे १११६ नसून २६४८ आहेत. ज्याला संशय असेल त्याने त्या दर्शनावरून तपासून पहावे.

डॉ. ढेरे यांचे ऐतिहासिक तथ्याचे जतन करणारे समन्वय साधणारे उत्तरकालीन ग्रंथकारात सर्वात पहिले व प्रमुख दर्शनप्रकाशकार मुरारी हे असे आहेत. त्यांना एक तर सहा शास्त्राच्या पहिल्या सूत्राचे त्यांच्या अध्यायांच्या व सूत्राच्या संख्येचे ज्ञानच नाही. किंवा त्यानी थापा तरी मारल्या असाव्या, असे त्यांच्या मागील विधानावरून स्पष्ट होते. अशांनी न्यायशास्त्राशी महानुभाव पंथाचा संबंध जोडावा. व ढेरे

यांच्या सारख्यांनी आपल्या पथ्यावर पडते म्हणून स्वीकारावे. यापेक्षा आश्चर्य ते कोणते ?

कदाचित काही विद्वान असेही म्हणतील की, मयंकसुत मुरारी तुमचेच पंथीय आहेत. पण एकतर पंथीय आहेत म्हणून त्यांचे खरे खोटे सर्व विधान डोळे झाकून स्वीकारावयाचे की काय ? दुसरे, त्यांना पूर्णपणे पंथीय व श्रीचक्रधर स्वामींच्या तत्त्वज्ञानाचे पायिक तरी म्हणता येईल काय ?

## मयंकसुतांचे संदिग्ध पंथानुयायित्व

कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही धर्मपंथीयाचे अनुयायी तेव्हाच म्हणता येईल. जेव्हा ती व्यक्ती त्या पंथाच्या तत्त्वज्ञानाला मानणारी व त्यांचे गुरुबंधु कविडिंभ कृष्णमुनि हे दोघे पंथानुयायी ठरण्याच्या या कसोटीला उतरतात काय ? मुरारी म्हणतो–

'ह्या न्यायशास्त्राच्या सूत्रा । कृतीहंसे ज्ञान केसे रुद्रा ।
तेणे त्रेतीं गौतमऋषीश्वरा । सांगितले त्र्यंबकी ।।

('दर्शनप्रकाश', २५८)

न्यायशास्त्र मुंडीदर्शन । तयाचे तेरा पंथ असती जाण ।
हे ज्ञानसार वळखण । तेणें संसृति भ्रमण चुके ।।
ब्रह्मा रुद्र जाला ध्यायमान । जें कल्पिले होते मन ।
ते हंसावतारे केले निरोपण । न्यायसूत्ररुपे ।।
ते न्यायशास्त्र गौतमाप्रती । निरोपिले ब्रह्मगिरीवर निगुतीं ।
तेथोनी मुंडी दर्शन बोलती । तयाचे पंथ तेरा ।।

कवि डिंभ कृष्णमुनि म्हणतो–

जे करिती न्यायशास्त्राचे आचरण । अपुनर्भव पावती मोक्ष निर्वाण ।
तयासी म्हणती मुंडी दर्शन । महात्म्याते ।।

(' ऋद्धिपुर माहात्म्य, ' ४. २८७)

या दोघांच्या उल्लेखावरून दिसून येते की, महानुभावपंथ न्याय दर्शनाला मानणारा असून त्या शास्त्राने मोक्ष मिळतो. ते शास्त्र हंसावताराने रुद्राने गौतमाला व त्याने हल्ली प्रसिद्ध असलेल्या न्यायशास्त्राची रचना केली. ते शास्त्र मोक्ष देणारे आहे. कारण मुरारीने न्यायशास्त्राचे पहिले सूत्र जे दाखविले आहे ते–

"प्रमाणप्रमेयसंशय प्रयोजन दृष्टांत सिद्धान्तावयवतर्कनिर्णयवाद-जल्पवितण्डाहेत्वाभासच्छलजाति निग्रहस्थानानां तत्त्वज्ञानान्निः श्रेयसाधिगमः ।. १ ।।" हेच आहे. अशी या दोघांची मान्यता आहे. पण ती महानुभाव तत्त्वज्ञाला धरून नाही. महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे रुद्रादी देवता मोक्षाच्या अधिकारी नाहीत. त्यांना ईश्वर ज्ञान देत नाही. ते त्यांना प्रणवतही नाही. पण यांनी हंसावताराने रुद्राला ज्ञान दिले असे मानले आहे. व ते त्यांनी गौतमाला दिले. पण देवता जीवाला मोक्षोपयोगी ज्ञान देऊ शकत नाहीत. यद्यपी स्वामींनी म्हटले आहे, " हे शास्त्र हंसावतारे ब्रह्माप्रति निरोपिले : पण अधिकारे विन घेते द्वार नुघडेचि : " (सूत्रपाठ विचार वचन १५०) यात स्पष्ट केले आहे की, ब्रह्माला प्रणवले नाही. हंसावताराने ब्रह्माला निमित्त करून सनकादिकांना दिले. तसाही येथे प्रसंग नाही. देवता मोक्षाधिकारीं नसून जीव मोक्षाधिकारी आहेत. 'नित्य बद्धा देवता : बद्धमुक्त जीव : नित्यमुक्त परमेश्वरु : ' ( सूत्रपाठ विचार ४५ ) यानी रुद्राने गौतमाला दिलेले ज्ञान तेच न्यायशास्त्र, मोक्ष देणारे असे मानले आहे. स्वामी म्हणतात– " या चहुयुगीचा धर्मी परमेश्वरु गणीजे : न पविजे : परमेश्वरे परमेश्वरु जाणिजे : परमेश्वरे परमेश्वरु पविजे : (युगधर्म प्रकरण) याप्रमाणे यांनी स्वामींच्या तत्त्वज्ञानांचे पालन केले नाही म्हणून ते पूर्णपणे महानुभाव पंथानुयायीं होण्याचे अधिकारी संभवू शकत नाहीत.

हंसावताराने ब्रम्हदेवाला न्यायशास्त्राचे निरोपण केले असा स्वामीं-च्या ' हे शास्त्र हंसावतारे ब्रम्हया प्रति निरोपिले ' या वचनाचा अर्थ नसून हे म्हणजे आम्ही निरुपण करीत आहोत असा त्याचा अर्थ आहे,

आपण|निरूपण करीत असलेले शास्त्र हे गौतमन्यायशास्त्र आहे असेही स्वामींनी कधीही कोठेही म्हटलेले नाही. स्वामीनी निरूपिलेल्या शास्त्राचा गौतम न्याय शास्त्राशी संबंध जोडणे ही मुरारी व कृष्णमुनीची स्वैर कल्पना आहे, ती ढेरे यांच्या पथ्यावर पडते म्हणून त्यांनी ती उचलून धरली आहे.

" कृष्णमुनी डिंभाने इतरांनी मानलेल्या सात मोक्षाच्या पुरींच्या महात्म्याचा महानुभावीयांना पवित्र वाटणाऱ्या सात स्थानावर आरोप केला आहे. तो खालीलप्रमाणे–

छिन्नपापाते अयोध्या म्हणिजे । अळकापुर ते मथुरा बोलिजे ।
माया तीर्थ वांकी जे । सीनेचा तटीं ।।
फळस्थळाते बोलिजे कांती । काशी प्रतिष्ठानाते म्हणती ।
ऋद्धिपुराते द्वारावती । आवंती ते येळौर ।।

('ऋद्धिपूर माहात्म्य', ३–१४०–४१)

इतर लोकांच्या सात पुऱ्याच्या ठिकाणी जरी यांनी या आपल्या सातमोक्षपुऱ्या मानल्या तरी या पुऱ्यांना पवित्रता कशाने आली हे कवी डिंभाने म्हटले ते पाहण्यासारखे आहे.

" रामें दशरथाचे । पींड पाडिले साचे ।
म्हणौनि छीन्नपापाचे । अयोध्या नावे । ४३ ।
रुक्मिणी सैंवरा जाता । आळकावतीय येने जाले कृष्णनाथा ।
विडा वाईला अंबिनाथा । म्हणौनि मथुरा जाणिजे ।। ४४ ।।
मायासूर भस्म केला मावेसी ।
म्हणौनि माया म्हणिजे गयेसी ।
तैंसा भष्मासूर भष्म केला वांकियेसी ।
म्हणौनि वाकीतीर्थ माया ।। ४५ ।।
रखुमांगद मुक्त जाला येकादशीव्रते ।
तैंचि स्त्रीहत्येपासौनि मुक्त केले रामाते ।
म्हणौनि बोलिजे फळस्थळाते । कांतीनगरी ।। ४६ ।।

पाताळौनि भेटावया गौतमीसी । भोगावती आली प्रतिष्ठानासी
म्हणौनि जवा आगळीकासी । म्हणिजे तयाते ।। ४७ ।।
उजनीसि जोतलींग महाकाळ वसे ।
तैसेचि वेळौरी घुसमेश्वर जोतलिंग असे ।
म्हणौनि यैळौराते आवंतीऐसे । म्हणिजे नाम तयाचे ।।४८।।
कळयुगी अवतरौणि भगवते ।
द्वारका दाखविली लक्ष्मीधर द्विजाने ।
म्हणौनि द्वारावती ऋद्धिपुराते । म्हणिजे जाणा ।।४९।।

या सातपुऱ्यापैकी छिन्नपाप, वांकी, फळस्थ, प्रतिष्ठान, वेरुळ या पाच पुऱ्यात पवित्रता आलेली कवि डिंभाने कशाने मानली आहे? परमेश्वर अवताराच्या संबंधाने काय? की देवतांच्या संबंधाने ? ती देवतांच्या संबंधाने आली आहे असे कवि डिंभाने मानले आहे. मग देवतांच्या संबंधाने आलेली पवित्रता मोक्षोपयोगी होऊ शकते हे महानुभाव तत्त्वज्ञानाला धरून आहे काय ? तसे नसेल तर मग यांना पूर्ण महानुभाव पंथानुयायी असे मानता येईल काय ? पण महानुभावपंथीय या लोकांनी असे विधान का करावे ती बाबही विचार करण्यासारखी आहे.

## शैवांचा प्रभाव

दर्शनप्रकाशकार मुरारी आपल्या ग्रंथाच्या शेवटी मयंकसुत मुरारी ग्रंथाच्या शेवटी असे म्हणतो. व कृष्णमुनी ऋद्धिपुर माहात्म्यादी प्रत्येक ग्रंथाच्या प्रत्येक प्रसंगाच्या शेवटी मयंकराज शिष्ये मुरारी विरचिते असे लिहितो व भीष्माचार्याविषयी—

श्रीबोपदेव वदन-चंद्रापासौनी । चकोर लाधला ज्ञानामृताचा धनी
तो भीष्माचार्ये मुनी । वंदिला गुरुबन्धु ।।

या ओवीत कृष्णमुनीने बोपवांना चंद्र व भीष्माचार्याला चकोर कल्पून रूपक साधले आहे. त्यामुळे भीष्माचार्य बोपदेवांचा शिष्य ठरतो. पण याच ओवीत कृष्णमुनीने त्याला गुरुबन्धु मानले आहे. गुरुशिष्य व

गुरुबन्धू हे समकालीनच असावे लागतात. मात्र बोपदेव व कृष्णमुनी यांच्या काळात निदान ३०० वर्षांचे तरी मोठे अंतर आहे. त्यामुळे या भीष्माचार्याला कृष्णमुनीचा गुरुबंधू किंवा बोपदेवाचा शिष्य या दोहोपैकी एकच मानावे लागेल.

डॉ. यू. म. पठाण यांनी भीष्माचार्याला बोपदेवाचा साक्षात शिष्य व भीष्माचार्य आणि कृष्णमुनी दोघेही उपाध्याय आम्नायातील आसल्यामुळे आम्नायाच्या नात्याने गुरुबंधु मानले आहे. पण डॉ. पठाणांचे हे म्हणणे युक्तिसंगत वाटत नाही. कारण (१) भीष्माचार्य व कृष्णमुनी केवळ एका आम्नायातीलच नसून दोन्ही वाइंदेशकर शाखेचे ! म्हणून भीष्माचार्य कृष्णमुनीचा पूर्वजही ठरतो. आपल्या पूर्वजाला गुरुबंधु मानणे अभिमानाचे ठरते.

२) तवे इतर शास्त्र शोधिता । देखिले सिद्धयामळ ग्रंथा ॥

( ऋद्धिपुर माहात्म्य २×४० )

कृष्णमुनीच्या या ओवीवरून या भीष्माचार्याने सिद्धयामळ ग्रंथ पाहिला होता असे दिसते. या भीष्माचार्यांना बोपदेवाचा शिष्य मानल्यास सिद्धयामळ ग्रंथकर्ता भीष्माचार्य दुसरा कोणी याच्या अगोदरचा मानावा लागेल. बोपदेव रामदेवाच्या राजसभेचे पंडित; म्हणून ते श्रीनागदेवाचार्यांच्या समकालीन दिसतात. या बोपदेवशिष्य भीष्माचार्यापूर्वी कोणी दुसरा भीष्माचार्य संभवू शकत नाही म्हणून यांना बोपदेव शिष्य मानता येत नाही.

(३) श्रीभीष्माचार्या म्हणे कवींडिभा कृष्णमुनी ।
तेथे ऋद्धिपूर–महात्म्य असे संस्कृतवानी ॥
तयाची मऱ्हाटी भाषा करूणी । कथा नीर्मावीं तुवां ।

( ' ऋद्धिपुर महात्म्य, ' २×४२. )

तसेच आत्मतीर्थ प्रकाशातही कवींडिभ म्हणतो–

भीष्माचार्ये म्हणितले मुनी कृष्णदासा |
महाराष्ट्रप्रबंधी तुझी वाणी सुरसा ॥

तरी आत्मतीर्थ महात्म्य प्रकाशा । ग्रंथ ना तू करी ।
सिद्धयामळ ग्रंथनाम । तेथ सैहाद्रिखंडे आत्मतीर्थ माहात्म्य
तेया संस्कृताचे महाराष्ट्र उत्तम । करावे तुआ ॥

( 'आत्मतीर्थ प्रकाश,' २×१५–१६ )

या ओव्यावरून हा भीष्माचार्य, ग्रंथकर्तृत्वाची कृष्णमुनीला प्रेरणा देणारा आहे. अशी प्रेरणा समकालिनत्वाशिवाय शक्य होत नाही. म्हणून या भीष्माचार्यांला कृष्णमुनीचा गुरुबंधु मानणेच अधिक युक्तिसंगत ठरते. भीष्माचार्य मयंक कृष्णमुनी असा उल्लेख यक्षदेव ग्रंथसंग्रहालयातील एका-पोथीवर आढळला आहे. त्यावरूनही भीष्माचार्य कृष्णमुनींचा गुरुबंधूच दिसतो. राहिली बाब बोपदेवाचे चंद्र होण्याची व भीष्माचार्यांची चकोर होण्याची म्हणजे गुरुशिष्य संबंधाची. हे दोन्ही वायंदेशकर शाखेचे असल्या-मुळे बोपदेव चंद्रापासून परंपरेने भीष्माचार्य चकोराला ज्ञानामृत मिळाले हेच मानणे अधिक शक्य होते. याप्रमाणे भीष्माचार्यांना बोपदेवापासून ज्ञान प्राप्त झाले आहे असे मानले म्हणजे मुरारी, कृष्णमुनी, व भीष्मा-चार्य हे गुरुबंधु ठरतात; व कृष्णमुनीला ग्रंथकर्तृत्वाविषयी जशी प्रेरणा केली तशीच मुरारीला केली असण्याचाही संभव निर्माण होतो.

## तिघावर शैवांचा प्रभाव

एक भीष्माचार्य काशीला गेले होते. असे परंपरेने ऐकतो तोच हा भीष्माचार्य असावा. श्रीकांत प्रभाकर शास्त्री महानुभाव मासिकाच्या दिवाळी विशेषांकात लिहितात–

"एक किंवदन्ती है कि, प्रसिद्ध महानुभाव विद्वान श्रीविश्वनाथ व्यासजीका और संस्कृत महापंडित श्रीभीष्माचार्यजीका प्राय: शास्त्रार्थ हुवा करता था । किन्तु विजय सदैव श्रीविश्वनाथ व्यासजीकी होती थी अत: श्रीभीष्माचार्य विद्याका गढ काशीमे जाकर संस्कृत पढकर आए । हेतु यह है की, किसी प्रकार 'व्यास' को हरा सकूँ । पर तबभी भीष्मा-चार्यको विजय शास्त्रार्थमें न मिल सकी'।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२८६२९
निबंध २५४ ९



हा भीष्माचार्य ज्याअर्थी विश्वनाथ व्यासांचा पराभव करण्याच्या ईर्षेने वाराणसीला गेला त्याअर्थी संस्कृतचा अभ्यास त्याने नेटाने केला असावा. अनेक वादविवादातही रस घेतला असावा. तसेच वाराणसीसारख्या शैवांच्या महाक्षेत्रात संस्कृतच्या अभ्यासासाठी अधिककाळ वास्तव्य केल्यामुळे त्यांच्यावर शैवांचा प्रभाव पडणे व त्याचा आपल्या गुरुबंधूवर प्रभाव पडणे आवश्यकच होते, म्हणूनच कृष्णमुनी व मुरारी यांनी महानुभाव पंथाशी न्यायशास्त्राचा संबंध जोडला व न्यायशास्त्राला मोक्ष देणारे मानले. तसेच महानुभाव पंथाच्या सात पवित्र मोक्षदायक पुरी सांगताना यापैकी चार पुऱ्यात शिवाच्या संबंधाने पवित्रता आली आहे.

महानुभाव पंथात वाइंदेशकरांचे ग्रंथ प्रमाण मानले जात नाहीत त्याचे कारणही हेच आहे. व यांचे पुढील ग्रंथकाराचेच ग्रंथ प्रमाण मानले जात नाहीत. या तिघांना पूर्णपणे महानुभाव पंथीयही मानता येत नाही व शैवही मानता येत नाही ते याचमुळे.

## न्यायसिद्धान्त

डॉ. ढेरे यांनी हरिश्चन्द्र सुरीचा 'षड्दर्शन समुच्चयातील' दाखला देऊन न्याय आणि वैशेषिकाचा देवता विषयी भेद नाही. असे म्हटले आहे.

" देवता विषय भेदो नास्ति नैयायिकै: समम् ।
वैशेषिकाणां तत्त्वेषु विद्यतेऽसौ निर्दिश्यते ।। ५९ ।।

न्याय आणि वैशेषिक यांचा देवताविषयक भेद नाही. भेद आहे तो तत्त्वाचा.

मात्र गौतम न्यायदर्शनाचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, त्या दर्शनाच्या कोणत्याही सूत्रात कोणत्याच देवतेचा उल्लेख नाही. एक-दोन सूत्र सोडून परमात्म्याचाही तेथे उल्लेख येत नाही. त्यात फक्त— १) प्रमाण २) प्रमेय, ३) संशय ४) प्रयोजन ५) दृष्टांत ६) सिद्धांत ७) अवयव ८) तर्क ९) निर्णय १०) वाद ११) जल्प १२) वितण्डा १३) हेत्वाभास १४) छल १५) जाति १६) निग्रह या सोळा पदार्थांचा

नामनिर्देशात्मक उल्लेख, त्यांचे लक्षण व त्यांची परीक्षा याशिवाय काहीच नाही.

## गौतम न्यायदर्शन व महानुभाव तत्वज्ञान यांचा सिद्धान्त भेद–

उत्तरकालीन ग्रंथकारांनी आद्य ग्रंथकारांना डावलून गौतम न्यायशास्त्राशी महानुभाव पंथाचा संबंध जोडला आहे. कारण आद्यग्रंथात हा संबंध असल्याचे एकही उदाहरण आढळत नाही. या उत्तरकालीन ग्रंथकारातही हा संबंध ' दर्शनप्रकाश ' कार मुरारी व कवीडिंभ कृष्णमुनी यांनीच सर्वप्रथम जोडला आहे यांचे अनुकरण नंतर काही इतर ग्रंथकारांनी केले आहे या दोघांनी या शास्त्राचा महानुभाव पंथाशी संबंध जोडला खरा पण निदान त्या शास्त्राचे सिद्धान्त तरी जुळावयास पाहिजे होते. पण तेही जुळत नाही उदाहरणार्थ दोन तीन प्रमुख सिद्धान्ताचे पाहू–

१) न्यायदर्शन आत्म्याला विभू– सर्व व्यापक मानते.

' तदात्मगुणत्वेऽपि तुल्यम् ॥२०॥ २–अ. २ आ.

विभुरात्मा सर्वेन्द्रियैः संयुक्त इति युगपज्ज्ञानोत्पत्ति प्रसंग इति ॥

( वात्स्यायन भाष्य )

भाष्यकारांनी या ठिकाणी आत्मा विभू असल्याचे स्पष्ट केले आहे. महानुभाव तत्त्वज्ञान जीवात्म्याला एकदेशी मध्यम परमाणुवाला व स्वरुपतः अविभाज्य म्हणून नित्य मानते. ' जीवे जे होआवे तेचि होए : देवता हो जाने उरो जाने : ( विचार ४६ )

खुलासा– महानुभाव तत्त्वज्ञान जीव स्वरूप पहा.

२) न्यायदर्शन मोक्षावस्थेत केवळ दुःखाचा अत्यंत नाशच मानते. ' बाधन्त लक्षणं दुःखम् ' ॥ २१-१-१ ॥ ' तदत्यन्तविमोक्षोऽपवर्गः ' ॥२२-१-१। या सूत्रावरून मोक्षावस्थेत दुःखाचा अत्यंत नाशमात्रच होतो; हे स्पष्ट होत आहे. महानुभाव तत्त्वज्ञान दुःखाचा अत्यंत नाश व त्याचबरोबर आनंदाची प्राप्ती मानते. ' परमेश्वरभक्तासि आपुली अनुभूति रति देतिः ' (उद्धरण ५९)

३) न्यायदर्शन प्रमाणुला नित्य मानून त्यांच्या समुदायापासून दृष्य जगताची उत्पत्ती मानते 'न प्रलयोऽणुसद्भावात् ॥१६-४-२॥ प्रलयकाळी परमाणुचा नाश होत नाही म्हणूनच प्रलयकाळी सर्व पदार्थांचा नाश होतो असे मानता येत नाही. येथे न्यायदर्शन प्रमाणुचा नाश होत नाही असे मानते हे स्पष्ट होत आहे. महानुभाव तत्त्वज्ञान प्रमाणुचे कोटयावधी तुकडे होतात असे मानते व प्रमाणुपेक्षा कोटयावधी पटीने पंचमहाभूतांना सूक्ष्म मानते त्यापासून दृश्य प्रपंचाची रचना होते असे मानते. महानुभाव तत्त्वज्ञान प्रपंचाची रचना व संहार पहा.

## मुंडीदर्शन आणि महानुभाव पंथ

डॉ. ढेरे यांनी ज्यात मुंडीचा समावेश असे शक्तिसंगम तंत्राच्या सुन्दरी खंडातील पाशुपतांचे सात भेद पुढीलप्रमाणे दाखविले आहेत—

'शैवे चान्तर्गता देवि श्रीमत्पाशुपतादयः ।
तेषां तु सदा भेदा वै तानहं वच्मि संशृणु ॥
आधौ शिखी ततो मुंडी जटी चैव तृतीयकः ।
द्विदण्डी त्वेकदण्डीच त्रिदण्डीच ततः स्मृतः ॥
वीरशैव सप्तमस्तु सप्तपाशुपताः स्मृताः ।

( शक्तीसंगमतंत्र, सुंदरीखंड, १- १८३ – १८५ )

" हे देवी, शैवसंप्रदायान्तर्गत पाशुपतादी भेद आहेत. पाशुपतांचे भेद सात आहेत, ते मी सांगतो ते ऐक. शिखी, मुंडी, जटी, एकदण्डी, द्विदंडी त्रिदंडी आणि सातवा वीरशैव हे सप्तपाशुपत होत. "

शक्ति संगमतंत्रकाराने पाशुपतांचे हे जे सात भेद सांगितले आहेत त्यापैकी मुंडी आणि वीरशैव या दोन भेदांचे आपल्या प्रतिपाद्य विषयाच्या संदर्भात विशेष महत्त्व आहे. पाशुपतान्तर्गत वीरशैवांचा विचार आपण गोरक्षनाथ आणि अल्समप्रभू या प्रकरणात केलेला आहे. येथे पाशुपतान्तर्गत मुंडीचा विचार कर्तव्य आहे.

उत्तरकालीन महानुभाव वाङ्मयात महानुभाव संप्रदायाचे एक पर्यायनाम म्हणून ' मुंडी दर्शन ' अथवा 'मुंडीमार्ग' या संज्ञेचा वारंवार वापर केलेला आळढतो. मयंकसुत मुरारीकृत 'दर्शनप्रकाश' या ग्रंथात ( रचना शके १५६० ) मुंडी दर्शन तो महात्मा प्रसिद्ध ' ( ओ. २०७ ) असे स्पष्ट शब्दात म्हटले असून, पुढे मुनी, मुंडी व महात्मा ही एकाच पंथाची भिन्न नामे असल्याचे विशद विधान केले आहे–

चहू युगी आचार्या । भिन्न नामे असती तयां ।
पंथनामे सारिखी अघवया । मुनी मुंडी महात्मा ॥३६३॥

कृष्णमुनी डिंभ या ख्यातनाम ग्रंथकारानेही आपल्या ' ऋद्धिपुर माहात्म्य ' ग्रंथात महानुभाव संप्रदायासाठी ' मुंडीदर्शन ' ही संज्ञा पुढील प्रमाणे वापरलेली आहे. ' मुंडी दर्शन ते महात्मा । तयांचे दैवत श्रीकृष्ण परमात्मा । ' (२.८५) ' दर्शना नांव ठेविले मुंडी / (४.२९६)., ऐसे चहुं युगी मुंडीदर्शन । च्यान्ही परमेश्वरावतार करितो निर्माण । ' (४.३०५), ' म्हणौनि मुंडी महात्मा दर्शन । याचे कव्हनी नेणे महिमान ।' (४-३१३) ही एवढी उदाहरणे पुरेशी आहेत.

या उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, महानुभाव संप्रदायांत अशी एक पारंपारिक जाणीव पाझरत राहिलेली आहे की, आपला संप्रदाय ह्या सप्तपाशुपतांपैकी ' मुंडी ' नामक भेद आहे. ही जाणीव क्षीण असली, तरी संशयोच्छेदी आहे. ''

याप्रमाणे डॉ. ढेरे यांनी पाशुपतांचे सात भेद, त्यात येत असलेला ' मुंडी ' भेद दाखवून आणि उत्तरकालीन महानुभाव ग्रंथकारांनी उल्लेखिलेले 'मुंडीदर्शन' याची हातचलाखीने भेसळ करून महानुभावपंथाला पाशुपत शैवात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हातचलाखीने म्हणण्याचे कारण असे की, ज्याप्रमाणे त्यांनी पाशुपतांचे सातभेद ' शक्तिसंगम-तंत्राच्या आधाराने दाखविले, त्याचप्रमाणे दर्शनप्रकाशाच्या आधाराने, ज्यात मुंडी दर्शनाचा समावेश आहे, ती सहा दर्शने दाखवून मग

पाशुपताच्या सात भेदात हे मुंडी दर्शन समाविष्ट होणे संभवते काय हे सिद्ध करून दाखवावयाचे होते. तसे सिद्ध केले असते तर त्यांच्या म्हणण्याला काही किंमत आली असती; पण त्यानी तसे केले नाही. त्यांना तसे करता आले नाही. तसे करणे शक्यच नव्हते. म्हणून हातचलाखी केली असे म्हणावे लागते. डॉ. ढेरे यांनी मुरारीच्या 'दर्शनप्रकाशां'तील सहा दर्शने दाखविली नाहीत. ते दाखवून आपण पुढील विचार करू या.

अन्तःकारोऽथ संस्कारः साधनानि षडेव हि ।
मुंडी दण्डी जटी लिंगी कुंची मुद्री तु दर्शने ॥६१॥

मुद्री दर्शन तो योगी एक । कुंची दर्शन तो क्षेपनिक ।
लिंगी दर्शन तो जंगमाइक । हे दर्शन त्रय ॥२०६॥

जटी दर्शन तो जटाधारी स्वतः सिद्ध । दण्डी दर्शन
तो श्रीपाद । मुंडी दर्शन तो महात्मा प्रसिद्ध ॥२०७॥

मुरारीने ही सहा दर्शने सांगितली आहेत. यात पाशुपतांचा मुंडीभेद येतो, तो येणे कसा शक्य आहे? यात जैन, महानुभाव, शंकराचार्यांचे दशनाम संन्यासी, जंगम इत्यादी अनेकांचा समावेश आहे. म्हणून पाशुपताच्या मुंडीभेदाचा येथे काडीचाही संबंध नाही. पाशुपत असोत किंवा कोणीही असो मुंडन करणारे ते मुंडी, जटा वाढविणारे ते जटी, शिखा (शेंडी) ठेवणारे ते शिखी, दण्ड धारण करणारे ते दंडी. या अर्थानेच हे शब्द वापरले जातात. सांख्यकारिकेच्या गौडपाद भाष्यात गौडपादानेही हे शब्द त्याच अर्थाने वापरले आहेत.

पञ्चविंशति तत्त्वज्ञो यत्र तत्राश्रमे वसन् ।
जटी मुण्डी शिखी वापि मुच्यते नात्र संशयः ॥
( सांख्यकारिका १ गौडपाद भाष्य. )

सांख्यवाले २५ तत्त्व मानतात. म्हणून गौडपाद म्हणतात २५ तत्त्वांचा जाणणारा कोणत्याही आश्रमात जटी मुंडी किंवा शिखी असो तो मुक्त होतो यात शंका नाही. मुंडी शब्द पाशुपत शैवांनी विकत घेतलेला नाही.

बाकीचेहीं त्या शब्दाचा वापर करीत आलेले आहेत. त्याचप्रमाणे उत्तरकालीन महानुभाव ग्रंथकारांनीही तो वापरला आहे. म्हणून मुंडी शब्द वापरल्याने महानुभाव पंथ पाशुपतांचा मुंडीभेद ठरणे शक्य नाही. याचा विद्वानांनी विचार करावा.

याप्रमाणे दर्शनप्रकाशकार मुरारी अणि कवी डिंभ कृष्णमुनी यांच्या सारखे उत्तरकालीन ग्रंथकार डॉ. ढेरे यांनी प्रमाणभूत मानले आहेत. हरिनाथ चक्रधर ऐक्य, न्यायदर्शन आणि महानुभावपंथ, शंकराचार्य आणि महानुभाव किंवा मुंडीदर्शन आणि महानुभाव यासंबंधीची मते मुरारी आणि कृष्णमुनी डिंभ यांच्या ग्रंथातून निवडून ती प्रमाण धरून डॉ. ढेरे यांनी या उत्तरकालीन ग्रंथकारांचा आपल्या तर्कांना आधार घेतला आहे. मेघचंद्रकृत वृद्धान्वय किंवा आम्नाय मंजरी या सारख्या जुन्या हस्तलिखित पोथ्या जोपर्यंत उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत हे सर्व उत्तरकालीन ग्रंथ अप्रमाणितच ठरतात.

श्रीयक्षदेव मुरारी हे तर १९४६ साली निवर्तले आहेत. तेव्हा इतक्या अलीकडील हस्तलिखित पुराव्यांचे प्रमाण मानून महानुभाव पंथाच्या आद्य प्रमाण ग्रंथाकडे दुर्लक्ष करणे हे केव्हाही समर्थनीय ठरणारे नाही. डॉ. ढेरे यांनी आपल्या प्रबंधातील प्रमेयांच्या सिद्धीसाठी स्वीकारलेले आधार या प्रमाणे उत्तरकालीन ग्रंथकारांच्या रचनेवर आधारलेले आहेत. त्यामुळे त्यांची विश्वसनीयता न पारखता अनुमाने काढून काही तर्कांची सिद्धी करणे हे सत्यशोधनाचे दृष्टीने केव्हाही न्याय्य ठरणारे नाही याची दखल डॉ. ढेरे यांनी घ्यावयास हवी होती हे निर्विवाद !

☆ ☆ ☆

# संदर्भ साहित्य.


१) लीळाचरित्र : संपादक, डॉ. शं. गो. तुळपुले, एकांक पुणे, १९७२, तिसरी आवृत्ती.

२) चक्रपाणि : रा. चिं. ढेरे, पुणे, १९७७.

३) महानुभाव इतिहास प्रकर्ण , अ. का प्रियोळकर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६५.

४) स्मृतिस्थळ : डॉ. यू. म. पठाण, औरंगाबाद, १९७४.

५) श्रीचक्रधर चरित्र : डॉ. वि. भि कोलते, मलकापूर, द्वितीयावृत्ती, १९७७

६) मूर्तिप्रकाश : डॉ. वि भि. कोलते, नागपूर.

७) श्रीचक्रपाणि चरित्र : संपा. य. खु. देशपांडे, यवतमाळ, १९३६.

८) श्रीचक्रधरोक्त सूत्रपाठ : संपा. ह. ना. नेने, नागपूर.

९) सह्याद्री वर्णन (रवळोबासकृत। संपा. वि. भि. कोलते, पुणे,१९६४

१०) श्रीकृष्ण बाळक्रीडा : संपा. ल. ना. आव्हाड, ढकांबे (नासिक) १९५६

११) मतिरत्नाकर व दर्शनप्रकाश : भास्कर महानुभाव पुणेकर, पुणे, १९०१.

१२) श्रीगोविंदप्रभु चरित्र : संपा वि. भि. कोलते, मलकापूर, द्वितीयावृत्ति, १९६०.

१३) ‘नवभारत’ : प्राज्ञ प्रकाशन वाई, सप्टेंबर १९७७, पृष्ठ ६४.

१४) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. अ. ना. देशपांडे, पूर्वार्ध, खंड पहिला, नागपूर १९६६.


* * *

विचारवंतांचे
अभिप्राय

## अभिप्राय

( अनेक विचारवंताचे उत्स्फूर्तपणे अभिप्राय आले. अजूनही येत आहेत. मर्यादित जागेअभावी सर्वांच्या संपूर्ण अभिप्रायाला प्रकाशित करता आले नाही पण महानुभाव मासिकातून सविस्तरपणे क्रमशः प्रसारण करण्याचा प्रयत्न करू. )

प. पू. प. म. श्री. कारंजेकर बाबा महानुभाव
महानुभाव आश्रम, अमरावती.

'श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण' हे पुस्तक मिळाले. श्री. ढेरे यांनी 'चक्रपाणि' हा प्रबंध लिहून महानुभावीयांचीच मने दुखविली नाहीत तर मराठी भाषेची अस्मिता बाळगणाऱ्या साहित्यिकांचीही मने दुखविली आहेत. श्रीचक्रधर स्वामींना 'शैव' ठरविण्याचा व नाथपंथाशी संबंध जुळविण्याचाच प्रयत्न त्या प्रबंधात श्री. ढेऱ्यांनी केला आहे. व तसे करीत असतानाच त्यांनी महानुभावीय साहित्याच्या अनभिज्ञतेमुळे किंवा अपूर्ण संशोधनामुळे सत्याचा विपर्यास केला आहे.

आपण 'श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण' या पुस्तकाद्वारे वरील विपर्यस्त विधानांना यथोचित, साक्षेपी, विवेचनात्मक उत्तरे देऊन पंथीयांच्या भावनाना दिलासा दिला आहे. तसेच भावी काळातही तथाकथित संशोधकानी अपूर्ण माहितीच्या आधारे महानुभावीय साहित्याचे विपर्यायी परिशीलन करू नये, असेच गर्भितरीत्या सुचविले आहे. श्री. ढेरे यांनी रचलेला तर्काचा डोलारा आपण यथोचित प्रमाणे देऊन ढासळून टाकला आहे. अर्थात आपला सदरहू प्रयत्न अत्यंत स्तुत्य असून पंथीयांना, साहित्यिकाना तसेच सत्यसंशोधकाना उपकारकच ठरेल यात तिळमात्र शंका नाही.

प. पू. प. म. श्री. बीडकरबाबा महानुभाव
महानुभाव आश्रम, रणाईचे.

श्री. ढेरे यांनी महानुभाव तत्वज्ञानाचा सिद्धांत लक्ष्यात न घेऊन फोल अशी प्रमेये, अनुमाने मांडली. त्यांनी मांडलेले पुरावे विश्वनीय दृष्टीने

पारखलेले तथा अभ्यासिलेले नाहीत. तसेच बरीच विधाने पुराव्याच्या आधाराविना कल्पकताच ठरलेली आहेत. त्यांच्या पुस्तकाचे व्यवस्थित संशोधन करून प. पू. श्री. आराध्य मुरलीधरशास्त्री व प्रो. कन्हैया कुंदप यांनी परखड परामर्श ' श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण ' या पुस्तकात घेतला आहे.

प. म. श्री. आराध्य मुरलीधर शास्त्री हे आजन्म महानुभाव तत्वज्ञानाची सेवा करीतच आहेत. या ग्रंथाच्या संशोधन कष्टाचा विचार केल्यास श्री चक्रधर स्वामी उभय लेखकांना कलीयुगाचे आयुष्य देऊन तत्त्वज्ञानाची सेवा करवून घेतील अशी साधनदाते यांचे चरणी नम्र प्रार्थना करतो.

प. पू. प. म. श्री. शेवलीकरबाबा महानुभाव
महानुभाव आश्रम बोरी, जि. परभणी.

आपण पाठविलेली ' श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण ' या ग्रंथाची प्रत मी वाचली. महंत आराध्य मुरलीधरशास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यांनी लिहिलेल्या या ग्रंथामुळे सामान्य जनतेचे झालेले दुराग्रह लक्षात घेऊन सत्य परिस्थितीची सप्रमाण जाणीव या ग्रंथाद्वारे करून देण्याचे परिश्रम घेतले याबद्दल मला स्वाभिमान आहे. आपल्या ग्रंथामुळे सर्वसामान्य जनतेला सत्य परिस्थितीची जाणीव होईल यात शंका नाही.

प. प. प. म. श्री. तळेगावकरबाबा महानुभाव
श्रीकृष्ण मंदीर, खतौली, जि. मुझफरनगर (उ. प्र.)

" पंथीय सिद्धान्तोंके प्रकांड पंडित वयोवृद्ध श्री आराध्यशास्त्री तथा नवोदित संशोधक विद्वान श्री. प्रा. कुंदप द्वारा लिखित 'श्रीचक्रपाणि–एक विश्लेषण' नामक पुस्तकको मैंने आद्योपान्त पढा। श्री. ढेरेके चक्रपाणि प्रबंधमें जो कपोलकल्पित, अनर्गल बाते लिखी गयी हैं। उन सबका सप्रमाण खंडन करके आपने श्री. ढेरेकी पोल खोल कर जनताको अन्यथाज्ञानसे बचानेका श्रेय अर्जित किया है।

मैं हैरान हूँ कि पूना यूनिवर्सीटीने इस प्रबंधपर पीएच्. डी. पदवी कैसे दे दी।

आपने यथोचित शास्त्रसंगत उत्तर देकर हम सबको उपकृत किया

हैं । आपका परिश्रम श्लाघ्य है । अतः मैं आपको बधाई देता हूँ । कागज और छपाई सुन्दर होनेसे पुस्तककी उपयोगिता और भी बढ गयी है ।"

प. पू. प. म. श्री. उद्धवराव सातारकरबाबा महानुभाव,
महानुभाव मठ, करंजे सातारा

" महाराष्ट्राच्या भूमीमध्ये धर्माचा विचार प्रवाह फार पूर्वीपासून दृढ होत आला आहे. वेळोवेळी होणारे बदल व आघात यातून आजही महाराष्ट्राची भूमी धार्मिक प्रवृत्तीला अनुकूल अशीच आहे. या महाराष्ट्रात सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींचे विचारप्रवर्तन करणारे तत्त्वज्ञान आणि परमेश्वर तत्त्व सोप्या मराठी भाषेत समजावून देणारे म्हणून मान्यता पावत आहे. एकनिष्ठपणाने परमेश्वराची भक्ती करावी ही परंपरा महाराष्ट्रातल्या माणसाला सर्वज्ञांच्या तत्त्वज्ञानाने शिकवली.

रंजले गांजले अशांनी स्वतः देवाची पूजा करावयाची हे समाधान श्रीचक्रधरस्वामींनी मराठी भाषेत मराठी मनाला मिळवून दिले. दुराचरणापासून दूर राहावे तर महानुभावांच्या विचाराला चिकटून राहावे हे शतकानुशतकांचा विचार केला तर दिसून येईल. शहरी वातावरणापेक्षा महाराष्ट्रातील खेडोपाडी महानुभावांचा विचार आचार करणाऱ्या गृहस्थांची घरे, माणसे बहुतेक सर्व ठिकाणी दिसतील. कदाचित महानुभाव हे नाव थोडे अलीकडचे वाटेल पण विचार मात्र श्रीचक्रधरस्वामींचेच आहेत. कालगतीने बदल होत असला तरी पण महानुभावांनी दुराचरणाचा प्रचार केला असे आजही काळाला ठरविता येणार नाही.

मात्र एक विद्वान आणि पदवीधर श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनी 'षट्स्थल' नावाच्या एका अपूर्ण ग्रंथाचे संशोधन करताना महानुभाव आणि शैव यांच्या मताची एक गाठ मारण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. ढेरे यांच्या भाषेत रेंगाळत रेंगाळत केलेला हा प्रयत्न त्यांच्या दृष्टीनेच विफल वा दुटप्पी ठरला आहे.

मन मानेल ते पुरावे घेऊन महानुभाव पंथीयांच्या श्रद्धेवर आणि तत्त्वज्ञान सांगणाऱ्यावर खोटे आरोप ढेऱ्यांनी केले आहेत. ऋणभाराची.

भली मोठी यादी देऊन आपल्या पापात त्याना ओढून घेण्याचा प्रयत्न केला व पदवी पदरात पाडून घेतली असे म्हणावे लागेल.

ढेऱ्यांना प्रत्युत्तर म्हणून ' चक्रपाणि : एक विश्लेषण ' हा प. पू. श्री. आराध्यबाबांचा आणि प्रा कन्हैया कुंदप यांचा आकाराने लहान पण महान ग्रंथ वाचून पाहिला तर दिसून येते की, ढेरे यांच्या मताची व मत मांडण्याची पद्धत कशी चुकीची आहे हे समजून येते.

' चक्रपाणि : एक विश्लेषण ' हे विचारवंतांना खरोखर नवी दिशा दाखविणारे ठरेल यांत शंका नाही.

डॉ. शं गो. तुळपुळे
माजी मराठी विभागप्रमुख
पुणे विद्यापीठ

डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'चक्रपाणि' या अलीकडील ग्रंथातील संशोधन मौलिक असले तरी त्यात विवाद्य मुद्दे अनेक आहेत. मुख्यतः विसोबा खेचरांच्या ज्या नवोपलब्ध ग्रंथावर त्यांनी आपले संशोधन उभारले आहे, तो 'षट्स्थल' हा ग्रंथ अजून अप्रकाशितच आहे त्यातील एक लहानसा उतारा देऊन डॉ. ढेरे काम भागवितात हे योग्य नाही. आधी साधने नंतर सिद्धान्त हा न्याय वास्तविक त्यांनी पाळावयास पाहिजे होता. पण तो न पाळल्याने त्यांनी केलेली अनेक विधाने विवाद्य झाली आहेत. त्यापैकी महानुभाव संबद्ध विधानांचा परामर्श घेऊन ती असत्य वाटल्याने ती खोडून काढण्याच्या हेतूने म. अराध्यमुरलीधरशास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यांनी प्रस्तुत पुस्तिका लिहिली. विशषतः डॉ. ढेरे यांनी मानलेली काही समीकरणे ( उदा. श्रीपर्वत म्हणजे श्रीशैल, डाकराम म्हणजे द्राक्षाराम, कांती म्हणजे कांची, रामदव म्हणजे रघुनाथ, हरिनाथ म्हणजे चक्रधर) प्रस्तुत लेखकांना अमान्य असल्याने त्यांनी त्यांचे साधार खंडन केले आहे. त्यांची इतर खडने योग्यच अहेत.

मात्र हरिनाथ म्हणजे श्रीचक्रधर या समीकरणाचा अधिक विचार व्हावयास पाहिजे. असे आम्हांस वाटते. कारण हे समीकरण पुष्कळ वर्षापूर्वी कै. डॉ. य. खु देशपांडे यांना प्रथम ग्रंथाधारे मांडले. पण त्याला त्यावेळी

कोणी विशेष जोराने विरोध केला नाही. तेच जुने समीकरण आज डॉ. ढेरे अधिक पुराव्यानिशी मांडीत आहेत. त्यांचे म्हणणे निर्णायक नसले तरी विचारार्ह आहे हे खरे. एवढी एक गोष्ट वगळल्यास त्यांची इतर कल्पिते प्रस्तुत लेखकद्वयाने परिणामकारक रीतीने खोडली आहेत. ' संशोधनात कोणताही शब्द अखेरचा नसतो ' हे ध्यानात घेऊनच त्यानी डॉ. ढेरे यांच्या लेखनाचा परामर्ष घेतला आहे. मात्र या लेखनामुळे ' महानुभाव पंथीय लोकांच्या भावना दुखविल्या आहेत ' असे ते म्हणतात ते कदाचित खरे असले तरी पंथीयांनीही याबाबतीत हळवे न होता विवेकी राहिले पाहिजे असे आम्हास वाटते. शिवाय डॉ. ढेरे यांचा हेतू कोणाच्या भावना दुखविण्याचा निश्चितच नाही. संशोधनात थोडी पाडापाड होतेच व तिला आपण तयार असले पाहिजे. असो. म. आराध्य मुरलीधरशास्त्र्यांनी आपली बाजू प्रभावीपणे व सप्रमाण मांडली आहे यात शंका नाही.

प्रा. डॉ. व. दा. कुलकर्णी
मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ,
हैद्राबाद.

डॉ. रामचंद्र चितामण ढेरे यानी ' चक्रपाणि ' या ग्रंथातून अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. परंतु महानुभाव पंथाशी संबंधित असलेल्या काही यक्षप्रश्नांचा ' परखड ' परामर्श महंत आराध्य मुरलीधरशास्त्री आणि प्रा. कन्हैया कुंदप यांनी ' श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण ' या ग्रंथाद्वारे घेतला आहे.

डॉ. ढेरे यांचा ' चक्रपाणि ' हा ग्रंथ विद्वन्मान्य झालेला असला तरी हा ग्रंथ म्हणजे एक ' संशोधनात्मक कादंबरी, होय. या ' कादंबरी ' ने ज्ञानाबरोबर मनोरंजनही होते. मुकुंदराजाचे परमगुरु हरिनाथ हे पूर्वाश्रमीचे चक्रधर होत, आणि गुरु रघुनाथ हे रामदेव दादोस होत, तसेच मुकुंदराजाची ' मनोहर ' अंबानगरी ही फलटण होय. श्रीसर्वज्ञ हे पाशुपतानुयायी आहेत. हे सर्व 'सिद्ध' करतांना डॉ. ढेरे यांना बराच आटापिटा करावा लागला. कल्पनेच्या भराऱ्या माराव्या लागल्या

अनेक उत्तरकालीन आणि अविश्वासार्ह पुराव्यांचा आश्रय घ्यावा लागला. भर्तृहरिच्या पंथातील योगिनी मुक्ताई, चांगदेवाची गुरु व ज्ञानदेवाची भगिनी मुक्ताई आणि श्रीसर्वज्ञांना भेटलेली शिवयोगिनी मुक्ताई यांचा परस्पर संबंध जुळविताना अनेक कच्चे दुवे राहिले आहेत. प्रा. कुंदप यांनी नेमके या अविश्वासार्ह व अग्राह्य पुराव्यांचे दिग्दर्शन या छोटयाशा ग्रंथात चिकित्सकरित्या आणि मुद्देसूदपणाने केले आहे.

एवढे मात्र खरे की, कल्पनेच्या वारुवर आरूढ होऊन सिद्धान्तांची उधळण करणाऱ्या 'उधळीनाथांना' या ग्रंथाने 'ठाणवई' आणण्याचा प्रयत्न केला आहे. याबद्दल महंत आराध्य मुरलीधर शास्त्री व प्रा. कुंदप यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

जः शा. देशपांडे, मुंबई.

विद्वान समजले जाणारे लोकही अनेकदा नीट अभ्यास किंवा विचार न करता पुराव्याशिवाय तर्कांच्या इमारती उभारतात, परंपरांची गोलमेल करतात व निष्कारण वाद उदस्थित करण्यास कारणीभूत होतात. या गोष्टी ग्रंथरूपाने बाहेर पडल्या व त्याला तसेच प्रस्तावनाकार मिळाले की गोंधळ अधिकच वाढतो. पण प्राचीन वाङ्मयासारख्या उपेक्षित विषयात अशा विवाद्य गोष्टी निघाल्या तर त्याची चर्चा करण्यासही फारसे कुणी पुढे येत नाही महानुभावीय ज्येष्ठ महंत आराध्य मुरलीधरशास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यांनी प्रस्तुत पुस्तकात श्रीचक्रधरस्वामी व मुक्ताईयोगिनी यांची कुठे भेट झाली, डाकराम व कांती ही ठिकाणे कुठली, श्रीचक्रधरांचा शैव पंथाशी संबंध आहे काय, राऊळ शद्बाची व्युत्पत्ती, श्रीचक्रधर व हरिनाथ आणि रामदेव व मुकुंदराजांचे गुरु रघुनाथ एक काय इत्यादी अलीकडे उत्पन्न झालेल्या मुद्यांचा उहापोह केला आहे, व त्यांनी मांडलेल्या मुद्यांचा नीट विचार होणे जरूर आहे. या संदर्भात एक गोष्ट सांगावीशी वाटते. खेरला भोपाळीच्या कोरीव आलेखामुळे जैतपाळ राजा खराच होता व तो बाराव्या शतकात होऊन गेला. हे कळल्याने मुकुंदराजांच्या पारंपारिक कालाला पुष्टी येते. साहजिकच

मुकुंदराज श्रीचक्रधरांच्या फार पूर्वीचे ठरतात व श्रीचक्रधर आणि हरिनाथ एक असणे अशक्य होते हा मुद्दा विद्वानांना माहित नसावा ही आश्चर्याची गोष्ट आहे. या विश्लेषणाने संपादक द्वयानी मोठी कामगिरी बजावली आहे.

डॉ. प्र. न. जोशी, पुणे

' श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण ' वाचले. एखाद्या ग्रंथावरुन निघालेल्या विवाद्य प्रश्नांची चर्चा करणारे असे पुस्तक क्वचितच निघते. सत्य संशोधनासाठी असा सावधपणा अगत्याचा ठरतो. प्रा. कन्हैया कुंदप व महंत आराध्य मुरलीधर शास्त्री यानी मूळ ग्रंथकाराचे वादग्रस्त, विपर्यस्त व केवळ अनुमानावर आधारलेले मुद्दे सप्रमाण खोडून कांढण्याचा प्रयत्न केला आहे तो बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेला आहे.'

१५–७–७८

प्रा. गं बा. सरदार

' आपल्या पुस्तकाच्या विषयाचे महत्त्व मी ओळखतो परंतु तब्येतीमुळे अभिप्राय पाठविण्याचा माझा खरोखरीच नाइलाज आहे. '

सुदाम सावरकर, संत साहित्याचे अभ्यासक. अमरावती

डॉ. सौ. सुनंदा खेरडे,

प्रसिद्ध संशोधक श्री. रा. चिं. ढेरे यांनी 'चक्रपाणि' या प्रबंधातून अनेक नवी प्रमेये मांडली आहेत. परंतु महानुभाव तत्त्वज्ञानाची विचारसरणी लक्ष्यात न घेता मांडलेली प्रमेये व त्यानुसार केलेली अनुमाने कशी फोल ठरतात हे दाखविण्यासाठी महंत आराध्य मुरलीधर शास्त्री व प्रा. कुंदप यांनी 'श्रीचक्रपाणि: एक विश्लेषण' हा ग्रंथ लिहून वाचकांच्या विचारांना उत्तम प्रकारे गती दिली आहे.

श्रीचक्रधरस्वामी यांना नाथ, शैव वगैरे ठरविण्याचा श्री. ढेरे यांचा प्रयत्न या दृष्टीने कोणालाही अनुचितच वाटेल. पण त्यानिमित्ताने महानुभावीय विद्वान असे 'विश्लेषण' ग्रंथ लिहून महानुभाव पंथाच्या महत्त्वाच्या गोष्टी जनतेसमोर ठेवू लागले, हा महालाभच म्हटला पाहिजे.

श्री. उ. मो. भेले
संपादक दै. इंद्रपुरी समाचार
अमरावती.

" डॉ. ढेरे यांच्या 'चक्रपाणि' प्रबंधातील खटकणाऱ्या विविध बाबींवर समतोल राखून 'विश्लेषणातून' टाकलेला प्रकाश प्रकर्षाने जाणवतो. लेखकद्वयांना त्यासाठी धन्यवाद द्यायला हवेत "

श्री. पुरुषोत्तम नागपुरे
अमरावती

" डॉ. ढेरे यांनी अनेक संशयांना आपल्या प्रबंधात ग्रंथबद्ध करून त्यांनी प्रबंधमिषे संशयकल्लोळ निर्माण करून ठेवला आहे. त्यातील अनेक संशयांचा निरास करणारे एक छोटेसे 'श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण' पुस्तक महंत आराध्य मुरलीधर शास्त्री व प्रा कुंदप यांनी लिहून संशयावर प्रहार केला आहे. अस्सल पुराव्यांच्या आधारावर डॉ. ढेरे यांचे अनेक मनघडन्त आरोप निराधार असल्याचे सिद्ध केले आहे. महानुभावीय संशोधक, उपासक आणि अभ्यासकांना त्यामुळे अतीव समाधान वाटेल. "

प्रा. वासुदेवराव उपाख्य दादासाहेब काळमेघ
कुलगुरु, नागपूर विद्यापीठ.

"श्रीचक्रपाणि: एक विश्लेषण' वाचले. महानुभाव साहित्याबद्दल आस्था असणाऱ्या प्रत्येकास हा छोटे खानी ग्रंथ आवडेल. त्यामुळे संशोधनाची एक नवीनच दृष्टी भावी संशोधकाना मिळेल अशी आशा वाटते.

काही साहित्यिक स्वतः महाराष्ट्रीय असूनही, स्वामींना अ-महाराष्ट्रीयत्व चिकटविण्याचा आपल्या असत्य संशोधनातून जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा त्यांची कीवच करावीशी वाटते. पंथाच्या आणि स्वामींच्या अस्मितेला किंचितही धक्का लागेल, अशा संशोधनाची निदान महाराष्ट्राला तरी आज गरज नाही. म्हणून जे जे कुणी असा प्रयत्न करीत असतील, त्याला उत्तर देण्यास पंथीय धुरीण समर्थ आहेत, असाच प्रस्तुत प्रकाशनाचा अर्थ घ्यावयास हरकत नाही. '

श्री. मनोहर गव्हाणे, एम्. ए , बी. टी.
सरचिटणीस, विदर्भ प्रादेशिक बसव समिती, अमरावती.

" आपण महानुभाव पंथीयांच्या संदर्भाने परामर्शित मुद्दे प्रकाशात आणून सत्य प्रस्थापित करण्याच्या या प्रयत्नाचे महानुभाव वाङ्मयप्रेमी रसिकांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी खरोखर कौतुकच केले पाहिजे.

वीरशैव संप्रदायाविषयीच्या चुकीच्या तथा केवळ तर्काधारित असत्य मुद्यांचा परामर्श या संप्रदायासही नजिकच्या भविष्यात घेणे भाग आहे."

डॉ. भाऊ मांडवकर
प्राचार्य डॉ. बाबासाे आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

' चक्रपाणि ' या ग्रंथातील सत्यापलाप करणारे संबंधित मुद्दे सशास्त्र मांडणी करून पुरांव्यासह प्रसिद्ध करण्याचा स्तुत्य प्रयत्न ' श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण ' यातून घडलेला आहे. या प्रकाशनाने डॉ. ढेरे यांची महानुभावपंथ विषयक विधाने फोल ठरली.'

प्रा. डॉ. ल. रा. नसिराबादकर कोल्हापूर.

डॉ. ढेरे यांनी आपल्या ' चक्रपाणि ' या प्रबंधात यादवकालीन मराठी वाङ्मयाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचे पुनरावलोकन केले आहे. त्यात त्यांनी श्रीचक्रधर आणि हरिनाथ यांचे ऐक्य कल्पिलेले असून शिवयोगिनी मुक्ताबाई ही गोरखनाथ शिष्या असे मानले आहे. त्याचप्रमाणे श्रीपर्वत म्हणजे श्रीशैल पर्वत, डाकराम म्हणजे द्राक्षाराम, कांती म्हणजे कांची यासारखे निष्कर्षही ' षट्स्थल ' या त्याना उपलब्ध झालेल्या ग्रंथाच्या आधारे काढले आहेत, पूर्वसमजाना धक्का देणारे हे निष्कर्ष काढण्यापूर्वी ' षट्स्थल ' या ग्रंथाची विश्वसनीयता पटवून घेणे डॉ. ढेरे यांच्या सारख्या अधिकारी संशोधकाकडून राहून जावे याचे आश्चर्य वाटते. षट्स्थलाची विश्वसनीयता पारखली गेली असतीं तर बरेच विपर्यास टळले असते हे ' चक्रपाणि : एक विश्लेपण ' वाचताना कटाक्षाने जाणवते. महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासात सत्यशोधन करताना त्या ग्रंथाच्या लेखनामागील पंथीय संकेत लक्षात घेतल्याविना निष्कर्षाप्रत जाणे अडचणीचे आहे हे प्रस्तुत 'विश्लेषणा' वरून लक्षात येते. श्री. महंत आराध्य मुरलीधर शास्त्री व प्रा. कन्हैया कुंदप यानी प्रस्तुत ग्रंथात पंथीय भूमिका स्पष्ट करून कुठलाही अभिनिवेष न स्वीकारता, डोळसपणे, परिश्रमपूर्वक व साधार विपर्यस्त विधानांचा जो परामर्श घेतला आहे, तो अभिनंदनीय आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२९८२
निबंध २८७७

## शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | २२ | निदेश | निर्देश |
| ६ | ६ | श्रीकृष्ण चक्रवर्तीवर | श्रीमूर्तीवर |
| ६ | १७ | का | की |
| ६ | २३ | किंवा | किंवा कोणी |
| ६ | २६ | की | असे की |
| ७ | १५ | बाइदेवबास | बाइदेवबासांनी |
| ८ | ११ | एलीचपूरला | ओरंगलला |
| ९ | ५ | पण अर्थात | अर्थात |
| ९ | १८ | म्हणून जर | म्हणून |
| ११ | १० | स्थानास्थाना | स्थाना |
| ११ | २५ | आहे | आहों |
| १२ | १६ | महीनादु | सिंहनादु |
| १३ | १७ | आहे | आहेत |
| १८ | ७ | तरी | तर |
| १९ | २३ | सिद्धांतासंबंधी | सिद्धासंबंधी |
| २० | २१ | आर्वाचाक | आर्वाचिक |
| ३१ | ७ | अे | डो-ओ |
| ३८ | २६ | दिला | दिली |
| ५४ | ११ | यांच्या | यांच्यावरील विवेचनाने |
| ५९ | २ | नसतात | नसतात काय ? |
| ६६ | २ | गुरवाने | गुरवा कडून |
| ६६ | ९ | वसनी | वासनी |
| ६७ | ११ | हा करू | करू |
| ६९ | ८ | अज्ञान | अज्ञातता |
| ७६ | १ | भावांचा | भावांची |
| ८९ | ११ | ढेरे | ढेरे यांनी |

REFBK-0022621

# [] आराध्य प्रकाशन []

महंत आराध्य मुरलीधर शास्त्री यांचे ग्रंथ

१. श्रीचक्रधरस्वामी व त्यांचे साधक

२. सार्थ सूत्रपाठ भाग पहिला

३. श्रीमद्‌भगवद्गीता ( रहस्यार्थ चन्द्रिका-मराठी टीका )

४. भजन माला

५. गोपाल के गीत ( संपादन )

६. श्रीचक्रपाणि : एक विश्लेषण

– महंत आराध्य मुरलीधर शास्त्री

व

– प्रा. कन्हैया कुंदप

## प्रकाशनाच्या वाटेवर –

सार्थ सूत्रपाठ, भाग दुसरा ( विचार प्रकरण )